॥ ११११ ॥

धना गुंतलें चित्त माझें मुरारी । मन घेउनी हिंडवी दारोदारीं ।
मरे हिंडतां न पुरे यासि कांहीं । मही ठेंगणी परी तें तृप्त नाहीं ॥ १ ॥
न दिसे शुद्ध पाहातां निजमती । पुढें पडिलों इंद्रियां थोर घातीं ।
जिवा नास त्या संगती दंड बेडी । हरी शीघ्र या दृष्टसंगासि[1] तोडीं ॥२॥
असीं आणिकें काय सांगों अनंता । मोहो पापिणी दृष्टमायाममता ।
क्रोध काम[2] यातना थोर करी । तुजवांचुनी सोडवी कोण हरी ॥ ३ ॥
निज देखतां निज [3]हे दूरि जाये । निद्रा आळस दंभ या भीत आहे[4] ॥
तयां वस्ति देहीं नको देउं देवा । तुजवांचुनी आणिक नास्ति हेवा ॥ ४ ॥
करीं घात पात शंका लाज थोरी । असे सत्य भाव बहू भक्ति दूरी ।
नको मोकलूं दीनबंधु अनाथा । तुका वीनवी ठेवुनी पायिं माथा ॥ ५ ॥

॥ १११२ ॥

पैल सांवळें तेज पुंजाळ कैसें । सिरीं तुर्बिलीं साजिरीं मोरवीसें[5] ।
हरे त्यासि रे देखतां ताप माया । भजा रे भजा यादवा[6] योगिराया ॥ १ ॥
जया कामिनी लुब्धल्या सहस्रसोळा । सुकुमार ह्या गोपिका दिव्य बाळा ।
शोभे मध्यभागीं कळा चंद्रकोटी । रूपा मीनली साजिरी माळकंठीं ॥ २ ॥
*असे यादवां श्रेष्ठ हा चक्रपाणी । जया[7] वंदिती कोटि तेहतीस तीन्हीं ।
महाकाळ हे कांपती दैत्य ज्यासी । पाहा सांवळें रूप हें पापनासी ॥ ३ ॥
कसीं पाउलें साजिरीं कुंकुमाचीं । कसी वीट हे लाधली दैवांची[8] ।
जया चिंतितां अग्नि हा शांति नीवे । धरा मानसीं आपला देहभाव ॥ ४॥

---

१ "दृष्ट" हा शब्द "दुष्ट" याबद्दल आढळतो. याचें कारण "दुष्ट" याचा अपभ्रंश "दुष्ट;" आणि त्याचा "दृष्ट" असा झाला आहे.–२ त. काम हा यातना.–३ त. हें.–४ दे. आहे.–५ मोर पीसें ?–६ दे. यादव. त. 'यादवा' असतां 'यादव' केलें आहे.–७ त. तया.–८ त. दइवाची.–* त. "असे" शब्द नवा घातला आहे तो दे. नाहीं.

मुनी[1] देखतां मूख हें चित्त ध्याय । देह मांडला भाव हा बापमाय ।
तुक्या लागलें मानसीं देवपीसें । चित्त चोरटें सांवळें रूप कैसें ॥ ५ ॥

॥ १११३ ॥

असे नांदतु हा हरी सर्वजीवीं । असे व्यापुनी अग्नि हा काष्ठ तेवीं ।
घटीं बिंबलें बिंब हें ठायिठायीं । तया संगतीं नासु हा त्यासि नाहीं ॥१॥
तन वाटितां क्षीर हें होत नाहीं । पशू भक्षितां पालटे तें चि देहीं ।
तया वर्म तो जाणता एक आहे । असे व्यापक व्यापुनी अंतर्बाहे ॥ २ ॥
फळ कर्दळीं सेवटीं येत आहे । असे शोधितां पोकळीमाजि काये ।
धीर नाहीं तें[2] वाउगें धीग जालें । फळ पुष्पना यत्न[3] ते व्यर्थ गेले ॥३॥
असे नाम हें दर्पणें सिद्ध केलें । असे बिंब तें या मळा आड[4] ठेलें ।
कैसें[5] शुद्ध नाहीं दिसे माजिरूप । नका वाढवूं सीण हा पुण्यपाप ॥ ४ ॥
करा वर्म ठावें नका सोंग वांयां । तुका वीनवीतो पडों काय पायां ।
तुज पुत्र दारा धन वासना हे । मग ऊरलें शेवटीं काय पाहें ॥ ५ ॥

॥ १११४ ॥

मना सांडि हे वासना दुष्ट खोडी । मती मानसीं एक हे व्यर्थ गोडी ।
असे हीत माझें तुज कांहीं एक । धरीं विठ्ठलीं प्रेम हें पायिं सूख ॥ १ ॥
ऐसा सर्वभावें तुज शरण आलों । देहदुःख हें भोगितां फार भ्यालों ।
भवतारितें दूसरें नाहिं कोणी । गुरु होत कां देव तेहेतीस तीन्ही ॥ २ ॥
जना वासना हे धना थोरि आहे । तुज लागली संगती ते चि सोये ।
करीं सर्व संगी परि त्यागु ठायीं । तुका विनवीतो मस्तक ठेवुनि पायीं ॥३॥

॥ ६ ॥

---

१ त. मनी.–२ दे. त्यें.–३ दे. यत्न व्यर्थ.–४ दे. आहे.–५ दे. त. कैसें.

॥ १११५ ॥

सुटायांचा[1] कांहीं पाहातों उपाय । तों हे देखें पाय गोवियेले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसिया दुःखाचे सांपडलों संदी[2] । हारपली बुद्धि बळ माझें ॥ध्रु॥
प्रारब्ध[3] क्रियमाण संचिताचें । वोढत ठायींचें आलें सार्चे ॥ २ ॥
विधिनिषेधाचे सांपडलों चेपे । ऐकें[4] एक लोपे निवडेना[5] ॥ ३ ॥
सारावें तें वाढे त्याचिया चि अंगें । तृष्णेचिया संगें दुःखी जालों ॥४॥
तुका ह्मणे आतां करीं सोडवण । सर्वशक्तिहीन जालों देवा ॥ ५ ॥

॥ १११६ ॥

भय वाटे पर । न सुटे हा संसार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा पडिलों कांचणी[6] । करीं धांवा ह्मणउनी ॥ ध्रु ॥
विचारितों कांहीं । तों हें मन हातीं नाहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । येथें न पुरे रिघावा ॥ ३ ॥

॥ १११७ ॥

येगा[7] येगा पांडुरंगा । घेई उचलुनि वोसंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी असोनियां वेसीं । दिसतों मी परदेसी ॥ ध्रु ॥
उगवूनि गोवा । सोडवूनि न्यावें देवा ॥ २ ॥
तुज आड कांहीं । बळ करी ऐसें नाहीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे ऱ्हषीकेशी । काय उशीर लाविलासी[8] ॥ ४ ॥

॥ १११८ ॥

माझी विठ्ठल माउली । प्रेमें[9]पान्हा पान्हायेली ॥ १ ॥

---

१ पं. सुटायाचे. कांहीं करितों उपाय ।—२ पं. संधी.—३ पं. प्रारब्ध क्रियामाण संताचे.—४ पं. एका एक.—५ त. सांपडेना.—६ पं. काकरणी.—७ पं. येगा येगा.—८ दे. लाविसी.—९ दे. प्रेमें पान्हा०

॥ ध्रु. ॥ कुर्वाळूनि लावी स्तनीं । न वजे दुरी जवळूनि ॥ ध्रु ॥
केली पुरवी आळी । नव्हे निष्ठुर कोंवळी ॥ २ ॥
तुका ह्मणे घांस । मुखीं घाली ब्रह्मरस ॥ ३ ॥

॥ १११९ ॥

आह्मी उतराई । भाव निरोपूनि पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी पुरवावी आळी । करोंवी ते लडिवाळीं ॥ ध्रु ॥
आमचा हा नेम । तुह्मां उचित हा धर्म ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । जाणों सांगितली सेवा ॥ ३ ॥

॥ ११२० ॥

केलें पाप जेणें दिलें अनुमोदन । दोघांसी पतन सारिखें चि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विष नवनीता विष करी संगें । दुर्जनाच्या त्यागें सर्व हित ॥ ध्रु॥
देखिलें ओढाळ निघालिया सेता । टाळावें निमित्ता थैक म्हूण ॥ २ ॥
तुका ह्मणे जोडे केल्याविण कर्म । देखतां तो श्रम न मनितां ॥ ३ ॥

॥ ११२१ ॥

विठ्ठल गीतीं विठ्ठल चित्तीं । विठ्ठल विश्रांति भोग जया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठल आसनीं विठ्ठल शयनीं । विठ्ठल भोजनीं ग्रासोग्रासीं ॥ध्रु॥
विठ्ठल जागृतिस्वप्नसुषुप्ती । आन दुजें नेणती विठ्ठलेंविण ॥ २ ॥
भूषण अळंकार सुखाचे प्रकार । विठ्ठल निर्धार जयां नरां ॥ ३ ॥
तुका ह्मणे ते ही विठ्ठल चि जाले । संकल्प मुराले दुजेपणें ॥ ४ ॥

---

१ दे. त. कुवाळूनि.–२ पं. करविती लडवाळीं.–३ दे. त. पं. आन्मोदन –४ दे. त. सारिके चि.–५ दे. त. निमित्या.–६ त. नेणती तो.–७ दे. जागृतिस्वप्नी सुषुप्ति. ८पं. विठ्ठलीं.

॥ ११२२ ॥

दास जालों हरिदासांचा । बुद्धिकायामनेंवाचा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तेथें प्रेमाचा सुकाळ । टाळमृदंगकल्लोळें ।

नासे दुष्टबुद्धि सकळ । समाधि हरिकीर्त्तनीं ॥ ध्रु ॥

ऐकतां हरिकथा । भक्ति लागे त्या अभक्तां ॥ २ ॥

देखोनि कीर्तनाचा रंग । कैसा उभा पांडुरंग ॥ ३ ॥

हें सुख ब्रह्मादिकां । ह्मणे नाहीं नाहीं तुका ॥ ४ ॥

॥ ११२३ ॥

गति अधोगति मनाची युक्ति । मन लावीं एकांतीं साधुसंगें ॥ १ ॥

॥ ध्रु· ॥ जतन करा जतन करा । धांवतें सैरा ओढाळ तें ॥ ध्रु ॥

मान अपमान मनाचें लक्षण । लाविलिया ध्यान तें चि करी ॥ २ ॥

तुका ह्मणे मन उतरी भवसिंधु । मन करी बंधु चौऱ्याशीचा ॥ ३ ॥

॥ ११२४ ॥

पंढरीस दुःख न मिळे ओखदा । प्रेमसुख सदा सर्वकाळ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पुंडलिकें हाट भरियेली पेंठ । अवघें वैकुंठ आणियेलें ॥ ध्रु ॥

उदमासीं तुटी नाहीं कोणा हानि । घेऊनियां धणी लाभ घेती ॥ २ ॥

पुरलें देशासी भरलें सिगेसी । अवघी पंचक्रोशी दुमदुमीत ॥ ३ ॥

तुका ह्मणे संतां लागलीसे धणी । बैसले राहोनि पंढरीस ॥ ४ ॥

॥ ११२५ ॥

द्वारकेचें केणें आलें या चि ठाया । पुढें भक्तराया चोजवीत ॥ १ ॥

---

१ पं. कल्होळ.—२ पं. नाहीं नाहीं ह्मणे तुका.—३ पं. मनाची हे युक्ति.— ४ त. बाधु.— ५ पं. उदिमासी.—६ त. देती. पं. येती.

॥ ध्रु. ॥ गोविलें विसारें माप केलें खरें । न पाहे माघारें अद्यापवरी ॥ ध्रु ॥
वैष्णव मापारी नाहीं जाली सळे । पुढें ही न कळे पार त्याचा ॥ २ ॥
लाभ जाला त्यांनीं धरिलो तो विचार । आहिक्य परत्र सांटाविलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज मिळाली मजुरी । विश्वास या घरीं संतांचिया ॥ ४ ॥

॥ ११२६ ॥

सुरवर येती तीर्थें नित्यकाळ । पेंठ त्या निर्मळ चंद्रभागा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साक्षभूत नव्हे सांगितली मात । महिमा अत्यद्भुत वर्णवेना ॥ध्रु॥
पंचक्रोशीमाजी रीघ नाहीं दोषा । जळती आपैसा अघोर ते ॥ २ ॥
निर्विषय नर चतुर्भुज नारी । अवघा घरोघरीं ब्रह्मानंदु ॥ ३ ॥
तुका ह्मणे ज्यापें नाहीं पुण्यलेश । जा रे पंढरीस घेई कोटि ॥ ४ ॥

॥ ११२७ ॥

विचार नाहीं नर खर तो तैसा । वाहे ज्ञान पाठी भार लगड तैसा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वादावाद करणें त्यासी तों च वरी । गुखाडीची चाड सरे तों च बाहेरी ॥ ध्रु ॥
सौभाग्यसंपन्न हो कां वृद्ध प्रतिष्ठ । चिंकरूनि सांडी पायां लागली ते विष्ठ ॥ २ ॥
नाहीं याति कुळ फांसे ओढी तयासी । तुका ह्मणे काय मुद्रासोंग जाळिसी ॥ ३ ॥

॥ ११२८ ॥

देव होसी तरी आणिकांतें करिसी । संदेह येविशीं करणें न लगे ॥ १ ॥
दुष्ट होसी तरी अणिकांतें करिसी । संदेह येविशीं करणें न लगे ॥ २ ॥

---

१ दे. त. सळ.—२ पं. धरिला विचार । अहिक्य.—३ पं न वर्णवे.—४ दे. त. रीग.—
५ पं. जैसा.—६ पं. प्रतिष्ठा.—७ पं. विकरूनि.—८ पं. विष्ठा.—९ त. आणिकासी.

तुका ह्मणे जें दर्पणीं बिंबलें । तें तया बाणलें निश्चयेसीं ॥३॥

॥ ११२९ ॥

कालिधर्म मार्गे सांगितले संतीं । आचार सांडिती द्विजलोक ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ते चि कळों आतां येतसे प्रचिती । अधर्मा टेंकती धर्म नव्हे ॥ध्रु०॥
तप व्रत करितां लागती सायास । पाळितां पिंडास गोड वाटे ॥ २ ॥
देव ह्मणऊनी न येती देऊळा । संसारा वेगळा तरी कां नव्हे ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज धरितां गुमान । ऐसे कोणी जन नरका जाती ॥ ४ ॥

॥ ११३० ॥

नमो विष्णुविश्वरूपा मायबापा । अपरा अमुपा पांडुरंगा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ विनवितों रंक दास मी सेवक । वचन तें एक आइकावें ॥ध्रु०॥
तुझी स्तुति वेद करितां भागला । निवांत चि ठेला नेति नेति ॥ २ ॥
ऋषि मुनि वहु सिद्ध कविजन[1] । वर्णितां ते गुण न सरती ॥ ३ ॥
तुका ह्मणे तेथें काय माझी वाणी । जे तुझी वाखाणी कीर्ती देवा ॥४॥

॥ ११३१ ॥

अंतरींचा भाव जाणोनियां गुज । तैसें केलें काज पांडुरंगा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ घातलें वचन न पडे चि खालीं । तूं आह्मां माउली अनाथांची ॥ध्रु०॥
मज याचकाची पुरवावी आशा । पंढरीनिवासा मायबापा ॥ २ ॥
नाशिली[2] आशंका माझिया जीवाची । उरली भेदाची होती कांहीं ॥३॥
तुका ह्मणे आतां केलों मी निर्भर । गाईन अपार गुण तुझे ॥ ४ ॥

---

१ पं. ऋषि मुनि सिद्ध बहुत कविजन । वर्णितां तुझे गुण० -२ पं. नाशली.

॥ ११३२ ॥

उदार कृपाळ अनाथांचा नाथ । ऐकसी[1] मात शरणागतां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ सर्व भार माथां चालविसी त्यांचा । अनुसरलीं[2] वाचा काया मनें ॥छ॥
पाचारितां उभा राहासी जवळी । पाहिजे ते काळीं पुरवावें ॥ २ ॥
चालतां ही पंथ सांभाळिसी वाटे । वारिसील कांटे खडे हातें ॥ ३ ॥
तुका ह्मणे चिंता नाहीं तुझ्या दासां । तूं त्यांचा कोंवसा सर्वभावें ॥ ४ ॥

॥ ११३३ ॥

काय कीर्ती करूं लोक दंभ मान । दाखवीं चरण तुझे मज ॥ १ ॥
॥ध्रु.॥ मज आतां ऐसें नको करूं देवा । तुझा दास जावा वांयां विण ॥छ॥
होइल थोरपण जाणीवेचा भार । दुरावेन[3] दूर तुझ्या[4] पायीं ॥ २ ॥
अंतरींचा भाव काय कळे लोकां । एक मानी एकां देखोवेखीं ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुझे पाय आतुडती । ते[5] मज विपत्ति गोड देवा ॥ ४ ॥

॥ ११३४ ॥

मानावया जग व्हावी द्रव्यमाया । नाहीं[6] हे माझिया जीवा चाड ॥ १ ॥
॥ध्रु.॥ तुझ्या पायांसाटीं केली आराणूक । आतां कांहीं एक नको दुजें ॥छ॥
करूनियां कृपा करीं अंगीकार । न लवीं[7] उसीर आतां देवा ॥ २ ॥
नव्हे साच कांहीं कळों आलें मना । ह्मणोनि वासना आवरिली ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां मनोरथ सिद्धी । माझे कृपानिधी पाववावे ॥ ४ ॥

॥ ११३५ ॥

आतां[8] माझा सर्वभावें हा निर्धार । न करीं विचार आणिकांसी ॥

---

१ पं. ऐकसील.—२ पं. अनुसरे.—३ पं. दुऱ्हावेन.—४ दे. त. तुझा.—५ पं. त्या.—६ पं. हे नाहीं माझिया०.—७ पं. लावीं.—८ पं. आतां सर्वभावें हा माझा निर्धार.

॥ध्रु.॥ सर्वभावें नाम गाईन आवडी । सर्व माझी जोडी पाय तुझे ॥ध्रु॥
लोटांगण तुझ्या घालीन अंगणीं । पाहीन भरोनि डोळे मुख ॥ २ ॥
निर्लज्ज होऊनि नाचेन रंगणीं । येऊं नेदी मनीं शंका कांहीं ॥ ३ ॥
अंकित अंकिला दास तुझा देवा । संकल्प हा जीवा तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ११३६ ॥

जनीं जनार्दन ऐकतों हे मात । कैसा[1] तो वृत्तांत न कळे आह्मां ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जन्म जरा मरण कवेण[2] भोगी भोग । व्याधि नाना रोग सुखदुःखें[3] ॥ध्रु॥
पापपुण्यें[4] शुद्धाशुद्ध आचरणें[5] । हीं[6] कोणांकारणें कवणें केलीं ॥ २ ॥
आह्मां मरण नाश तूं तंव अविनाश । कैसा हा विश्वास साच मानूं ॥३॥
तुका ह्मणे तूं चि निवडीं हें[7] गुढार । दाखवीं साचार तें चि मज ॥४॥

॥ ११३७ ॥

यथार्थ वाद सांडूनि उपचार । बोलती ते अघोर भोगितील ॥ १ ॥
चोरा धरितां सांगे कुठोर्‍याचें[8] नांव । दोघांचे ही पाव हात जाती ॥२॥
तुका ह्मणे असे पुराणीं निवाड । माझी हे बडबड नव्हे कांहीं ॥ ३ ॥

॥ ११३८ ॥

धीर तो कारण सांह्य होतो नारायण ।
नेदी होऊं सीण वाहों चिंता दासांसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सुखें करावें कीर्तन हर्षें गावे हरिचे गुण ।
वारी सुदर्शन आपण चि कळिकाळ ॥ ध्रु ॥
जीव वेची माता बाळा जडभारी होतां ।

---

१ पं. कैसा हा वृत्तात०.—२ त. कोण.—३ पं. सुख दुःख.—४ पं. पापपुण्य.—५त आचरण । हें कोणा० —६ पं. कीं कोणा.—७ प. हे.—८ पं. कुटाऱ्याचें.—९ दे. त. साहे.

तो तों नव्हे दाता प्राकृतां यां सारिखा ॥ २ ॥
हें तों माझ्या अनुभवें अनुभवा आलें जीवें ।
तुका ह्मणे सत्य व्हावें आहाच नये कारणा ॥ ३ ॥

॥ ११३९ ॥

पुढें आतां कैंचा जन्म । ऐसा श्रम वारेसा ॥ १ ॥
॥ धु. ॥ सर्वथाही फिरों नये । ऐसी सोय लागलिया ॥ ध्रु ॥
पांडुरंगा ऐसी नाव । तारूं भाव असतां ॥ २ ॥
तुका ह्मणे चुकती[1] बापा । पुन्हा खेपा सकळा ॥ ३ ॥

॥ ११४० ॥

दुध[2] दहीं ताक पशूचें पाळण । त्यांमध्यें कारण घृतसार ॥ १ ॥
॥धु.॥ हें चि वर्म आह्मां भाविकांचे हातीं । ह्मणऊनि चित्तीं धरिला राम ॥ध्रु॥
लोहो कफ गारा अग्नीचिया काजें । येऱ्हवी तें ओझें कोण वाहे ॥ २ ॥
तुका ह्मणे खोरीं पाहारा जतन । जोंवरि हें धन हातीं[3] लागे ॥ ३ ॥

॥ ११४१ ॥

वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥
॥ धु. ॥ करिती घोष जयजयकार[4] । जळती दोषांचे डोंगर ॥ ध्रु ॥
क्षमा[5] दया शांति । बाण अभंग[6] हे हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे बळी । ते चि एक भूमंडळीं ॥ ३ ॥

॥ ११४२ ॥

ऐकें[7] रे जना तुझ्या स्वहिताच्या खुणा ।

---

१ पं. चुकवी –२ दे. त. दुद.–३ पं. हाता.–४ दे. त. जेजेकार. –५ पं. दया क्षमा शांति०.–६ दे. अभंग ते हातीं.– ७ पं. आयीक.

पंढरीचा राणा मनामाजी स्मरावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग कैचें रे बंधन वाचे गातां नारायण ।
भवसिंधु तो जाण ये चि [1]तीरीं सरेल ॥ ध्रु ॥
दास्य करील कळिकाळ बंद[2] तुटेल मायाजाळ ।
होतील सकळ रिद्धिसिद्धी ह्मणियारीं ॥ २ ॥
सकळशास्त्रांचें सार हें वेदांचें गव्हर ।
पाहातां विचार हा चि करिती पुराणें ॥ ३ ॥
ब्राह्मण क्ष[3]त्रिय वैश्य शूद्र [4]चांडाळां आहे अधिकार ।
[5]बाळें नारीनर आदि करोनि वेश्या हीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे अनुभवें आह्मीं पाडियलें ठावें ।
आणीक ही दैवें सुख घेती भाविकें ॥ ५ ॥

॥ ११४३ ॥

न करीं तळमळ राहें रे निश्चळ । आहे [6]हा कृपाळ स्वामी माझा ॥ १ ॥
॥ध्रु.॥ अविनाश सुख देईल निर्वाणी । चुकतील खाणी चौऱ्याशींच्या ॥ध्रु॥
आणिकियां जीवां होईल उद्धार । ते ही उपकार घडती कोटि ॥ २ ॥
[7]आंहिक्य परत्रीं होसील सरता । [8]उच्चारीं रे वाचा रामराम ॥ ३ ॥
तुका ह्मणे सांडीं संसाराचा छंद । मग परमानंद पावसील ॥ ४ ॥

॥ ११४४ ॥

कां रे दास होसी संसाराचा खर । दुःखाचे डोंगर भोगावया ॥ १ ॥
॥ध्रु.॥मिष्टान्नाची गोडी जिव्हेच्या अगरीं । मसक भरल्यावरी स्वाद नेणे ॥ ध्रु ॥

---

१ दे. तरीं.–२ पं. बंध.–३ दे. त. पं. क्षेत्री.–४ पं. चांडाळांही अधिकार.–५ पं. स्त्रिया बाळें०.–६ पं. "हा" शब्द नाहीं.–७ ऐहिक्य असें असावें.–८ पं. वाचे उच्चारितां रामनाम.

आर्णिक ही भोग आणिकां इंद्रियांचे । नाहीं ऐसे साचे जवळी कांहीं ॥२॥
रूप दृष्टि धाय पाहातां पाहातां । न घडे सर्वथा आणि तृष्णा ॥ ३ ॥
तुका ह्मणे कां रे नाशिवंतासाटीं । देवांसवें तुटी करितोसी ॥ ४ ॥

॥ ११४५ ॥

बैसोनि निश्चळ करीं त्याचें ध्यान । देईल तो अन्नवस्त्रदाता ॥ १ ॥
॥ध्रु.॥ काय आह्मां करणें अधिक सांचुनी । देव जाला ऋणी पुरविता ॥ध्रु॥
दयाळ मयाळ जाणे कळवळा । शरणागतां ळळा राखों जाणे ॥ २ ॥
न लगे मागणें सांगणें तयासी । जाणे इच्छा तैसी पुरवी त्याची ॥ ३ ॥
तुका ह्मणे लेई अळंकार अंगीं । विठ्ठल हा जगीं तूं चि होसी ॥ ४ ॥

॥ ११४६ ॥

सोनियांचा कळस । माजी भरिला सुरारस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करावें प्रमाण । तुह्मी सांगा संतजन ॥ ध्रु ॥
मृत्तिकेचा घट । माजी अमृताचा सांट ॥ २ ॥
तुका ह्मणे हित । तें मज सांगावें त्वरित ॥ ३ ॥

सेतावर---अभंग ३.

॥ ११४७ ॥

सेत करा रे फुकाचें । नाम विठोबारायाचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं वेठी जेवा सारा । जाहाती नाहीं ह्मणियारा ।
सरिक नाहीं रे दुसरा । धनी सारा तुझा तूं ॥ ध्रु ॥
जपतप नांगरणी । न लगे आटी दुनवणी ॥ २ ॥

---

१ पं. "कांहीं" याच्याबद्दल "ही" आहे.—२ आणीक.—३ पं. देवासाटीं.—४ पं. न लगे सांगणें मागणें तयासी०—५ त. 'जाहाती' यावर 'जाहाजती' असा शोध घातला आहे.—६ पं. नाहीं दुसरा.—७ त. दुणवणी. पं. दुणवनी.

कर्म कुळवणी । न लगे धर्मपाळी दोन्ही ॥ ३ ॥
ज्ञानपाभारी ती फणी । न लगे करावी पेरणी ॥ ४ ॥
बीज न लगे संचिताचें । पीक पिकलें ठायींचें ॥ ५ ॥
नाहीं यमाचें चोरटें । विठ्ठल पागोऱ्याच्या नेटें ॥ ६ ॥
पीक न वजे हा भरवसा । करी उद्वेग तो पिसा ॥ ७ ॥
सेराई सर्व काळ । वांयां न वजे घटिकापळ ॥ ८ ॥
प्रेम पिकलें अपार । नाहीं सांटवावया थार ॥ ९ ॥
ऐसीये जोडी जो चुकला । तुका ह्मणे धिग त्याला ॥ १० ॥

॥ ११४८ ॥

वोणव्या सोंकरीं । सेत खादलें पांखरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसा खाऊं नको दगा । निदसुरा राहुनि जागा ॥ ध्रु ॥
चोरासवें वाट । चालोनि केलें तळपट ॥ २ ॥
डोळे झांकुनि राती । कूपीं पडे दिवसा जोती ॥ ३ ॥
पोसी वांजें गाय । तेथें कैची दुधें साय ॥ ४ ॥
फुटकी सांगडी । तुका ह्मणे न पवे थडी ॥ ५ ॥

॥ ११४९ ॥

सेत आलें सुगी सांभाळावे चारी कोण ।
पिका आलें परी केलें पाहिजे जतन ॥ १ ॥
॥ध्रु. ॥ सोंकरीं सोंकरीं विसावा तोंवरीं । नको खाऊं उभें आहे तों ॥ध्रु॥

---

१ पं. उद्योग.—२ पं. दे. सगये.—३ पं. ऐसी.—४ दे. वोनव्या.—५ पं. वांझ.—६ पं. दुधसोप.—७ दे.० तों वरी नको उभें आहे तों ॥ पं.० तो वरी उभे आहे तो ।

गोफणेसी गुंडा घालीं पागोऱ्याच्या नेटें ।
पळती हाहाकारें अवघीं पांखरांचीं थाटें ॥ २ ॥
पेटवूनि आगटी राहें जागा पालटूनि ।
पडिलिया मा[1]न बळ बुद्धि व्हावीं दो[2]नी ॥ ३ ॥
खळे दोनें विश्व सुखी करीं होतां रासी ।
सारा सारूनियां ज्याचे भाग देई त्यासी ॥ ४ ॥
तुका ह्मणे मग नाहीं आपुलें कारण ।
निज आलें हातां भूस सांडिलें निकण ॥ ५ ॥ ॥ ३ ॥

॥ ११५० ॥

नका घालूं दुध जयामध्यें सार । ताकाचे उपकार तरी करा ॥ १ ॥
नेदा तरी हें हो नका देऊं अन्न । फुकाचें जीवन तरी पाजा ॥ २॥
तुका ह्मणे मज सगुणोची चाड । पुरवा कोणी कोड दुर्बळाचें ॥ ३ ॥

उतराधिपदें---२२

॥ ११५१ ॥

क्या गाऊं कोई सुननवाला । देखें तों सब जग ही भुला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खेलों आँ[3]पने राम[4]हिसात । जैसी वैसी करहों मात ॥ ध्रु ॥
काहांसे लौं[5]ऊं मधुरा बानी । रीझे ऐसी लोक बि[6]रानी ॥ २ ॥
गिरिधर लाल तो भाँ[7]वका भुका । राग कला नाहिं जानत तुका ॥ ३ ॥

॥ ११५२ ॥

छोडे[8] धन मंदिर बन बसाया । मांगत टुं[9]का घरघर खाया ॥ १ ॥

---

१ पं. मानी बळबुद्धि.—२ त. पं. दानी.—३ दे. आपणें.—४ दे. राम इसातें.—५ दे. ल्यावों माधुर बाणी. त. ल्यावो मधुराबाणी.—६ दे. त. बिराणी.—७ दे. त. भावाहि भुका.—८ त. " छोडे " हा शब्द नाहीं. दे. बाहेर नवीन घातला आहे.—९ दे. टूका.

॥ ध्रु. ॥ तीनसों हम करवों सलाम । ज्यांमुख बैठा राजाराम ॥ ध्रु ॥
तुलसीमाला बभूत चऱ्हावे । हरजीके गुण निर्मल गावे ॥ २ ॥
कहे तुका जो सांई हमारा । हिरनकश्यप उंन्हें मारहि डारा ॥ ३ ॥

॥ ११५३ ॥

मंत्र[4]यंत्र नहिं मानत साखी । प्रेमभाव नहिं अंतर राखी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राम कहे त्याके पगहूं लागूं । देखत कपट अभिमान दुर भागूं ॥ ध्रु ॥
अधिक याती कुलहीन नहिं जाँनूं । जाँ[6]ने नारायन सो प्राँनी मानूं ॥ २ ॥
कहे तुका जीव तर्न डारू वारी । राम उपासिहुं बलियाँरी[*] ॥ ३ ॥

॥ ११५४ ॥

चुराचुराकर माखन खाया । गौलेंनीका नंद कुमर कन्हया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काहे बेराई दिखावत मोहि । जानतहुं प्रभुपना तेरा[12] खब हि ॥ ध्रु ॥
और बात सुन उ[13]खलसुं गला । बांधलिया आपना तूं गोपालों[14] ॥ २ ॥
फेरत बनबन गाऊ धे[15]रावत । कहे तुकयाबंधु लकरी लेले हाँ[16]त । ३ ॥

॥ ११५५ ॥

हरिसुं मिल दे एक हि बेर । पाछें तूं फिर नावे घर ॥ १ ॥ ध्रु. ॥
मात सुनो दुति आँ[17]वे मनावन । जाया करति भर जोबन ॥ ध्रु ॥
हरिसुख मोहि कहिया न जाये । तव तूं बुझे आँ[18]गो पाये ॥ २ ॥
देखाहि भाव कछु पकरि हात । मि[19]लाइ तुका प्रभुसात ॥ ३ ॥

---

१ दे. ज्या मुखे.—२ पं. तुलसीकी माला.—३ पं. जिन्हे.—४ पं. मंत्र तंत्र—५ दे. ज्यानु. त. जाणु.—६ दे. ज्याणे. त. ज्याने त. नारायण.—७ दे प्राणी. त. प्राणी माणुं.—८ पं. तन धन डारूं.०—९ दे. त. गौळणीका.—१० दे. त. बडाई.—११ दे. त. पं. जाणत हुं प्रभुपणा.—१२ त. तेरा खुबाहि.—१३ दे त. उखळसुं गळा.—१४ दे. त. गोपाळा—१५ दे. धरावतें. पं. धरावततें.—१६ पं. हाते.—१७ त. आवो.—१८ दे. आंगोपाये. पं. आगे पाय.—१९ पं. मीललई.

* " बळिहारी; " + " सब हि; " असावें.

॥ ११५६ ॥

क्या कहुं नाहिं बुझत लोका । लिजावे जम मारत धका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ क्या जीवनेकी पकडी आस । हातों लिया नहिं तेरा घांस ॥ध्रु॥
किसे दिवाने कहता मेरा । कछु जावे तन तूं सब ल्या न्यारा[1] ॥ २ ॥
कहे तुका तूं भया दिवाना । आपना बिचार कर ले जना ॥ ३

॥ ११५७ ॥

कब मरूं पाऊं चेरन[2] तुह्मारे । ठाकुर मेरे जीवन प्यारे ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जग रडे[3] ज्याकुं सो मोहि मीठा । मीठा[4] दर आनंदमाहि पैठा ॥ध्रु॥
भला पाऊं जनम इन्हे[5] बेर । बैस[6] मायाके असंग फेर ॥ २ ॥
कहे तुका धन मानहि दारा । वोहि[7] लिये गुंडलीया पसारा ॥ ३ ॥

॥ ११५८ ॥

दासों पाछें दौरे राम । सोवे खडा आपें मुकाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेम*सरडी बांधी गले[8] । खैंचे[9] चले उधर ॥ ध्रु ॥
आंपने[10] जनसुं भुल न [11]देवे । कर हि धर आंधे बाट बतावे ॥ २ ॥
तुकाप्रभु दीनदयाला । वारि रे तुज पर हुं गोपाला ॥ ३ ॥

॥ ११५९ ॥

ऐसा कर घर आवे राम । और धंदा सब छोर हि काम ॥ ध्रु ॥
इतने गोते काहे खाता । जब तूं [12]आंपना भूल न होता ॥ १ ॥
अंतरजामी जानत साचा । मन[13]का एक उपर बाचा ॥ २ ॥

---

१ दे. पं.० ल्या नेरा.—२ त. पं. चरण.—३ "रडे" याच्या बद्दल "रोवे" असें असावें.—४ पं. मीठा दर आनंदसाहि पैठा.—५ दे. ईण्हे. पं.० पहूंजनम ईन्हे.—६ पं. सब.—७ दे. वोहिलिये गुंडलीयें. पं. गुंडली.—८ दे. त. गळे.—९ पं. खैचलले उधर चेले.—१० दे. आपणे त. आपले.—११ पं. लेवे.—१२ दे. त. आपणा.—१३ पं. मन येक उवर बाचा.

* "प्रेमसरडी" असावें.

तुकाप्रभु देसबिदेस । भरिया खाली नाहिं लेस ॥ ३ ॥

॥ ११६० ॥

मेरे रामको नाम जो लेवे बारोंबार। त्याके[1] पाउं मेरे तनकी पैजार ॥ध्रु॥
हांसत खेलत चालत बाट । खाना[2] खाते सोते खाट ॥ १ ॥
जातनसुं मुंजे[3] कछु नहिं प्यार । असंतेके[4] नहिं हेंदु* धेड चंभार ॥२॥
ज्याका चित लगा मेरे रामको नाम[5]। कहे तुका मेरा चित लगा त्याके पाव ॥ ३ ॥

॥ ११६१ ॥

आंपे[6] तरे त्याकी कोण बराँई[7] । औरनकुं भलो[8] नाम घराई ॥ ध्रु ॥
काहे भूमि इतना भार राखे । दुभत धेनु नाहिं दुध चाखे ॥ १ ॥
बरसतें मेघं[9] फलतेंहें[10] बिरखा । कोन काम आपनी उन्होति[11] रखा ॥२॥
काहे चंदा सुरज खावे फेरा । खिन एक बैठन पावत घेरा ॥ ३ ॥
काहे परिस कंचन करे धातु । नाहिं मोल तुटत पावत घातु ॥ ४ ॥
कहे तुका उपकारि[12] हि काज । सब कर[13]रहिया रघुराज ॥ ५ ॥

॥ ११६२ ॥

जग चले उस घाट कोन जाय । नाहिं समजत फिरफिर गोते[14] खाय ॥ध्रु॥
नहिं एकदो सकल संसार । जो बुझे सो आगला स्वार ॥ १ ॥
उपर स्वार[15] बैठे कृष्णांपीठ[16] । नहिं बाचे कोइ जावे लूठ ॥ २ ॥
देख हि डर फेर बैठा तुका । जोवंत[17] मारग राम हि एका ॥ ३ ॥

॥ ११६३ ॥

भले रे भाई जिन्हें किया चीर्ज[18] । आछा नहिं मिलत बीज ॥ ध्रु ॥

---

१ पं. याके –२ दे. त. पं. खाणा.–३ पं मजे.–४ दे. असते की नहीं०.–५ दे. त. नाव.–६ पं. आप.–७ पं. वडाई । आवरनकु.–८ न. भली.–९ त. मेघा –१० पं. तेही.–११ पं. उणोति. त. उण्हेति.–१२ प. उपकर.–१३ पं. करक रहिया.–१४ दे. त. गोदे.–१५ दे. त. श्वार –१६ पं. कृष्णापिठ.–१७ पं. जावत.–१८ पं. चित्त.

* "हिंदु" असावे.

फीरतफीरत पाया सारा । मीलेत लोले धन किनारा ॥ १ ॥
तीरथ बरत फिर पाया जोग । नाहिं तलमल [2]तुटत भवरोग ॥ २ ॥
कहे तुका मैं ताँको दास । नहिं सिरभार चलावे पासँ[4] ॥ ३ ॥

॥ ११६४ ॥

लाल कमलि वोढे पेनाये । मोसु हरिथें कैसें बनाये ॥ ध्रु ॥
कहे सखि तुम्हें कराति सोर । हिरदा हरिका कठिन कठोर ॥ १ ॥
नाहिं क्रियाँ* सरम कछु लाज । और सुनाउं बहुत हे भाज ॥ २ ॥
और नामरूप नाहिं गोवालिया । तुकाप्रभु माखन खाया ॥ ३ ॥

॥ ११६५ ॥

राम कहो जीवना फल सो ही । हरिभजनसुं बिलंब न पाई ॥ ध्रु ॥
कवनका मंदर कवनकी झोपरी । एकरामबिन सब हि फुकरी ॥ १ ॥
कवनकी काया कवनकी माया । एकरामबिन सब हि जाया ॥ २ ॥
कहे तुका सब हि [6]चलनार । एकरामबिन नहिं बाँसारा ॥ ३ ॥

॥ ११६६ ॥

काहे भुला धनसंपत्तीघोर । राम[8]राम सुन गाउ हो बाप रे ॥ ध्रु ॥
राजे लोक सब केहे तू आपना । जब काल नहीं पाया ठाना ॥ १ ॥
माया मिथ्या मनका सब धंदा । तजो अभिमान भजो गोबिंदा ॥ २ ॥
राना रंक डोंगरकी राई । कहे तुका [10]करे इलाहि ॥ ३ ॥

---

१ त.० सार । मीटत० किनार. ॥ दे. मीटत.–२ दे. त. तुटाति.–३ पं. तेकोदास. दे. त. ताको दासा.–४ दे. त. पासा–५ पं. हरिते.–६ दे. चेलण्हार. त. चेलण्हारा. पं. चलणार.–७ दे. पं. वासार.–८ पं. रामनाम.–९ पं. कह.–१० पं. कर.

* "कन्या" असावें.

॥ ११६७ ॥

काहे रोवे आगले मरना । गंव्हार तूं भुला आपना ॥ ध्रु ॥
केते मोलुम नहिं पंडे । नन्हे बडे गये सो ॥ १ ॥
बाप भाई लेखा नाहिं । पोछें तूं हि चलनार ॥ २ ॥
काले बाल सिंपैंत[3]* भये । खबर पकडो तुका कहे ॥ ३ ॥

॥ ११६८ ॥

क्या मेरे राम कवन सुख सारा । कहकर दे पुछूं दास तुह्मारा ॥ध्रु॥
तनजोबनकी कोन बराई । ब्याधपीडादि स काटहि खाई ॥ १ ॥
कीर्त बधाऊं तों नाम[4] न मेरा । काहे झुटा पछतऊं घेरा ॥ २ ॥
कहे तुका नाहिं समजत[6] मात । तुह्मारे शरन हे जोडँहि हात ॥ ३ ॥

॥ ११६९ ॥

देखत आखों झुटा कोरा । तो काहे छोरा घरबार ॥ ध्रु ॥
मनसुं किया चाहिये पाख । उपर खाक पसारा ॥ १ ॥
कामक्रोधसो संसार । वो सिरभार चलावे[11] ॥ २ ॥
कहे तुका वो[12] संन्यास । छोडे आस तनकी हि ॥ ३ ॥

॥ ११७० ॥

रामभजन सब सार मिठाई । हरि संताप जनमदुख राई ॥ ध्रु ॥
दुधभात घृत संकरपारे[13] । हरते भुक नाहि अंततारे[14] ॥ १ ॥
खावत जुग सब चलिजावे । खटमिठा[15] फिर पचतावे ॥ २ ॥

---

१ पं. तालुम नहि परे । नन्हे वरे गये हिसारे ॥.–२ पं. पाछे चलनार तुं हि.–३ पं. सोपत.–४ पं. तों मन मेरा.–५ पं. सुटा.–६ दे. समज्यात.–७ पं. जोडत हि.–८ पं. देखो आखो० घर बारा.–९ पं. पसारा राख.–१० सवसारा.–११ पं. चलावे खरा.–१२ पं. सो सन्यास छोडे तनकी ही आस.–१३ पं. साकरपारे.–१४ पं. अनंत तारे.–१५ पं. खाट मीठापर चलावे.

* " सेत " असावें.

कहे तुका रामरस जो पीवे[1] । बहुरि फेरा वो कबहु न खावे ॥ ३ ॥

॥ ११७१ ॥

बा[2]रबार काहे मरत अभागी । बहुरि मरन संकेया[+] तोरि[3]भांगी ॥ ध्रु ॥

ये हि तन करते क्या ना होय । भजन भगति करे बैकुंठे जाय ॥१॥

रामनाम मोल नहिं बेचे कबरि । वो हि सब माया छुरावत झगरी[4] ॥२॥

कहे तुका मनसुं[5] मिल राखो । रामरस जिव्हा नित्य[6] चाखो ॥ ३ ॥

॥ ११७२ ॥

हम उदास तीन्हके[7] सुनाहो लोका । रावणमार बिभीषण दिई लंका ॥ध्रु॥

गोबरधन नखपर गोकुल राखा । बर्सन लागा जब मेंहु[8] फत्तरका ॥१॥

बैकुंठनायक काल कौंसासुरका । दैत डुबाय सब मंगाय गोपिका ॥२॥

स्तंभ फोड पेट चिरीया केश्यपका[9] । प्रल्हादके लियें कहे भाई तुकयाका[10] ॥३॥

॥ २२ ॥

॥ सांख्या[*] ३० ॥

॥ ११७३ ॥

तुका बस्तर विचारा क्यौं करे[11] रे । अंतर भगवान होय ।

भीतर मैला कैंव मिटे[+] रे । मरे उपर धोय ॥ १ ॥

॥ ११७४ ॥

रामराम कहे[12] रे मन । औरसुं नहिं काज ।

बहुत उतारे पार । आघे राख तुकाकी लाज ॥ १ ॥

---

१ पं. पीवे.—२ दे बारंबार.—३ पं. मरनसे क्या तोरे भोगी.—४ पं. छुरावन सगरी.—५ पं. रामनसुं —६ प. नित.—७ पं. तीन्हको सुनाउं. त. हामदास तीन्हके सुनाहो.—८ पं. लगा जब मह्नु.—९ दे. कसेपका. पं. कशपका —१० पं. तुकाका.—११ पं. क्या करे ।.—१२ पं. कहे मन. * पं. "दोहोरे" हें सदर आहे.

+ "संका;" + "भेटे;" असावें.

॥ ११७५ ॥

लोभीकें चित धन बैठे । कामीन चित काम ।
माताके चित पुत बैठें । तुकाके[1] मन राम ॥ १ ॥

॥ ११७६ ॥

तुका पंखिबहिरन मानुं । बोई जनावर बाग ।
असंतनेकुं[2] संत न मानूं । जे वर्मकुं दाग ॥ १ ॥

॥ ११७७ ॥

तुका राम बहुत मिठा रे । भर राखूं शरीर ।
तनकी करूं नावरि[3] उतारूं पैल तीर ॥ १ ॥

॥ ११७८ ॥

संतन[4] पन्हर्या लें खडा । राहूं ठाकुरद्वार ।
चलत पाछेंहुं फिरों । रज उडत लेऊं सीर ॥ १ ॥

॥ ११७९ ॥

तुकाप्रभु[5] बडो न मनूं न मानूं बडो । जिसपास बहु दाम ॥
बलिहारि उस मुखकी । जिसेंती[6] निकसे राम ॥ १ ॥

॥ ११८० ॥

राम कहे सो मुख भलारे । खाये खीर खांड ।
हरिबिन मुखमो धूल परी रे । क्या जनि उस रांड ॥ १ ॥

॥ ११८१ ॥

राम कहे सो मुख भला रे । बिन रामसें बीख ।
आब न जानूं रमते बेरों । जब काल लगावे सीख ॥ १ ॥

॥ ११८२ ॥

कहे तुका मैं[7] सवदा बेचूं । लेवेके तन हार ।

---

१ पं. तुकाके राम.–२ पं. असंतकु.–३ पं. तावरी.–४ पं. त. संत.–५ त. तुका प्रभु बडो न मानु । पं.० नमानो.–६ दे. जीसेंती.–७ दे. पं. में.

मिठा साधुसंतजन रे । मुरुखके सिर[1] मार ॥ १ ॥

॥ ११८३ ॥

तुका दास तिनका रे । रामभजन निरास ।
क्या बिचारे पंडित करो रे । हात[2] पसारे आस ॥ १ ॥

॥ ११८४ ॥

तुका प्रीत रामसुं । तैसी मिठी राख ।
पतंग जाय दीप[3] परे रे । करे तनकी खाक ॥ १ ॥

॥ ११८५ ॥

कहे तुका जग भुला रे । कह्या न मानत कोय ।
हात परे[4] जब कालके । मारत फोरत डोय ॥ १ ॥

॥ ११८६ ॥

तुका सुरा नहि सबदका रे । जब कमाइ न होये ॥
चोट सहे[5] घनकि रे । हिरा नीबरे तोये ॥ १ ॥

॥ ११८७ ॥

तुका सुरा[6] बहुत कहावे । लडत विरला कोये ।
एक पावे उंच पदवी । एक खोंसा जोये ॥ १ ॥

॥ ११८८ ॥

तुका माऱ्या पेटका । और न जाने कोये ।
जपता कछु रामनाम । हरिभगतनकी सोये ॥ १ ॥

---

१ पं. सीस.—२ पं. जब पसारे हात । .—३ त. दीपपर—४ त. पडे.—५ पं.० साहे जबघन.—६ पं. सुर बहुत.

॥ ११८९ ॥

काफर सोही आपण बुझे । आला दुनियां भर ।
कहे तुका तुम्हें सुनो[1] रे भाई । हिरिदो[2] जिन्होका कठोर ॥ १ ॥

॥ ११९० ॥

भस्ति* न पावे मालथी । पढीया लोक रिझाये ।
निचा जथें कमतरिण[3] । सो ही सो फल खाये ॥ १ ॥

॥ ११९१ ॥

फल पाया तो खुस[4] भया । किन्होसुं[5] न करे बाद ।
बान न देखे मिरगा[6] रे । चित मिलाया नाद ॥ १ ॥

॥ ११९२ ॥

तुका दास रामका । मनमे एक हि भाव ।
तो न पालटू आब । ये हि तन जाव ॥ १ ॥

॥ ११९३ ॥

तुका रामसुं चित बांध राखूं । तैसा आपनी[7] हात ॥
धेनु बछरा छोर जावे । प्रेम न छुटे सात ॥ १ ॥

॥ ११९४ ॥

चितसुं चित जब मिले । तब तनु थंडा होये ।
तुका मिलना[8] जिन्होसुं । ऐसा बिरला कोये ॥ १ ॥

॥ ११९५ ॥

चित मिले तो सब मिले । नहिं तो फुकट संग ।

---

१ पं. भार.—२ पं. हिरदा जिन्हका.० हिरदा जिण्हेका०—३ पं. कमतारीण.—४ पं. सुख.—५ पं. किन्हे सुंनकरवे.—६ पं. मिरगी ।.—७ पं. आनि.—८ पं. मिलन

* "भेस्त" असावें.

पानी पथर[1] येक ही ठोर । कोरनभिगे अंग ॥ १ ॥

११९६

तुका संगत तीन्हसें कहिये । जिनथें सुख[2] दुनाये ।
दुर्जन तेरा मूं काला । थीतो प्रेम घटाये ॥ १ ॥

॥ ११९७ ॥

तुका मिलना तो भला । मनसुं मन मिल जाय ।
उपर उपर माटि घसनी । उनकि कोन बराई ॥ १ ॥

॥ ११९८ ॥

तुका कुटुंब छोरे रे । लरके जोरों[3] सिर मुंदाय ।
जबथे इच्छा नाहिं मुई । तब तूं किया काय ॥ १ ॥

॥ ११९९ ॥

तुका इच्छा मीटइ तो । काहा करे जट खाक ।
मथीया गोला डारदिया तो । नहिं मिले फेरन ताक ॥ १ ॥

॥ १२०० ॥

ब्रीद मेरे साइंयांके[4] । तुका चलावे पास ।
सुरा सो हि लरे हमसें । छोरे तनकी आस ॥

॥ १२०१ ॥

कहे तुका भला भया । हुं* हुवा संतनका दास ।
क्या जानूं केते मरता । जो* न मिटती मनकी आस ॥ १ ॥

---

१ दे. त. पाथर, पं. पानी पथर येक ठोर ।. कोरन भिजे—२ पं. मुख.—३ पं. जोरे.—
४ त. साईका.— * पं. "हुं" व "जो न" हे शब्द नाहींत.

॥ १२०२ ॥

तुका और मिठाई क्या करूं रे । पाले बिकारपिंड ।
राम कहावे सो भली रुखी । मांखन[1] खांडखीर ॥ १ ॥

॥ ३० ॥

॥ १२०३ ॥

ह्मणसी नाहीं रे संचित । न करीं न करीं ऐसी मात ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लाहो घेईं हरिनामाचा । जन्म जाऊं नेदीं साचा ॥ ध्रु ॥
गळां[2] पडेल यमफांसीं । मग कैंचा हरि ह्मणसी ॥ २ ॥
पुरलासाटीं देहाडा । ऐसें न ह्मणें न ह्मणें मूढा ॥ ३ ॥
नरदेह दुबळा । ऐसें न ह्मणें रे चांडाळा ॥ ४ ॥
तुका ह्मणे सांगों किती । सेकीं[3] तोंडीं पडेल[4] माती ॥ ५ ॥

॥ १२०४ ॥

संतांचा महिमा तो बहु दुर्गम । शाब्दिकांचें काम नाहीं येथें ॥ १ ॥
बहु थड जरी जाली ह्मैस गाय । तरी होईल काय कामधेनु ॥ २ ॥
तुका ह्मणे अंगें[5] व्हावें तें आपण । तरी च महिमान येईल कळों ॥ ३ ॥

॥ १२०५ ॥

नाहीं संतपण मिळतें[6] हें हाटीं । हिंडतां कपाटीं रानीं वनीं ॥ ॥
नये मोल देतां धनाचिया राशी । नाहीं तें आकाशीं पाताळीं तें ॥ २ ॥
तुका ह्मणे मिळे जिवाचिये साटीं । नाहीं तरी गोष्टी बोलों नये ॥ ३ ॥

॥ १२०६ ॥

नामाची आवडी तो चि जाणा देव । न धरीं[7] संदेह कांहीं मनीं ॥ १ ॥

---

१ पं माखना. त. माखन खीर खांड.—२ दे. गळां पडेल यमफांसा.—३ पं. शेखी.—४ त. पडे.—५ पं. भांग.—६ त पं. मीळत.—७ पं. धरा.

॥ ध्रु. ॥ ऐसें मी हें नाहीं बोलत नेणतां ।
आणोनि संमता संतांचिया ॥ ध्रु ॥
नाम ह्मणे तया आणिक साधन । ऐसें हें वचन बोलों नये ॥ २ ॥
तुका ह्मणे सुख पावे या वचनीं । ज्यांचीं शुद्ध दोन्ही मायबापें ॥ ३ ॥

॥ १२०७ ॥

सुखें होतों कोठें घेतली सुती । बांधाविला गळा आपुले हातीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करूं बहु गुंतलों आतां । नये सरतां मागें पुढें ॥ ध्रु ॥
होतें गांठी तें सरलें येतां । आणीक माथां ऋणें जालें ॥ २ ॥
सोंकरिलियाविण गमाविलें पिक । रांडापोरें भिके लावियेलीं ॥ ३ ॥
बहुतांचीं बहु घेतलीं घरें । न पडे पुरें कांहीं केल्या ॥ ४ ॥
तुका ह्मणे कांहीं न धरावी आस । जावें हें सर्वस्व टाकोनियां ॥ ५ ॥

॥ १२०८ ॥

न मनावें तैसें गुरूचें वचन । जेणें नारायण अंतरे तें ॥
आड आला ह्मूनं फोडियेला डोळा । बळिनें आंधळा शुक्र केला ॥१॥
करी देव तरी काय नव्हे एक । कां तुह्मी पृथक सिणा वांयां ॥ ध्रु ॥
उल्लंघुनियां भ्रताराची आज्ञा । अन्न ऋषिपत्न्या घेउनि गेल्या ॥
अवघे चि त्यांचें देवें केलें काज । धर्म आणि लाज राखियेली ॥ २ ॥
पितियांसी पुत्रें केला वैराकार । प्रल्हादें असुर मारविला ॥
बहुत विघ्नें केलीं तया आड । परि नाहीं कैवाड सांडियेला ॥ ३ ॥

१ दे. आनुनि. पं. जाणोनी संमता संतांचिया.–२ पं. उरलें.–३ प. ज्याचे शुद्ध दोनी मायेबाप.–४ पं. आतां.– ५ पं. दे. त. रीण.– ६ पं सोकराविल्याविणे.– ७ पं ह्मणोनी.– ८ दे. त. तें.–९ दे. त. उलंघुनि.–१० पं. पितयासी.–११ पं. आड आड.

गौळणी करिती देवाशीं व्यभिचार । सांडुनी आचार भ्रष्ट होती ।
तयांसी दिलें तें कवणासी नाहीं । अवघा अंतर्बाहीं तो[2] चि जाला ॥ ४ ॥
देव जोडे ते[3] करावे अधर्म । अंतरे तें कर्म नाचरावें ।
तुका ह्मणे हा जाणतो कळवळा । ह्मणोनि अजामेळा उद्धरिलें ॥ ५ ॥

॥ १२०९ ॥

अरे गिळिलें हो संसारें । कांहीं तरि राखा खरें ।
दिला करुणाकरें । मनुष्यदेह स[4]त्संग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येथें न घलीं न घलीं आड । संचितसा शब्द नाड ।
उठाउठीं गोडें । बीजें बीज वाढवा ॥ ध्रु ॥
केलें तें क्रियमाण । जालें तें संचित ह्मण ।
प्रा[6]रब्ध जाण । उरवरित उरलें तें ॥ २ ॥
चित्त खोटें चालीवरि । रोग भोगाचे अंतरीं ।
रसने अनावरी । तुका ह्मणे ढुंगँ वाहे ॥ ३ ॥

॥ १२१० ॥

अग्न तापलिया काया चि होमे । तापत्रयें संतप्त होती ।
संचित क्रियमाण प्रारब्ध तेथें । न चुके संसारस्थिति ।
राहाटघटिका जैसी फिरतां चि राहिली । भरली जाती एके रितीं ।
सोंवीं हा प्रपंच पंचाय अग्न । तेणें पावसील निजशांती रे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नारायणनाम नारायणनाम । नित्य करीं काम जिव्हामुखें ।
जन्मजराव्याधि पापपुण्य तेथें । नासती सकळ ही दुंखें ॥ ध्रु ॥

---

१ दे. तयां दिलें ते कोणासी नाहीं । तं. तयां दिलें तैसें कवणासी नाहीं.—२ पं. हरी जाला.—३ पं. तरी करावा अधर्म—४ पं. संतसंग.—५ पं. कोड.—६ पं. प्रारब्ध तें जाण । उरउरीत उले ते.—७ पं. ढुंढुंग.—८ पं. जाली होती रिती.—९ पं. एके रिती सार्धीं०.—१० पं. दुःखें रे.

शीत उष्ण वन सेवितां कपाट । आसनसमाधी साधीं ।
तप तीर्थ दान व्रत आचरण । यज्ञ नाना मन बुद्धी ।
भोगाभोग तेथें न चुकती प्रकार । जन्मजरादुःखव्याधि[1] ।
साहोनि काम क्रोध अहंकार । आश्रमीं अविनाश सोधीं[2] ॥ २ ॥
घोकितां अक्षर अभिमानविधि[3] । निषेध लागला पाठी ।
वाद करितां निंदा घडती दोष । होय वज्रलेपो भविष्यति ।
दूषणाचें मूळ भूषण तुका ह्मणे । सांडीं मिथ्या खंती ।
रिघोनि संतां शरण सर्वभावें । राहें भलतिया स्थितीं ॥ ३ ॥

॥ १२११ ॥

नव्हे गुह्यदास्य संसारियां । वैराग्य तरी भेणें कांपे विषयां ।
तैसें नाम[4] नव्हे पंढरीराया । जया सायास न लगती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनि गोड सर्वभावें । आंघोळी न लगे तोंड धुवावें ।
अर्थचाड जीवें । न लगे भ्यावें संसारा ॥ ध्रु ॥
कर्मा तंव न पुरे संसारिक । धर्म तंवें[5] फळदायक ।
नाम विठ्ठलाचें एक । नाशी दुःख भवाचें ॥ २ ॥
न लगे सांडणें मांडणें । आगमनिगमाचें देखणें ।
अवघें तुका ह्मणे[5] । विठ्ठलनामें आटलें ॥ ३ ॥

॥ १२१२ ॥

नये इच्छूं सेवा स्वइच्छा जगाची । अवज्ञा देवाची घडे तेणें ॥ १ ॥
॥ध्रु. ॥ देहाचा निग्रही त्याचें तो सांभाळी । मग नये कळि अंगावरी ॥ध्रु॥

---

१ पं. जन्म मरण जरा०.—२ पं. साधीं रे.—३ पं. अभिमाना.—४ दे. नाम पंढरी राया.—
५ पं. तरी.—५ पं. ह्मणे येणें.

आपलिया इच्छा माता सेवा करी। न बाधी ते थोरी येणें क्षोभें ॥ २ ॥
तुका ह्मणे सांडा देखीचे दिमाख । मोडसीचें दुःख गांड फाडी ॥ ३ ॥

॥ १२१३ ॥

सत्य[1] सत्यें देतें फळ । नाहीं लागत चि बळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ध्यावे देवाचे ते पाय । धीर सकळ उपाय ॥ ध्रु ॥
करावी च चिंता । नाहीं लागत[2] तत्वता ॥ २ ॥
तुका ह्मणे भावें । शरण ह्मणवितां बरवें ॥ ३ ॥

॥ १२१४ ॥

साधक जाले कळी । गुरुगुडीची[3] लांब नळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पचीं पडे[4] मद्यपान । भांगभुर्का हें साधन ॥ ध्रु ॥
अभेदाचें[5] पाठांतर । अति विषयीं पडिभर ॥ २ ॥
चेल्यांचा सुकाळ । पिंड दंड भंगपाळ[6] ॥ ३ ॥
सेवा मानधन । बरे इच्छेनें संपन्न ॥ ४ ॥
सोंगाच्या नरकाडी । तुका बोडोनियां[7] सोडी ॥ ५ ॥

॥ १२१५ ॥

मज पाहातां हें लटिकें सकळ । कोठें मायाजाळ दावीं देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोणाचा कोणासीं न धरे[8] संबंध । आहे शुद्धबुद्ध ठायींचे ठायीं ॥ध्रु॥
कांढा[9] जी आपुलें मोह बुंथी जाळें । नका लावूं वेड[10] वळें वेड आह्मां ॥ २ ॥
जीव शिव कांहीं[11] ठेवियेली नांवें । सत्य तुह्मां ठावें असोनियां ॥ ३ ॥
सेवेच्या अभिलाषें[12] न धरा चि विचार । आह्मां दारोदार हिंडविलें ॥ ४ ॥

---

१ त. सत्ये सत्य. पं. सत्य सत्य.—२ दे त. लागती.—३ पं. गुडगुडीची.—४ पं. पडिलें.—५ दे. अभेदाचा.—६ पं. भगपाळ.—७ पं. बोडोनियां—८ पं. न धरवे.—९ दे. काढा काढा जी० जाळ. पं. जाळ.—१० पं. वेड वळें.—११ दे. कां ठेवियेली.—१२ दे. त. अभिळासें.

आहे तैसें आतां कळलियावरी । परतें सांडा दुरी दुर्जेपण ॥ ५ ॥
तुका ह्मणे काय छायेचा अभिलाष । हंस पावे नाश तारागणीं ॥ ६ ॥

॥ १२१६ ॥

पंचभूतांचा गोंधळ । केला एकेठायीं मेळ ।
लाविला सबळ । अहंकार त्यापाठीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें काय मी तें माझें । कोण वागवी हें ओझें ।
देहा केवीं रिझे । हें काळाचें भातुकें ॥ ध्रु ॥
जीव न देखे मरण । धरी नवीं सांडी जीर्ण ।
संचित प्रमाण । भोगा शुभा अशुभा ॥ २ ॥
इच्छा वाढवी ते वेल । खुंटावा तो खरा बोल ।
तुका ह्मणे मोल । झांकलें तें पावेल ॥ ३ ॥

॥ १२१७ ॥

पुसावेंसें हें चि वाटे । जें जें भेटे तयासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव कृपा करील मज । काय लाज राखील ॥ ध्रु ॥
अवघियांचा विसर जाला । हा राहिला उद्योग ॥ २ ॥
तुका ह्मणे चिंता वाटे । कोण भेटे सांगेसें ॥ ३ ॥

॥ १२१८ ॥

जाला तुह्मी माझें जाणतें मीपण । येणें माझा खुण मांडियेला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खादलें पचे तरि च तें हित । ओकलिया थीत पिंड पीडी ॥ध्रु॥
तरि भलें भोगे जोडिलें तें धन । पडिलिया खानें जीवनासी ॥ २ ॥
तुका ह्मणे मज तारीं गा विठ्ठला । नेणतां चि भला दास तुझा ॥ ३ ॥

---

१ त. पं. तारांगणीं—२ पं. एके ठायीं केला मेळ । .—३ पं. भोग शुभा अशुभाच्या ।—४ पं. झाकेल तो पावेल । .—५ त. उद्येग. दे. उदेग.—६ पं. सांगेसा.—७ पं. खादल्या खादलें हें पचे.—८ त. खान. पं. खाण.

॥ १२१९ ॥

याती मतिहीन रूपें लीन दीन । आणीक अवगुण जाणोनियां ॥ १ ॥

॥ध्रु.॥ केला त्या विठ्ठलें माझा अंगीकार । ऐसा हा विचार जाणोनियां ॥ध्रु.॥

जें कांहीं करितों तें माझें स्वहित । आली हे प्रचित कळों चित्ता ॥ २ ॥

जालें सुख जीवा आनंद अपार । परमानंदें भार घेतला माझा ॥ ३ ॥

तुका ह्मणे यांसी नांवाचा[1] अभिमान । ह्मणोनि शरण तारी बळें ॥ ४ ॥

॥ १२२० ॥

बहु उतावीळ भक्तीचिया काजा । होसी केशीराजा मायबापा ॥ १ ॥

॥ध्रु.॥ तुझ्या पायीं मज जालासे विश्वास । ह्मणोनियां आस मोकलिली ॥ध्रु.॥

ऋषि मुनि सिद्ध साधक अपार । कळला[2] विचार त्यांसी तुझा ॥ २ ॥

नाहीं नास[3] तें सुख दिलें तयांस । जाले जे उदास सर्वभावें ॥ ३ ॥

तुका ह्मणे सुख न माये मानसीं । धरिलें जीवेंसी पाय तुझे ॥ ४ ॥

॥ १२२१ ॥

मायामोह[4]जाळीं होतों सांपडला[5] । परि या विठ्ठला कृपा आली ॥ १ ॥

॥ध्रु.॥ काढूनि बाहेरि ठेविलों निराळा । कवतुक डोळां दाखविलें ॥ध्रु.॥

नाचे उडे माया करी कवतुक । नाशवंत[6] सुखें साच केलीं ॥ २ ॥

रडे फुंदे दुःखें कुटितील माथा । एकासी रडतां तें ही मरे ॥ ३ ॥

तुका ह्मणे मज वाटतें नवल । मी माझें[7] हे बोल ऐकोनियां ॥ ४ ॥

॥ १२२२ ॥

देहभाव आह्मी राहिलों ठेवूनि । निवांत चरणीं विठोबाच्या ॥ १ ॥

---

१ पं. यास नामाचा.—२ पं. कळला हा विचार० —३ पं. नाश.—४ दे. त. माया मोहो०.—५ दे. सांपडलों.—६ दे. त. पं. नासिवंत.—७ दे. मी माझे बोल०. पं. मी हे माझे बोल०.

॥ ध्रु. ॥ आमुच्या हिताचा जाणोनि उपाव । तो चि पुढें देव करीतसे ॥ ध्रु.॥
ह्मणउनी नाहीं सुख दुःख मनीं । ऐकिलिया कानी वचनाचें ॥ २ ॥
जालों मी निःसंग निवांत एकला । भार त्या विठ्ठला घालूनियां ॥ ३ ॥
तुका ह्मणे जालों जयाचे अंकित । तो चि माझें हित सर्व जाणे ॥ ४ ॥

॥ १२२३ ॥

आलें फळ तेव्हां राहिलें पिकोन । जरि तें जतन होय देठीं[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नामें चि सिद्धि नामें चि सिद्धि । व्यभिचारबुद्धि न पवतां ॥ ध्रु.
चालिला पंथ तो पांववील[2] ठाया । जरि आड तया नये कांहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मध्यें पडती आघात । तेणें होय घात हानि[3] लाभ ॥ ३ ॥

॥ १२२४ ॥

निरोयाचें मज न साहि वचन । बहु होतें मन कासावीस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि जीवा न साहे संगति । बैसतां एकांतीं गोड वाटे ॥ ध्रु.
देहाची भावना वासनेचा संग । नांवडे[4] उबग आला यांचा ॥ २ ॥
तुका ह्मणे देव अंतरे ज्यांमुळें । आशामोह[6]जाळें दुःख वाढे[7] ॥ ३ ॥

॥ १२२५ ॥

तुजशी संबंध चि खोटा । परता परता रे थोटा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देवा तुझें काय घ्यावें । आप आपणां ठकावें[10] ॥ ध्रु. ॥
जेथें मुदल न ये हातां । व्याज मरावें लेखितां ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसा । त्रिभुवनीं तुझा ठसा ॥ ३ ॥

---

१ पं. देटी.—२ दे. पावईल.—३ दे. त. प. हाणी.—४ त न साहे उबग०—५ पं. यामुळें.—६ दे. त.० मोहो जाळे०.—७ पं. वाटे.—८ पं. संबंध तो खोटा.—९ पं. रे तूं खोटा.—१० पं. टकावे.

॥ १२२६ ॥

या चि हाका तुझे द्वारीं । सदा देखों ऋणकरी[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सदा करिती[2] खंड दंड । देवा बहु[3] गा तूं लंड ॥ ध्रु ॥
सुखें गोविसी भोजना । लपवूनियां आपणां ॥ २ ॥
एँकें[4] एक बुझाविसी । तुका ह्मणे ठक होसी ॥ ३ ॥

॥ १२२७ ॥

आह्मी जाणों तुझा भाव । दृढ धरियेले पाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फांकूं नेदूं चुकावितां । नेघों थोडें बहु देतां ॥ ध्रु ॥
बहुता दिसाचें लिगाड । आलें होत होत जड ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां । नेघों[5] सर्वस्व ही देतां ॥ ३ ॥

॥ १२२८ ॥

ऋण[6] वैर हत्या । हें तों न सुटे नेंदितां[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें कां नेणां पांडुरंगा । तुह्मी सांगतसां जगा ॥ ध्रु ॥
माझा संबंध तो किती । चुकवा लोकाची फजिती ॥ २ ॥
तुका ह्मणे या चि साठीं । मज[8] न घेतां नये तुटी ॥ ३ ॥

॥ १२२९ ॥

नाहीं मागितला । तुह्मां मान ऱ्यां विठ्ठला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जे हे करविली फजिती । माझी एवढी जना हातीं ॥ ध्रु ॥
नाहीं केला पोटें[9] । पुढें घालूनि बोभाट ॥ २ ॥
तुका ह्मणे धरूनि हात । नाहीं नेलें[10] दिवाणांत ॥ ३ ॥

---

१ दे. रिणकरी. त. पं. रीणकरी.—२ दे. करिसी—३ पं. बहुत.—४ पं. एक एक.—५ दे. त. नेघें.—६ दे. रिण. पं. त. रीण०.—७ "न देतां" याच्या बद्दल "नेंदितां."—८ पं. मज घेतां नये तुटी.—९ पं. पोटें.—१० पं. नाहीं केली दिवानांत. दे. नाहीं नेलें. दिवानांत.

॥ १२३० ॥

तूं पांढरा स्पटिक मणी । करिसी आणिकां त्याहुनि ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ह्मणोनि तुझ्या दारा । न येत ठकती दातारा ॥ ध्रु ॥

तुझी ठावी नांदणूक[1] । अवघा बुडविला लोके[2] ॥ २ ॥

तुका ह्मणे ज्याचें घेसी । त्यास हें चि दाखविसी ॥ ३ ॥

॥ १२३१ ॥

बोलतों निकुरें । नव्हेत[3] सलगीचीं उत्तरें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझें संतापलें मन । परपीडा ऐकोन ॥ ध्रु ॥

अंगावरि आलें । तोंवरि जाईल सोसिलें ॥ २ ॥

तुज भक्तांची आण देवा । जरि[4] तुका येथें ठेवा ॥ ३ ॥

॥ १२३२ ॥

बुद्धीचा जनिता लक्ष्मीचा पति । आठवितां चित्तीं काय नव्हे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आणिकां उपायां कोण वांटी मन ।

सुखाचें निधान पांडुरंग ॥ ध्रु ॥

गीतें[5] गावों नाचों छंदें वावों टाळी । वैष्णवांचे मेळीं सुखरूप ॥ २ ॥

अनंत ब्रह्मांडें एके रोमावळी । आह्मी केला भोळीं भावें उभा ॥ ३ ॥

लंटिका[6] हा केला संवसार[7]सिंधु । मोक्ष खरा बंधु नाहीं पुढें ॥ ४ ॥

तुका ह्मणे ज्याच्या नामाचें अंकित । राहिलों निश्चिंत[8] त्याच्या बळें ॥ ५ ॥

॥ १२३३ ॥

न लगे मायेसी बाळें[9] निरवावें । आपुल्या स्वभावें ओढे त्यासी ॥ १ ॥

---

१ दे. नांदनूक.—२ पं. लौकिक—३ पं. नव्हती.—४ पं. तरी.—५ पं. गीतीं गावों नाम । छंदें वाहों टाळी । त.० वाहों०.—६ दे. लडिका.—७ पं. संसार—८ पं. निश्चित.—९ पं. बाळ.

॥ ध्रु. ॥ मज कां लागला करणें विचार । ज्याचा जार भार त्याचे माथां ॥ ध्रु ॥

गोड घड त्यासी ठेवी न मागतां । समाधान खातां नेदी मना ॥ २ ॥

खेळतां गुंतलें उमगूनी आणी । बैसोनियां स्तनीं लावी बळें ॥ ३ ॥

त्याच्या दुःखेपणें आपण खापरीं । लाही तळीं वरी होय जैसी ॥ ४ ॥

तुका ह्मणे देह विसरे आपुला । आघात तो त्याला लागों नेदी ॥ ५ ॥

॥ १२३४ ॥

ब्राह्मण तो नव्हे ऐसी ज्याची बुद्धि । पाहा श्रुतीमधीं विचारूनि ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जयासी नावडे हरिनामकीर्तन । आणीक नृत्य न वैष्णवांचें ॥ ध्रु ॥

सत्य त्याचे वेळे घडला व्यभिचार । मातेसी वेव्हार अंत्यजाचा ॥ २ ॥

तुका ह्मणे येथें मानी आनसारिखें । तात्काळ तो मुखें कुष्ठ होय ॥ ३ ॥

॥ १२३५ ॥

ब्राह्मण तो याती अंत्यजं असतां । मानावा तत्वता निश्चयेसीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ रामकृष्णनामें उच्चारी सरळें । आठवी सांवळें रूप मनीं ॥ ध्रु ॥

शांति क्षमा दया अलंकार अंगीं । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥ २ ॥

तुका ह्मणे गेल्या षडुऊर्मी अंगें । सांडुनियां मग ब्रह्म चि तो ॥ ३ ॥

॥ १२३६ ॥

एक करिती गुरु गुरु । भोंवता भारु शिष्यांचा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पुंस नाहीं पाय चारी । मनुष्य परी कुतरीं तीं ॥ ध्रु ॥

---

१ दे मगता.–२ पं दुःखें पडे. (दुःखी पणें ?) –३ पं. नाम संकीर्तन ।.–४ "नर्त्तन" असावें.–५ पं. व्यवहार.–६ दे. अंतेजाचा –७ दे. त. पं. कुष्ट.–८ दे. अंतेज.–९ दे. रामकृष्णें नाम उच्चारि सरळें । त. रामकृष्ण नाम०.–१० पं. सरळ.–११ दे. त. पं. शडऊर्मी.–१२ पं. ब्राह्मण तो.

परस्त्री मद्यपान । पेंडखोन[1] माजविलें ॥ २ ॥
तुका ह्मणे निर्भर चित्तीं । अधोगती जावया ॥ ३ ॥

॥ १२३७ ॥

एका पुरुषा दोघी नारी । पाप वसे त्यांचे[2] घरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाप न लगे धुंडावें । लागेल तेणें[3] तेथें जावें ॥ ध्रु ॥
कांहीं दुसरा विचार । न लगे करावा चि फार ॥ २ ॥
[4]असत्य जे वाणी । तेथें पापाची च खाणी ॥ ३ ॥
सत्य बोले मुखें । तेथें उचंबळती सुखें ॥ ४ ॥
तुका ह्मणे दोन्ही । जवळीच लाभहानी ॥ ५ ॥

॥ १२३८ ॥

[5]जळतें संचित । ऐसी आहे धर्म नीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझ्या विठोबाचे पाय । वेळोवेळां मनीं ध्याय ॥ ध्रु ॥
नेदी कर्म घडों । कोठें आडराणें[6] पडों ॥ २ ॥
तुका ह्मणे मळ । राहों नेदी ताप जाळ ॥ ३ ॥

॥ १२३९ ॥

संतापाशीं बहु असावें मर्यादा । फलकटाचा[7] धंदा उर फोडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बासर तो भुंके गाढवाचेपरी । उडे पाठीवरि दंड[8] तेणें ॥ ध्रु ॥
समय नेणे तें वेडें चाहाटळ । अवगुणाचा ओंगळ मान पावे ॥ २ ॥
तुका ह्मणे काय वांयां चाळवणी । पिटपिटघाणी हागवणेची ॥ ३ ॥

---

१ पं. पेडखाण —२ त. तया घरीं —३ त त्याणे.—४ प. असत्याची वाणी.—५ दे. जळावें. पं. जळे तें.—६ पं आडराणी.—७ पं. फलकटेचा.—८ पं. यमदंड.

॥ १२४० ॥

घेसी तरी घेई संतांची[1] हे भेटी । आणीक ते गोष्टी नको मना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्वभावें त्यांचें देव भांडवल । आणीक ते बोल न बोलनी ॥ ध्रु ॥
करिसील तो करीं संतांचा सांगत । आणीक ते मात नको मना ॥ २ ॥
बैसैसी[2] तरी बैस संतां च मधीं । आणीक ते बुद्धि नको मना ॥ ३ ॥
जासी तरि जाई संतांचिया गांवां । होईल विसावा तेथें मना ॥ ४ ॥
तुका ह्मणे संत सुखाचे सागर । मना निरंतर धणी घेई ॥ ५ ॥

॥ १२४१ ॥

संतांचिये गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें मी राहीन[3] होऊनि याचक । घालितील भीक ते चि मज ॥ ध्रु
संतांचिये गांवीं वरो भांडवल । अवघा विठ्ठल धन वित्त ॥ २ ॥
संतांचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्वकाळ ॥ ३ ॥
संतांचा उदीम उपदेशाची पेंठ । प्रेमसुख साटीं घेती देती ॥ ४ ॥
तुका ह्मणे तेथें आणिक नाहीं परी । ह्मणोनि भिकारी जालों त्यांचा ॥ ५

॥ १२४२ ॥

संतांचें[4] सुख जालें या देवा । ह्मणऊनि सेवा करी त्यांची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें माझा काय कोण तो विचार । वर्णावया पार महिमा त्यांचा ॥ ध्रु ॥
निर्गुण आकार जाला गुणवंत । घाली दंडवत पूजोनियां ॥ २ ॥
तीर्थें त्यांची इच्छा करिती नित्यकाळ । व्हावया निर्मळ आगणांसी ॥ ३ ॥

---

१ दे. संताची भेटी.—२ पं. बैससील तर । बैस संतांमधीं ।—३ त. पं राहेन.—४ त. संतांचें या सुख जालें तें या देवा । .

अष्टमा सिद्धींचा कोण आला पाड । वाग़ों नेदी आड कोणी तया ॥ ४ ॥
तुका ह्मणे ते बळिया शिरोमणी । राहिलों चरणीं निकटवासें ॥ ५ ॥

॥ १२४३ ॥

जो मानी तो देईल काई । न मनी तो नेईल काई ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मां विठ्ठल सर्वभूतीं । राहो[1] चित्तीं भलतैसा ॥ ध्रु ॥
ओधीन[2] तें जना काई । जळें वांयांविण ठायीं ॥ २ ॥
वंदी निंदी तुज तो गा । तुका ह्मणे पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ १२४४ ॥

भावबळें कैसा जालासी लाहान । मागें संतीं ध्यान वर्णियेलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तें मज उचित करूनियां देवा । दाखवीं केशवा मायबापा ॥ ध्रु ॥
पाहोनियां डोळां बोलेन मी गोष्टी । आलिंगूनि[3] मिठी देइन पांयीं ॥ २ ॥
चरणीं दृष्टि उभा राहेन समोर । जोडोनियां कर पुढें दोन्ही ॥ ३ ॥
तुका ह्मणे उत्कंठित[4] वासना । पुरवीं नारायणा आर्त माझें ॥ ४ ॥

॥ १२४५ ॥

कृपाळु ह्मणोनि बोलती पुराणें । निर्धार वचनें यांचीं मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीक उपाय [5]नेणें चि मी कांहीं । तुझें वर्म ठायीं पडे तैसें[6] ॥ ध्रु ॥
नये धड कांहीं बोलतां वचन । रिघालों शरण सर्वभावें ॥ २ ॥
कृपा करिसी तरि थोडें तुज काम । माझा तरि श्रम बहु हरे ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज दाखवीं श्रीमुख । हरेल या भूक डोळियांची ॥ ४ ॥

---

१ पं. हो चित्तीं०.—२ दे. त. आध्येन.—३ दे. त. आळंगुनि.—४ पं. उत्कंठित हे वासना.—५ दे. नेणें मी कांहीं. त. नेणें मी हे कांहीं.—६ पं. ऐसें.

॥ १२४६ ॥

सर्वभावें आलों तुज चि शरण । कायावाचामनेंसहित देवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीक दुसरें नये माझ्या मना । राहिली वासना तुझ्या पायीं ॥ ध्रु.॥
माझिये वारचें कांहीं जडभारी । तुजविण वारी कोण एक ॥ २ ॥
तुझे आह्मी दास आमुचा तूं ऋणी । चालत दूरूनी आलें मार्गे ॥ ३॥
तुका ह्मणे आतां घेतलें धरणें । हिशोबाकारणें भेटी देईं ॥ ४ ॥

॥ १२४७ ॥

कई मात माझे ऐकती कान । बोलतां वचन संतां मुखीं ॥ १ ॥
॥ धु. ॥ केला पाडूरंगें तुझा अंगीकार । मग होइल धीर माझ्या जीवा ॥ ध्रु. ॥
ह्मणऊनि मुख अवलोकितों पाय । हे चि मज आहे थोरी आशा ॥ २ ॥
माझिया मनाचा हा चि[4] विश्वास । न करीं सायास साधनांचे ॥ ३ ॥
तुका ह्मणे मज होईल भरवसा । तरलों मी ऐसा साच भाव ॥ ४ ॥

॥ १२४८ ॥

दोन्ही हात ठेवुनि कटीं । उभा भीवरेच्या तटीं ॥
कष्टलासी साटीं । भक्तिकाजें[6] विठ्ठला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भागलासी मायबापा । बहु श्रम केल्या खेपा ।
आह्मालागीं सोपा । दैत्या काळ कृतांत ॥ ध्रु. ॥
होतासी क्षीरसागरीं । मही दाटली असुरीं ।

---

१ त. कायावाचामन सहित.—२ त. आलों.—३ पं. माझा.—४ पं. हा चि पै विश्वास.—
५ त. पं. साच भावें.—६ पं. तूं जगजेठी भक्तिकाजा.

ह्मणोनियां[1] घरीं । गौळियांचे अवतार ॥ २ ॥
केला पुंडलिकें गोवा । तुज पंढरीसि देवा ।
तुका ह्मणे भावा । साटीं हातीं सांपडसी ॥ ३ ॥

॥ १२४९ ॥

गोड जालें पोट धालें । अवचित[2] वाचे आलें ।
ह्मणतां पाप गेलें । विठ्ठलसें वाचेसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्य माना रे सकळ । उद्धरिला अजामेळ ।
पातकी[3] चांडाळ । नामासाटीं आपुलिया ॥ ध्रु ॥
चित्त पावलें आनंदा । सुखसमाधीतें सदा ।
ह्मणतां गोविंदा । वेळोवेळां वाचेसी ॥ २ ॥
हें जाणती अनुभवी । जया चाड तो चोजवी ।
तुका ह्मणे दावी । रूप तें चि अरूपा[4] ॥ ३ ॥

॥ १२५० ॥

आंत हरि बाहेर हरि । हरिनें घरीं कोंडिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हरिनें कामा[5] घातला चिरा । वित्तवरा मुकविलें ॥ ध्रु ॥
हरिनें जीवें केली साटी । पांडिली[6] तुटी सकळांसी ॥ २ ॥
तुका ह्मणे वेगळा नव्हे । हरि[7] भोवे भोंवताला ॥ ३ ॥

॥ १२५१ ॥

हरिनें माझें हरिलें चित्त । भार वित्त विसरलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां कैसी जाऊं घरा । नव्हे बरा लौकिक ॥ ध्रु ॥
पारखियांसी सांगतां गोष्टी[8] । घरची कुटी[9] खातील ॥ २ ॥

---

१ पं. ह्मणोनिया हरी । गौळ्या घरीं अवतार ॥ .—२ पं. अवचिता.—३ पं. महा पात॰की॰.—४ पं. अरूप.—५ पं. काम.—६ पं. पडिली.—७ पं. हरि हा भोवे.—८ दे. त. गोटी.—९ पं. कुट.

तुका ह्मणे निवांत राहीं । पाहिलें पाहीं धेणीवरि ॥ ३ ॥

॥ भुपाळ्या ॥ अभंग ॥ ८ ॥

॥ १२५२ ॥

बोलोनि दाऊं कां तुह्मी नेणा जी देवा ।
ठेवाल तें ठेवा ठायीं तैसा राहेन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पांगुळलें मन कांहीं नाठवे उपाय ।
ह्मणऊनि पाय जीवीं धरूनि राहिलों ॥ ध्रु ॥
त्यागें भोगें दुःख काय सांडावें मांडावें ।
ऐसी धरियेली जीवें माझ्या थोरी आशंका ॥ २ ॥
तुका ह्मणे माते बाळा चुकलिया वनीं ।
न पेवतां[2] जननी दुःख पावे विठ्ठले ॥ ३ ॥

॥ १२५३ ॥

ऐसी वाट पाहे कांहीं निरोप कां मूळ ।
कां[3] हे कळवळ तुज उमटे चि ना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवो[4] पांडुरंगे पंढरीचे निवासे ।
लावूनियां आस चाळवूनी ठेविलें ॥ ध्रु ॥
काय जन्मा येवूनियां केली[6] म्यां जोडी ।
ऐसें घडीघडी चित्तां येतें आठवूं ॥ २ ॥
तुका ह्मणे खरा न पवे चि विभाग ।
धिकारितें जग हें चि लाहो हिशोबें ॥ ३ ॥

---

१ पं. परतूनि. २ त. पावतां.—३ पं. कांहो कळवळा तुह्मां उमटे चि ना.—४ पं. आहो.—
५ पं. असे.—६ पं. म्यां केली जोडी.

॥ १२५४ ॥

कां गा किविलवाणा केलों दीनाचा दीन ।
काय तुझी हीन शक्ति जालीसी दिसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लाज येते मना तुझा ह्मणवितां दास ।
गोडी नाहीं रस बोलिली यासारिखी ॥ ध्रु ॥
लाजविलीं मागें संतांचीं हीं उत्तरें ।
कळों येतें खरें दुजें एकावरूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी कोगें वदविली वाणी ।
प्रसादावांचूनि तुमचिया विठ्ठला ॥ ३ ॥

॥ १२५५ ॥

जळो माझें कर्म वांयां केली कटकट ।
जालें तैसें तंट नाहीं आलें अनुभवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां पुढें धीर काय देऊं या मना ।
ऐसें नारायणा प्रेरिलें तें पाहिजे ॥ ध्रु ॥
गुणवंत केलों दोष जाणायासाटीं ।
माझें माझें पोटीं बळकट दूषण ॥ २ ॥
तुका ह्मणे अहो केशीराजा दयाळा ।
बरवा हा ळळा पाळियेला शेवटीं ॥ ३ ॥

॥ १२५६ ॥

कामें नेलें चित्त नेदी अवलोकूं मुख ।

१पं. जालीसे ।.

बहु वाटे दुःख फुटों पाहे ह्रदय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कां जी[1] सासुरवासी मज केलें भगवंता ।
आपुलिया सत्ता स्वाधीनता ते[2] नाहीं ॥ ध्रु ॥
प्रभातेसि वाटे तुमच्या यावें दर्शना ।
येथें न चले चोरी उरली राहे वासना ॥ २ ॥
येथें अवघे वांयां गेले दिसती सायास ।
तुका ह्मणे नास दिसे जाल्या वेचाचा ॥ ३ ॥

॥ १२५७ ॥

जळोत तीं येथें उपजविती अंतराय ।
सायासाची जोडी मांझी[3] तुमचे पाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां मज सांह्य[4] येथें करावें देवा ।
तुझी घेई सेवा सकळ गोवा उगवूनि ॥ ध्रु ॥
भोगें रोगा जोडोनियां दिलें आणीकां ।
अरुचि ते हो कां आतां सकळांपासूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे असो तुझें तुझे मस्तकीं ।
नाहीं ये लौकिकीं आतां मज वेर्तणें[5] ॥ ३ ॥

॥ १२५८ ॥

न संगतां तुह्मां कळों येतें अंतर ।
विर्श्वीं[6] विश्वंभर परिहार[7] चि न लगे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परि हे अनात्र्र आवरितां आवडी ।

---

१ पं. कां गा.—२ दे. ते.—३ त पं. माझ—४ दे त. साह्य.—५ दे. पं. वर्तनें.—६ दे. विश्वें विश्वीं भर.—७ पं. परीहर.

अवसान ते घडी पुरों[1] देत नाहीं ॥ ध्रु ॥
काय उणें मज येथें ठेविलिये ठायीं ।
पोटा आलों तईपासूनिया समर्थ ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघी आवरिली वासना ।
आतां नारायणा दुसरियापासूनि ॥ ३ ॥

॥ १२५९ ॥

तुजसवें आह्मीं अनुसरलों अबळा ।
नको अंगीं कळा राहों हरी हीनें[2] देऊं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांसुरवासा[3] भीतों जीव ओढे तुजपाशीं ।
आतां दोहींविशीं लज्जा राखें आमुची ॥ ध्रु ॥
न कळतां संग जाला सहज खेळतां ।
प्रवर्तली चिंता मागिलांचियावरि ॥ २ ॥
तुका ह्मणे असतां जैसें तैसें बरवें ।
वचन या भावें वेचुनियां विनटलों ॥ ३ ॥

॥ १२६० ॥ ॥ ८ ॥

रवि दीप हिरा दाविती देखणें[4] । अदृश्य दर्शनें संतांचेनी[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ त्यांचा महिमा काय वर्णूं मी पामर । न कळे तो साचार ब्रह्मादिकां ॥ ध्रु ॥
तांपली[6] चंदन निववितो कुडी । त्रिगुण तो काढी संतसंग ॥ २ ॥
मायबापें पिंड पाळियेला[7] माया । जन्ममरण जाया संतसंग ॥ ३ ॥

१ पं. "पुरों देत" याबद्दल "पुरों एको देत."—२ त. हीण.—३ पं. सासुरवासी भीतें.—४ दे. त. दर्षणें.—५ पं. संताचिया.—६ पं. तापलिया.—७ दे. पं. पाळीला.

संतांचें वचन वारी जन्मदुःख । मिष्टान्न तें भूकनिवारण ॥ ४ ॥
तुका ह्मणे जवळी न पाचारितां जावें । संतचरणीं भावें रिघावया ॥ ५ ॥

॥ १२६१ ॥

हरि हरि तुह्मीं ह्मणा रे सकळ । तेणें मायाजाळ तुटईल ॥ १ ॥
॥ध्रु.॥ आणिका नका कांहीं गाबाळाचे भरी । पडों[1] येथें थोरी नागवण ॥ध्रु.॥
भावें तुळसीदळ पाणी जोडा हात । ह्मणावा पतित वेळोवेळां ॥ २ ॥
तुका ह्मणे हो[2] तंव कृपेचा सागर । नामासाटीं पार पाववील ॥ ३ ॥

॥ १२६२ ॥

ऐसे कुळीं पुत्र होती । बुडविती पूर्वजा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चाहाडी चोरी भांडवला । वांटा आला भागासी ॥ ध्रु. ॥
त्याचियानें दुःखी मही । भार तेही न साहे ॥ २ ॥
तुका ह्मणे ग्रामपशु । केला नाशु आयुष्या[3] ॥ ३ ॥

॥ १२६३ ॥

गांठोळीस धन भाकावी करुणा । दावूनि सज्जना कींव पीडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नांठेळाची[4] भक्ति कुचराचें बळ । कोरडें वोंगळ मार खाय ॥ध्रु.॥
सांडोव्यासी घाली देवाची करंडी । विल्हाळ त्या धोंडी पूजा दावी ॥२॥
तुका ह्मणे ऐसे माकडाचे छंद । अवघे धंदंधंद[5] सिंदळींचे ॥ ३ ॥

॥ १२६४ ॥

कैसें[6] असोनि ठाउकें नेणां । दुःख पावाल पुढिले पेणां[7] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां जागें[8] रे भाई जागें रे । चोर निजल्या नाडूनि भागे रे ॥ध्रु.॥

---

१ पं. पडों तेथें.—२ पं. "हा तंव" यांच्या बद्दल "आहे."—३ दे. अयुशा. त. आबिष्या.— ४ पं. नाटेळाची.—५ पं. धिंदधिंद.—६ पं 'कैसें असोनि' हें ध्रुवपद असून 'आतां जागा' हें पहिलें कडवें आहे.—७ पं. पणा.—८ पं. जागा रे भाई जागा रे ।० भागा रे ।—

आतां नका रे भाई नका रे । आहे गांठीं[1] तें लुटवूं लोकां रे ॥ २ ॥
तुका ह्मणे एकांच्या घायें । कां रे जाणोनि न धरा भये ॥ ३ ॥

॥ १२६५ ॥

मुदल जतन जालें । मग लाभाचें काय आलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घरीं देउनि अंतर गांठी । राखों[2] पारिख्यां न सुटे मिठी ॥ ध्रु ॥
घाला पडे थोडें च वाटे । काम मैंदाचें च पेटे ॥ २ ॥
तुका ह्मणे वरदळ खोटें । फांसे अंतरिंच्या कपटें ॥ ३ ॥

॥ १२६६ ॥

मज अंगाच्या अनुभवें । काई वाईट वैरें[3] ठावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जालों दोहींचा[4] देखणा । नये मागें पुढें हीं मना ॥ ध्रु ॥
वोस वैसती[5] ठावी । परि हे चाली दुःख पावी ॥ २ ॥
तुका ह्मणे घेऊं देवा । सर्वे करूनि बोळावा ॥ ३ ॥

॥ १२६७ ॥

पाववावें ठाया । ऐसें सवें बोलों तया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भावा ऐसी क्रिया राखे । खोट्या खोटेपणें[6] वाखे ॥ ध्रु ॥
न ठेवूं अंतर । कांहीं भेदाचा पदर ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवें भावें । सत्या[7] मानविजे देवें ॥ ३ ॥

॥ १२६८ ॥

मोल देऊनियां सांटवावे दोष । नटाचे ते वेष[8] पाहोनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हरिदासां मुखें हरिकथाकीर्तन । तेथें पुण्यें पुण्य विशेषता ॥ ध्रु ॥

---

१ पं. गाठीस.—२ दे. राख्या.—३ न. वर्वें—४ पं देहीचा.—५ पं. वोसींत.—६ पं. खोटेपण.—७ पं. सत्य.—८ दे पं. वेश.

हरितील वस्त्रें गोपिकांच्या वेशें । पाप त्यासरिसें मात्रागमन ॥ २ ॥
तुका ह्मणे पाहा ऐसें जालें जन । सेवाभक्तिहीन रसीं गोडी ॥ ३ ॥

॥१२६९ ॥

बहुक्षीदक्षीण[1] । आलों[2] सोसुनियां वन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठोबा विसांवया विसांवया । पडों देईं पायां ॥ ध्रु ॥
बहुतां काकुलती । आलों सोसिली फजिती ॥ २ ॥
केली तुजसाटीं । तुका ह्मणे येवढी आटी ॥ ३ ॥

॥ १२७० ॥

कांगा धर्म केला । असोन सत्तेचा आपुला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उभाउभीं पाय जोडीं । आतां फांकों नेदीं घडी ॥ ध्रु ॥
नको सोडूं ठाव । आतां घेऊं नेदीं[3] वाव ॥ २ ॥
तुका ह्मणे इच्छा । तैसा करीन सरिसा ॥ ३ ॥

॥ १२७१ ॥

तुमची तों भेटी नव्हे ऐसी जाली । कोरडी च बोली ब्रह्मज्ञान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां न बोलावें ऐसें वाटे देवा । संग न करावा कोणां सवें ॥ ध्रु ॥
तुह्मां निमित्यासी सांपडलें अंग । नेदांवा हा संग विचारिलें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी राहिली वासना । आवडी दर्शनाची च होती ॥ ३ ॥

॥ १२७२ ॥

आहे तें चि आह्मी मागों तुजपाशीं । नव्हों[4] तुज ऐसीं क्रियानष्टें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न[5] बोलावीं तों च वर्मैं बरें दिसे । प्रकट ते कैसे गुण करूं ॥ ध्रु ॥

---

१ त. बहुक्षेद.–(क्षोद ?)–क्षीण.– २ पं. जालों.– ३ त. न द्यावां.– ४ पं. नव्हे तुज ऐसीं क्रियानष्ट.– ५ त. न बोलावीं वर्मे तों चि बरें दिसे.

एका ऐसें[1] एका द्यावेयाचा[2] मोळा । कां तुह्मां गोपाळा नाहीं ऐसा ॥ २॥
तुका ह्मणे लोकां नाहीं कळों आलें । करावें आपुलें जतन तों ॥ ३ ॥

॥ १२७३ ॥

आह्मीं याची केली सांडी । कोठें तोंडीं लागावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आहे तैसा[3] असो आतां । चिंतें[4] चिंता वाढते ॥ ध्रु ॥
बोलिल्याचा मानीं[5] सीण । भिन्न भिन्न राहावें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मांपाशीं । धीराऐसी जतन ॥ ३ ॥

॥ १२७४ ॥

आह्मांपाशीं याचें बळ । कोण काळवरी तों[6] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करूनि[7] ठेलों जीवेंसाटीं । होय भेटी तोंवरि ॥ ध्रु ॥
लागलों तों न फिरें पाठी । पडिल्या गांठी वांचूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे अवकाशें । तुमच्या ऐसें होवेंया[8] ॥ ३ ॥

॥ १२७५ ॥

बोलिलें चि बोलें पेडपडताळूनि[9] । उपजत मनीं नाहीं शंका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बहुतांची माय बहुत कृपाळ । साहोनि कोल्हाळ बुंझाविसी[10] ॥ध्रु॥
बहुतांच्या भावें[11] वांटिसी भातुकें । बहु कवतुकें खेळविसी ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसें जाणतसों वर्म । करणें तों श्रम न वजे वांयां ॥ ३ ॥

॥ १२७६ ॥ ॥ १२ ॥

कोठें भोग उरला आतां । आठवितां तुज मज ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आड कांहीं नये दुजें । फळ बीजें आणिलें ॥ ध्रु ॥

---

१ पं. ऐसा.–२ पं. द्यावा त्याचा.–३ पं. तैसें.–४ पं. चित्तें.–५ पं. मनी.–६ पं. तें.–
७ पं. धरूनि.–८ त. व्हावया.–९ पं. पडत पडताळूनि.–१० पं. बुझविसी.–११ पं. नांवें.

उद्वेग ते[1] वांयांविण । कैंचा सीण चिंतनें ॥ २ ॥
तुका ह्मणे गेला भ्रम । तुमच्या धर्मे पायांच्या ॥ ३ ॥

॥ १२७७ ॥

संसार तो कोण देखे । आह्मां सखे हरिजन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काळ ब्रह्मानंदें सरे । आवडी उरे संचली ॥ ध्रु ॥
स्वप्नीं ते ही नाहीं चिंता । रात्री जातां दिवस ॥ २ ॥
तुका ह्मणे ब्रह्मरसें । होय सरिसें भोजन ॥ ३ ॥

॥ १२७८ ॥

पडियेलों वनीं थोर चिंतवनी । उसीर कां आझूनि लावियेला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येई गा विठ्ठला येई गा विठ्ठला । प्राण हा फुटला आळवितां ॥ध्रु॥
काय तुज नाहीं लौकिकाची शंका । आपुल्या बाळका मोकलितां ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु खंती वाटे जीवा । धरियेलें देवा दुरी दिसे ॥ ३ ॥

॥ १२७९ ॥

आपुले गांवींचें न देखेसें जालें । परदेसी एकलें किती कंठूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि पाहें मूळ येतां वाटे । जीवलग भेटे कोणी तरी ॥ ध्रु ॥
पाहातां अवघ्या दिसतील दिशा । सकळ ही वोसा दृष्टीपुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे कोणी न संगे वारता । तुझी वाटे चिंता पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ १२८० ॥

जन तरी देखें[2] गुंतलें प्रपंचें । स्मरण तें त्याचें त्यासी नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि मागें परतलें मन । घालणीचें रान देखोनियां ॥ ध्रु ॥

१ पं सो –२ पै. देखा गुंतले प्रपंच । स्मरण तो त्याचें०.

इंद्रियांचा गाजे गोंधळ ये ठायीं । फोडीतसे डोई अहंकार ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा वासनेच्या आटें । केलीं तळपटें बहुतांचीं ॥ ३ ॥

॥ १२८१ ॥

धांवे त्यासी फावे । दुजे उगवूनि गोवे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घ्यावें भरूनियां घर । मग नाहीं येरझार ॥ ध्रु ॥
धणी उभें केलें । पुंडलिकें या उगलें ॥ २ ॥
तुका ह्मणे ठसा । गेला पडोनियां ऐसा ॥ ३ ॥

॥ १२८२ ॥

लहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐरावत रत्न थोर । तैंया अंकुशाचा मार ॥ ध्रु ॥
ज्याचे अंगीं मोठेपण । तया यातना कठीण ॥ २ ॥
तुका ह्मणे जाण । व्हावें लाहनाहुनि लाहन ॥ ३ ॥

॥ १२८३ ॥

नीचेंपण बरवें देवा । न चले कोणांचा ही दावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ महा पुरें झाडें जाती । तेथें लव्हाळे राहाती ॥ ध्रु ॥
येतां सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरि ॥ २ ॥
तुका ह्मणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥ ३ ॥

॥ १२८४ ॥

उष्टया पत्रावळी करूनियां गोळा । दाखविती कळा कवित्वाची ॥ १ ॥
ऐसे जे पातकी ते नरकीं पचती । जोंवरी भ्रमती चंद्रसूर्य ॥ २ ॥

---

१ पं. पावे.—२ पं. एरावती.—३ प. त्यासी.—४ दे. निचपण.—५ पं. कोणाच्या ची.

तुका ह्मणे एकं नारायण ध्याई । वरकडा वाहीं शोक असे ॥ ३ ॥

॥ १२८५ ॥

आवडीच्यां मतें करिती भजन । भोग नारायणें ह्मणती केला ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ अवघा देव ह्मणे वेगळें तें काय । अर्थासाटीं डोय फोडूं पाहे ॥ ध्रु

लाजे कमंडल धरितां भोपळा । आणीक थीगळा प्रावरणा ॥ २ ॥

शाला गडवे धातुद्रव्यइच्छा चित्तीं । नैश्वर्य बोलती अवघें मुखें ॥ ३ ॥

तुका ह्मणे यांस देवा नाहीं भेटी । ऐसे कल्पकोटि जन्म घेतां ॥ ४ ॥

॥ १२८६ ॥

ह्मणतां हरिदास कां रे नाहीं लाज । दीनास महाराज ह्मणसी हीना ॥ १ ॥

काय ऐसें पोट न भरे तें गेलें । हालविसी कुले सभेमाजी ॥ २ ॥

तुका ह्मणे पोटें केली विटंबना । दीन जाला जना कींव भाकी ॥ ३ ॥

॥ १२८७ ॥

रिद्धिसिद्धी दासी कामधेनु घरीं । परि नाहीं भाकरी भक्षावया ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ लोडें बालिस्तें पलंग सुपति । परि नाहीं लंगोटी नेसावया ॥ ध्रु

पुसाल तरि आह्मां वैकुंठींचा वास । परि नाहीं राह्यास ठाव कोठें ॥ २ ॥

तुका ह्मणे आह्मी राजे त्रैलोक्याचे । परि नाहीं कोणाचें उणें पुरें ॥ ३ ॥

॥ १२८८ ॥

घरोघरीं अवघें जालें ब्रह्मज्ञान । परि मेळवण बहु माजी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ निरें कोणापाशीं होय एक रज । तरि द्या रे मज दुर्बळासी ॥ ध्रु ॥

आशा तृष्णा माया कालवूनि दोन्ही । दंभ तो दूरोनि दिसतसे ॥ २ ॥

१ पं. एका नारायणा.—२ पं. कुमंडल.—३ पं. नैश्वर.—४ त. पं. तयां.—५ पं. ह्मणवितां.—६ पं. 'कां रे' याच्याबद्दल 'कांहीं' असें आहे.—७ पं. भरेसें जालें.—८ त. लोडें आणि बालिस्तें.—९ पं. नीरें.

काम क्रोध लोभ सिणवी बहुत । मेळवूनि आंत काळकूट ॥ ३ ॥
तुका ह्मणे तेथें कांहीं हातां नये । [1]आयुष्य मोलें जाये वांयांविण ॥ ४॥

॥ १२८९ ॥

अवघ्या भूतांचें केलें संतर्पण । अवघी च दान दिली भूमि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अवघा चि [2]कोळ दिनरात्रशुद्धी । साधियेली विधि पर्वकाळ ॥ ध्रु ॥
अवघीं च तीर्थें व्रतें केले याग । अवघें चि सांग जालें कर्म ॥ २ ॥
अवघें चि फळ आलें आह्मां हातां । अवघें चि अनंता समर्पिलें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां [3]बोलों अबोलणें । कायावाचामनें उरलों नाहीं ॥ ४ ॥

॥ १२९० ॥

महुरा ऐसीं फळें नाहीं । आलीं कांहीं गळती । १ ॥
॥ ध्रु. ॥ पक्कदशे येती थोडीं । नास आढी वेचे तों ॥ ध्रु ॥
[4]विरळा पावे विरळा पावे । अवघड गोवे सेवटाचे ॥ २ ॥
उंच निंच परिवार देवीं । धन्या ठावी चाकरी ॥ ३ ॥
झळके तेथें पावे आणी । ऐसे क्षणी बहु थोडे ॥ ४ ॥
पावेल तो पैल थडी । ह्मणों गडी आपुला ॥ ५ ॥
तुका ह्मणे उभाऱ्यानें । [5]कोणें खरें मानितसे ॥ ६ ॥

॥ १२९१ ॥

अवघ्या उपचारा । एक [6]मन चि दातारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घ्यावी घ्यावी हे चि सेवा । [7]माझी दुबळाची देवा ॥ ध्रु ॥

---

१ पं. आयुष्यमोल.—२ त. काळ वेळ दिनशुद्धी —३ पं. बोलणें.—४ दे. पं. विरुळा पावे विरुळा.—५ पं. खरें कोण.—६ दे. मनें.—७ पं. दीवदुर्बळाची०.

अवघियाचा ठाव । पायांवरि जीवभाव ॥ २ ॥
चित्ताचें आसन । तुका करितो कीर्तन ॥ ३ ॥

॥ १२९२ ॥

आली सलगी पायांपाशीं । होइल तैसी करीन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आणीक आह्मीं कोठें जावें । येथें जीवें वेचलों ॥ ध्रु ॥
अवघ्या निरोपणा भाव । हा चि ठाव उरलासे ॥ २ ॥
तुका ह्मणे पाळीं लळे । कृपाळुवे विठले ॥ ३ ॥

॥ १२९३ ॥

देह आणि देहसंबंधें निंदावीं । इतरें वंदावीं श्वानशूकरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येणें नांवें जाला मी माझ्याचा झाडा । मोहा नांवें खोडा गर्भवास ॥ ध्रु ॥
गृह आणि वित्त स्वदेशा विटावें । इतरा भेटावें श्वापदझाडां[1] ॥ २ ॥
तुका ह्मणे मी हें[2] माझें न यो वाचे । येणें नांवें साचे साधुजन ॥ ३ ॥

॥ १२९४ ॥

देवाचिये माथां घालुनियां भार । सांडीं कळिवर ओंवाळूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाथिला हा छंद अभिमान अंगीं । निमित्याचे वेगीं सारीं ओझें ॥ ध्रु ॥
करुणावचनीं[1] लाहो एकसरें । नेदावें[3] दुसरें आड येऊं ॥ २ ॥
तुका ह्मणे सांडीं लटिक्याचा संग । आनंद तो मग प्रगटेल ॥ ३ ॥

---

१ पं. श्वापदा झाडां.—२ त. " मी हें " याच्याबद्दल " मुखें. "—३ त. न द्यावें.

॥ १२९५ ॥

देह नव्हे मी हें सरे । उरला उरे विठ्ठल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि लाहो करा । काळ सारा चिंतनें ॥ ध्रु. ॥
पाळणाची नाहीं चिंता । ठाव रिता देवाचा ॥ २ ॥
तुका ह्मणे जीवासाटीं । देव पोटीं पडेल ॥ ३ ॥

॥ १२९६ ॥

पृथक मी सांगों किती । धर्म नीती सकळां ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ अवघियांचा एक ठाव । शुद्ध भाव विठ्ठलीं ॥ ध्रु. ॥
क्षराअक्षराचा भाग । करा लाग पंढरीये ॥ २ ॥
तुका ह्मणे आगमींचें । मथिलें साचें नवनीत ॥ ३ ॥

॥ १२९७ ॥

पुण्यविकरा तें मातेचें गमन । भाडी ऐसें धन विटाळ तो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आत्महत्यारा हा[1] विषयांचा लोभी । ह्मणावें तें नाभी करवी दंड ॥ ध्रु. ॥
नागवला अल्प लोभाचिये साटीं । घेऊनि कांचवटि परिस दिला ॥२॥
तुका ह्मणे हात झाडिले परत्रीं । श्रम[2] तो चि श्रोत्रीं वेठी केली ॥ ३ ॥

॥ १२९८ ॥

अंतरींचें ध्यान । मुख्य या नांवें पूजन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उपाधि तें अवघें पाप । गोडं[3] निरसतां संकल्प ॥ ध्रु. ॥
आज्ञा पाळावी हा धर्म । जाणते हो जाणा वर्म ॥ २ ॥
तुका ह्मणे वृत्ति । अविट हे सहज स्थिति ॥ ३ ॥

---

१ पं. 'हा' हा शब्द नाहीं.–२ पं. श्रम तो श्रोत्रीं ठेवी केली.–३ पं. गोडी.

॥ १२९९ ॥

मूळ करणें संतां । नाहीं मिळत उचिता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घडे कासयानें सेवा । सांग ब्रह्मांडाच्या जीवा ॥ ध्रु ॥
सागर सागरीं । सामावेसी कैंची थोरी ॥ २ ॥
तुका ह्मणे भावें । शरण ह्मणवितां बरवें ॥ ३ ॥

॥ १३०० ॥

बरवी नामावळी । तुझी महादोषां होळी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जालें आह्मांसी जीवन । धणीवरि हें सेवन ॥ ध्रु ॥
सोपें आणि गोड । किती अमृता ही वाड ॥ २ ॥
तुका ह्मणे अच्युता । आमचा कल्पतरु दाता ॥ ३ ॥

॥ १३०१ ॥

तृषाकाळीं उदकें भेटी । पडे मिठी आवडीची ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसियाचा हो कां संग । जिवलग संतांचा ॥ ध्रु ॥
मिष्टान्नाचा योग भुके । ह्मणतां चुके पुरेसें ॥ २ ॥
तुका ह्मणे माते बाळा । कळवळा भेटीचा ॥ ३ ॥

॥ १३०२ ॥

कुंचराचे श्रवण । गुणदोषांवरि मन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ असोनियां नसे कथे । मूर्ख अभाग्य तें तेथें ॥ ध्रु ॥
निरर्थक कारणीं । कान डोळे वेची वाणी ॥ २ ॥
पापाचे सांगाती । तोंडीं ओढाळांचे माती ॥ ३ ॥

---

१ पं. कारण.–२ दे. त. त्रुशाकाळें०.–३ त. कुचराचें.–४ दे. करणीं.

हिताचिया नांवें । वोस पडिले देहभावें ॥ ४ ॥
फजीत करूनि सांडी । तुका करी बोडाबोडी ॥ ५ ॥

॥ १३०३ ॥

जग तरि आह्मां देव । परि हे निंदितों स्वभाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येतो हिताचा कळवळा । पडती हातीं ह्मून[2] काळा ॥ ध्रु ॥
नाहीं कोणी सखा । आह्मां निपराध पारिखा ॥ २ ॥
उपक्रमें वदे । तुका वर्मासी तें भेदे ॥ ३ ॥

॥ १३०४ ॥

सोपें[3] वर्म आह्मां सांगितलें संतीं । टाळ दिंडी हातीं घेउनि नाचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ समाधीचें सुख सांडा ओंवाळून[4] । ऐसें हें कीर्तन ब्रह्मरस ॥ ध्रु ॥
पुढती घेंडे चढतें सेवन आगळें । भक्तिभाग्यबळें निर्भरता ॥ २ ॥
उपजों चि नये संदेह चित्तासी । मुक्ति चारी दासी हरिदासांच्या ॥ ३ ॥
तुका ह्मणे मन पावोनि विश्रांती । त्रिविध नासती ताप क्षणें ॥ ४ ॥

॥ १३०५ ॥

गंगा न देखे विटाळ । तें चि रांजणीं ही जळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अल्पमहद्दा नव्हे सरी । विटाळ तो भेद धरी ॥ ध्रु ॥
काय खंडिली भूमिका । वर्णा पायरिकां लोकां ॥ २ ॥
तुका ह्मणे अगीविण । बीजें वेगळीं तो भिन्न ॥ ३ ॥

॥ १३०६ ॥

देवावरिल भार । काढूं नये कांहीं पर ॥ १ ॥

---

१ पं. सोडी.–२ प. ह्मणोनि.–३ त. हें कडवें येथें अभंगांत नाहीं. पं. मूळचेंच आहे दे. या ठिकाणीं नवीन घातलें आहे.–४ पं. ओंवाळूनी । ऐसा हा कीर्तनीं ब्रह्मरस.–५ पं. घडतें.

॥ ध्रु. ॥ तानभुके आठवण.। घडे तें बरें चिंतन ॥ ध्रु ॥
देखावी निश्चिती । ते चि अंतर श्रीपती ॥ २ ॥
वैभव सकळ । तुका मानितो विटाळ ॥ ३ ॥

॥ १३०७ ॥

थुंकोनियां[1] मान । दंभ करितां कीर्तन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जालों उदासीन देहीं । एकाविण चाड नाहीं ॥ ध्रु ॥
अर्थ अनर्थ सारिखा । करूनि ठेविला पारिखा ॥ २ ॥
उपाधिवेगळा । तुका राहिला सोंवळा ॥ ३ ॥

॥ १३०८ ॥

काय ह्याचें घ्यावें । नित्य नित्य कोणें गावें ॥ १ ॥
॥ ध्रु ॥ केलें हरिकथेनें वाज । अंतरोनि जाते निज ॥ ध्रु ॥
काम संसार । अंतेरीं[2] हे करकर ॥ २ ॥
तुका ह्मणे हेंड । ऐसे मानिती ते लंड ॥ ३ ॥

॥ १३०९ ॥

वदे साक्षत्वेंसीं वाणी । नारायणीं मिश्रित ॥ १ ॥
॥ध्रु. ॥ न लगे कांहीं चाचपावें । जातां भावें पेरीत ॥ ध्रु ॥
भांडार त्या दातियाचें । मी कैचें ये ठायीं ॥ २ ॥
सादावीत गेला तुका । येथें एकाएकीं तो ॥ ३ ॥

॥ १३१० ॥

ऐसी जिव्हा निकी । विठ्ठल विठ्ठल कां न घोकी ॥ १ ॥

---

१ पं. तुकोनिया.–२ पं. अंतरे.

॥ ध्रु. ॥ जेणें पाविजे उद्धार । तेथें राखावें अंतर ॥ ध्रु ॥
गुंपोनि चावटी । तेथें कोणा लाभें भेटी ॥ २ ॥
तुका ह्मणे कळा । देवाविण अमंगळा ॥ ३ ॥

॥ १३११ ॥

साजे अळंकार । तरि भोगितां भ्रतार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ व्यभिचारा टाकमटिका । उपहास होती लोकां ॥ ध्रु ॥
शूरत्वाची वाणी । रूप मिरवे मंडणीं ॥ २ ॥
तुका ह्मणे जिणें । शक्तीविण लाजिरवाणें ॥ ३ ॥

॥ १३१२ ॥

मानामान किती । तुझ्या क्षुल्लका संपत्ती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जा रे चाळवीं बापुडीं । कोणी धरिती तीं गोडी ॥ ध्रु ॥
रिद्धिसिद्धी देसी । आह्मीं चुंभळें नव्हों तैसीं ॥ २ ॥
तुका ह्मणे ठका । ऐसें नागविलें लोकां ॥ ३ ॥

॥ १३१३ ॥

पाहातोसी काय । आतां पुढें करीं पाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वरि ठेवूं दे मस्तक । ठेलों जोडूनि हस्तक ॥ ध्रु ॥
बरवें करीं सम । नको भंगों देऊं प्रेम ॥ २ ॥
तुका ह्मणे चला । पुढती सामोरे विठ्ठला ॥ ३ ॥

॥ १३१४ ॥

भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास । गेले आशापाश निवारूनि ॥ १ ॥

---

१ पं. कोण लाभ. २ पं. धरितील ते गोडी.— ३ पं. भक्ता ऐसे.

॥ध्रु.॥ विषय तो त्यांचा जाला नारायण। नावडे धन जन माता पिता ॥ध्रु.॥
निर्वाणीं गोविंद असे मागेंपुढें । कांहीं च सांकडें पडों नेदी ॥ २ ॥
तुका ह्मणे सत्य कर्मा व्हावें सांह्ये[1] । घातलिया भये नर्का जाणें ॥ ३ ॥

॥ १३१५ ॥

तों च हीं क्षुल्लकें सखीं सहोदरें । नाहीं विश्वंभरें वोळखी तों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नारायण विश्वंभर विश्वपिता। प्रमाण तो होतां सकळ मिथ्या ॥ध्रु.॥
रवि नुगवे तों दीपिकांचें[2] काज । प्रकाशें[3] तें तेज सहज लोपे ॥ २ ॥
तुका ह्मणे देहसंबंध संचितें । कारण निरुतें नारायणीं ॥ ३ ॥

॥ १३१६ ॥

यज्ञ भूतांच्या पाळणा । भेद कारियाँ[4] कारणा ।
पावावया उपासना । ब्रह्मस्थानीं प्रस्थान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एक परी पडिलें भागीं । फळ बीजाचिये अंगीं ।
धन्य तो चि जगीं । आदि अंत सांभाळी ॥ ध्रु ॥
आवश्यक[5] तो शेवट । मागें अवघी खटपट ।
चालों जाणे वाट । ऐसा विरळा एखादा ॥ २ ॥
तुका होवोनि निराळा । क्षराअक्षरावेगळा[6] ।
पाहे निगमकळा । बोले विठ्ठलप्रसादें[7] ॥ ३ ॥

॥ १३१७ ॥

वेदपुरुष तरि नेती कां वचन । निवडूनि भिन्न दाखविलें ॥ १ ॥

---

१ दे. त. साहे.—२ दे. प. दीपिकाचें.—३ पं प्रकाश तें.— ४ दे. त. कारीये.— ५ दे. आवशक. पं. आवस्यक.—६ पं. क्षराक्षरावेगळा.—७ पं. विठ्ठल प्रसाद

॥ ध्रु. ॥ तुझीं वर्मे तूं चि दावूनि अनंता । होतोसी नेणता कोण्या गुणें ॥ ध्रु ॥

यज्ञाचा भोक्ता तरि कां नव्हे सांग । उणें पडतां अंग क्षोभ घडे ॥ २ ॥

वससी तूं या भूतांचे अंतरीं । तरि कां भेद हरी दावियेला ॥ ३ ॥

तपतिर्थाटणें[1] तुझें[2] मूर्तिदान । तरि कां अभिमान आड येतो ॥ ४ ॥

आतां क्षमा कीजे विनवितो तुका । देऊनियां हांका[3] उभा द्वारीं ॥ ५ ॥

लोहागांवीं स्वामींच्या अंगावर ऊन पाणी घातलें-तो अभंग ॥ १ ॥

॥ १३१८ ॥

जळे[4] माझी काया लागला वोणवा । धांव रे केशवा मायबापा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पेटली सकळ कांति रोमावळी । नावरे हे होळी दहन जालें ॥ ध्रु ॥

फुटोनियां दोन्ही भाग होऊं पाहे । पाहातोसी काय त्द्दय माझें ॥ २ ॥

घेऊनि जीवन धांवें लवलाहीं । कवणाचें कांहीं न चले येथें ॥ ३ ॥

तुका ह्मणे माझी तूं होसी जननी । आणीक निर्वाणीं कोण राखे ॥ ४ ॥

॥ १३१९ ॥ ॥ १ ॥

अभक्त ब्राह्मण जळो त्याचें तोंड । काय त्यासी रांड प्रसवली ॥ १ ॥

॥ध्रु.॥ वैष्णव चांभार धन्य त्याची माता । शुद्ध उभयतां कुळ याती ॥ध्रु॥

ऐसा हा निवाडा जालासे पुराणीं । नव्हे माझी वाणी पदरींची ॥ २ ॥

तुका ह्मणे आगी लागो थोरपणा । दृष्टि त्या दुर्जना न पडो माझी ॥ ३ ॥

---

१ पं. तपें तीर्थाटणें.–२ दे. पं. तुझे.–३ पं. तुका. (ह्मणजे पंढरपुरच्या प्रतींत या अभंगांत दोन वेळ "तुका" हा शब्द एकाच अर्थानें घातला आहे.)–४ पं. जळो.

नामदेव व पांडुरंग यांनीं स्वप्नांत येऊन स्वामींस आज्ञा केली कीं कवित्व करणें– ते अभंग ॥ २ ॥

॥ १३२० ॥

नामदेवें केलें स्वप्नामाजी जागें । सवें पांडुरंगें येऊनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सांगितलें काम करावें कवित्व । वाउगें निमित्य बोलों नैको[1] ॥ ध्रु ॥
माप टाकी सेळ[2] धरिली विठ्ठलें । थापटोनि केलें सावधान ॥ २ ॥
प्रमाणाची संख्या सांगे शत कोटी । उरले[3] शेवटीं लावी तुका ॥ ३ ॥

॥ १३२१ ॥

द्याल ठाव तरि राहेन संगती । संतांचे पंगती[4] पायांपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आवडीचा ठाव आलोंसें टाकून । आतां उदासीन न धरावें ॥ ध्रु ॥
सेवटील स्थळ नीचें[5] माझी वृत्ति । आधारें विश्रांती पावईन ॥ २ ॥
नामदेवापायीं तुक्या स्वप्नीं भेटी । प्रसाद हा पोटीं राहिलासे ॥ ३ ॥

॥ १३२२ ॥ ॥ २ ॥

त्रिपुटीच्या योगें । कांहीं नव्हे कोणां जोगें ।
एक जातां[6] लागें । एक पाठी लागतें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मागें पुढें अवघा काळ । पळों नये न चले बळ ।
करितां कोल्हाळ । रुपे खांदां हरि वाहे ॥ ध्रु ॥
पापपुण्यात्मयाच्या[7] शक्ती । असती योजिल्या श्रीपती ।
यावें काकुलती । तेथें[8] सत्तानायेका ॥ २ ॥
तुका उभा पैल थडी । तरि हे प्रकाश निवडी ।

---

१ त नये.–२ त. सळे–३ पं. उरले ते सेवटीं.–४ पं. संगती.–५ दे. निंच.–६ त. आतां.–७ पं. पापपुण्यात्मा याच्या०.–८ पं. येथें.

घातल्या सांगडी । तापे पेटीं हाकारी ॥ ३ ॥

॥ १३२३ ॥

देखण्याच्या तीन जाती । वेठी वार्ता अत्यंतीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जैसा भाव तैसें फळ । स्वातीतोय एक जळ ॥ ध्रु ॥
पाहे सांगे आणि जेवी । अंतर [1]महदंतर तेवी ॥ २ ॥
तुका ह्मणे हिरा । पारखियां मूढां गारा ॥ ३ ॥

॥ १३२४ ॥

अनुभवें अनुभव अवघा चि साधिला । तरि स्थिरावला मनु ठायीं ॥ १ ॥
॥ध्रु॥. पिटूनियां मुसे आला अळंकार । दग्ध तें असार होऊनियां ॥ध्रु॥
एक चि उरलें कायावाचामना । आनंद भुवनामाजी त्र्यीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी जिंकिला संसार ॥ होऊनि किंकर विठोबाचे ॥ ३ ॥

॥ १३२५ ॥

ऐसिया संपत्ती आह्मां [2]संवसारी । भोगाचिया परि काय सांगों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काम तो कामना भोगीतसे देवा । आळिंगणें हेवा चरण चुंबीं ॥ ध्रु ॥
शांतीच्या संयोगें निरसला ताप । दुसरें तें पाप भेदबुद्धि ॥ २ ॥
तुका ह्मणे पाहें निकडे सारिखें । आपुलें पारिखें निरसलें ॥ ३ ॥

॥ १३२६ ॥

राम राज्य राम प्रजा लोकपाळ । एक चि सकळ दुजें नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मंगळावांचूनि उमटेना वाणी । अखंड चि खाणी एकी रासी ॥ध्रु॥

---

१ दे. त. प. महदांतर.–२ पं. संसारी–३ त. पारखें.

मोडलें हें स्वामी ठायाठाव[1] सेवा । वाढवावा[2] हेवा कोणा अंगें ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघें दुमदुमिलें देवें । उरलें तें गावें हें चि आतां ॥ ३ ॥

॥ १३२७ ॥

निवडोनि वाग काढिले निराळे । प्रमाण डोहळे यावरि ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जयाचा विभाग तयासी च फळे[3] । देखणें निराळें कौतुकासी ॥ध्रु०॥
शूर तो ओळखे घायडायहात[4] । येरां होइल मात सांगायासी ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी केळवते[5] वाणी । केला निजस्थानीं जाणवसा ॥ ३ ॥

॥ १३२८ ॥

याजसाटीं केला होता अटाहास[6] । शेवटाचा[7] दिस गोड व्हावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां निश्चिंतीनें[8] पावलों विसांवा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥ध्रु०॥
कवतुक वाटे जालिया वेचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥ २ ॥
तुका ह्मणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिवस चारी खेळीमेळीं ॥३॥

॥ १३२९ ॥

भक्तीचिया पोटीं रत्नाचिया खाणी । ब्रह्मींची ठेवणी सकळ वस्तु ॥१॥
॥ ध्रु. ॥ माउलीचे मागें बाळकांची[9] हरी । एका सूत्रें[10] दोरी ओढतसे ॥ध्रु०॥
जेथील जें मागे[11] तें रायासमोर । नाहींसें उत्तर येत नाहीं ॥ २ ॥
सेवेचिये सत्ते धनी च सेवक । आपुलें तें एक न वंची कांहीं ॥ ३ ॥
आदिअंताठाव असे मध्यभाग । भोंवतें भासे मग उचासन[12] ॥ ४ ॥
भावारूढ तुका जाला एकाएकीं । देव च लौकिकीं अवघा केला ॥५॥

---

१ पं. टाया टाव.—२ दे. वाढवा तो.—३ त. फळें—४ पं. डायघायहात.—५ त केळवती.—६ दे. त. पं. आटाहास्ये—७ पं. सेवटोचा.—८ त. निश्चिंतीनें.—९ त. बाळकाच्या. पं. बाळकाचे.—१० पं. सूत्र.—११ पं. मागे रायासमोर.—१२ दे. पं. उंचासनी.

॥ १३३० ॥

सांगतां दुर्लभ ज्ञानाचिया गोष्टी । अनुभव तो पोटीं[1] कैचा घडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भजनाचे सोई जगा परिहार[2] । नेणत्यां सादर चित्त कथे ॥ ध्रु ॥
नाइकवे कानीं साधन उपाय । ऐकतो गाय हरुषें[3] गीत ॥ २ ॥
नव्हे आरागूक जावयासी वर्मा[4] । वेध कामिमना हरिकथेचा ॥ ३ ॥
काळाच्या साधना कोणा अंगीं बळ । चिंतना मंगळ अष्टप्रहर[5] ॥ ४ ॥
तुका ह्मणे आह्मी खेळों भातुकुलें । विभागासी मुलें भोळीं येथें ॥ ५ ॥

॥ १३३१ ॥

जाणपण बरें देवाचिये[6] शिरीं । आह्मी ऐसीं बरीं नेणतीं च ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देखणियांपुढें रुचे कवतुक । उभयतां सुख वाढतसे ॥ ध्रु ॥
आशंकेची[7] बाधा नाहीं लडिवाळां । चित्त वरि खेळा समबुद्धि ॥ २ ॥
तुका ह्मणे दिशा मोकळ्या सकळा । अवकाशीं खेळा ठाव जाला ॥ ३ ॥

॥ १३३२ ॥

वचनांचे मांडे दावावे प्रकार । काय त्या साचार कौतुकाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जातां घरा मागें । उरों नेणें खंती । मिळाल्या बहुती[8] फांकलि-
या ॥ ध्रु ॥
उदयीं च अस्त उदयें[9] संपादला । कल्पनेचा केलें[10] जागेपणें ॥ २ ॥
जाणवूनि[11] गेला हांडोरियां पोरां । सावध इतरां करुनी तुका ॥ ३ ॥

---

१ पं. अनुभव पोटीं०.—२ पं. परिचार.—३ पं. हर्षगीत.—४ पं. वचना.—५ पं. अष्टे प्रहर (अष्टौ प्रहर.)—६ दे पं देवाचें.—७ दे. पं. आशंकेचा.—८ दे. बहुतीं—९ दे. त. पं. उदयो.—१० त. जाला.—११ पं. जाणोनियां.

स्वामींस संतांनीं पुसलें कीं तुह्मांस वैराग्य कोण्या प्रकारें जालें तें सांगा–ते अभंग ॥ ३ ॥

॥ १३३३ ॥

याती[1] शूद्र वंश केला वेवसाव । आदि तो हा देव कुळपूज्य ॥ १ ॥
॥ ध्रु० ॥ नये बोलों परि पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न तुह्मीं संतीं ॥ध्रु०॥
संवसारें जालों अतिदुःखें दुखी । मायबाप सेखीं क्रमिलिया[2] ॥ २ ॥
दुष्काळें आटिलें द्रव्यें[3] नेला मान । स्त्री एकी अन्नअन्न करितां[4] मेली ॥३॥
लज्जा वाटे जीवा त्रासलों या दुःखें । वेवसाय देखें[5] तुटी येतां ॥ ४ ॥
देवाचें देऊळ होतें[6] तें भंगलें । चित्तासी जें आलें करावेंसें ॥ ५ ॥
आरंभीं कीर्तन करीं एकादशी । नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ॥ ६ ॥
कांहीं पाठ केलीं संतांचीं उत्तरें । विश्वासें आदरें करोनियां ॥ ७ ॥
गाती पुढें त्यांचें धरावें धृपद । भावें चित्त शुद्ध करोनियां ॥ ८ ॥
संताचें सेविलें तीर्थ पायवणी । लाज नाहीं मनीं येऊं दिली ॥ ९ ॥
टाकला तो कांहीं केला उपकार[7] । केलें हें शरीर कष्टवूनि ॥ १० ॥
वचन मानिलें नाहीं सुल्हदाचें[8] । समूळ प्रपंचें वीट आला ॥ ११ ॥
सत्य[9]असत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमतां ॥ १२ ॥
मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढ नामीं ॥ १३ ॥
यांवरिया[10] जाली कवित्वाची स्फूर्ति। पाय धरिले चित्तीं विठोबाचे ॥१४॥
निषेधाचा काहीं पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें ॥ १५ ॥
बुडविल्या वह्या बैसलों धरणें । केलें नारायणें समाधान ॥ १६ ॥

---

१ दे. याति शुद्र वैश. पं. याति शुद्ध वैश्य. त. याति शुद्र वौंश—२ दे. त. कर्मलिया.—३ पं. त. दव्ये—४ पं. करित.—५ दे. पं. देख.—६ पं. त. होतें जें भंगलें.—७ पं. पर उपकार.—८ दे. सुहुदाचें.—९ पं. सत्यअसत्याचें.—१० पं. यावरी.

विस्तारीं सांगतां बहुत प्रकार। होईल उशीर आतां पुगे ॥ १७ ॥
आतां आहे तैसा दिसतो विचार। पुढील प्रकार देव जाणे ॥ १८ ॥
भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा। कृपावंत ऐसा कळों आलें ॥ १९ ॥
तुका ह्मणे माझें सर्व भांडवल। बोलविले बोले पांडुरंगें ॥ २० ॥

॥ १३३४ ॥

ऐका वचन हें संत। मी तों आगळा पतित।
काय काजें प्रीत। करीतसां आदरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें चित मज ग्वाही। सत्य तरलों मी नाहीं।
एकांचिये वांहीं। एक देखीं मानिती ॥ ध्रु ॥
बहु पीडिलों संसारें। मोडीं पुसें पिटी ढोरें।
न पडतां पुरें। या विचारें राहिलों ॥ २ ॥
सहज सरलें होतें कांहीं। द्रव्य थोडें बहु तें ही।
त्याग केला नाहीं। दिलें द्विजां याचकां ॥ ३ ॥
प्रियापुत्रबंधु। यांचा तोडिला संबंधु।
सहज जालों मंदु। भाग्यहीन करंटा ॥ ४ ॥
तोंड न दाखवे जना। शिरें सांदी भरें राणां।
एकांत तो जाणां। तयासाटीं लागला ॥ ५ ॥
पोटें पिटिलों काहारें। दया नाहीं या विचारें।
बोलावितां बरें। सहज ह्मणें यासाटीं ॥ ६ ॥
सहज वडिलां होती सेवा। ह्मणोनि पूजितों या देवा।

१ पं. आला.–२ दे. "बोल" हा शब्द नाहीं.–३ पं पीडिलों.

तुका ह्मणे भावा । सार्टी झणी द्या कोणी ॥ ७ ॥

॥ १३३५ ॥

बरें जालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा केली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ अनुतापें तुझें राहिलें चिंतन । जाला[1] हा वमन संवसार ॥ ध्रु ॥
बरें जालें देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्यें ॥ २ ॥
बरें जालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें ॥ ३ ॥
बरें जालें नाहीं धरिली लोकलाज । बरा आलों तुज शरण देवा ॥ ४ ॥
बरें जालें तुझें केलें देवाईल । लेंकरें बाईल उपेक्षिलीं ॥ ५ ॥
तुका ह्मणे बरें व्रत एकादशी । केलें उपवासीं जागरण ॥ ६ ॥

॥ १३३६ ॥

बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल । करावा विठ्ठल जीवभाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येणें सोसें[2] मन जालें हांवभरी । परती माघारी घेत नाहीं ॥ ध्रु ॥
बंधनापासूनि उकलली गांठी । देतां आली मिठी सांवकाशें[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे देह[4] भारिला विठ्ठलें । कामक्रोधें केलें घर रितें ॥ ३ ॥

॥ १३३७ ॥

मीचि मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां पुरले नवस । निरसोनी गेली आस ॥ ध्रु ॥
जालों बरा बळी । गेलों मरोनि तेकाळीं ॥ २ ॥
दोहींकडे पाहे । तुका आहे तैसा आहे ॥ ३ ॥

---

१ पं. " हा " हा शब्द नाहीं.—२ पं. सोस० परत माघारी०.—३ पं. सावकाश.—४ पं.० देहीं भरला विठ्ठल । काम क्रोध केलें०.

॥ १३३८ ॥

जग अवघें देव । मुख्य उपदेशाची ठेव ॥ १ ॥

॥ धु. ॥ आधीं आपणयां नासी । तरि उतरे ये कसीं ॥ धृ ॥

ब्रह्मज्ञानाचें कोठार । तें[1] हें निश्चयें उत्तर ॥ २ ॥

तुका ह्मणे ते उन्मनी । नास कारया कारणीं ॥ ३ ॥

॥ १३३९ ॥

साधनांच्या कळा आकार आकृति । कारण नवनीतीं मथनाचें ॥ १ ॥

॥ धु. ॥ पक्षियासी नाहीं मारगीं आडताळा । अंतरिक्षीं[2] फळासी चि पावे ॥ धृ ॥

भक्तीची जोडी[3] ते उखत्या चि साटीं । उणें पुरें तुटी तेथें[4] नाहीं ॥२॥

तुका ह्मणे ओलें सांचत सांचणी । आजि जाली धणी एकसरें ॥ ३ ॥

॥ १३४० ॥

नाहीं येथें वाणी । सकळां वर्णीं घ्यावी धणी ॥ १ ॥

॥ धु. ॥ जालें दर्पणाचें अंग । ज्याचा त्यासी दावी रंग ॥ धृ ॥

एका भावाचा एकांत । पीक पिकला अनंत ॥ २ ॥

तुका खळे[6] दाणीं । करी बैसोनी वांटणी ॥ ३ ॥

॥ १३४१ ॥

ठेविलें जतन । करूनियां निज धन ॥ १ ॥

॥ धु. ॥ जयापासाव उत्पत्ति । तें हें बीज धरिलें हातीं ॥ धृ ॥

निवडिलें वरळा भूस । सार आइन जिंनस[7] ॥ २ ॥

---

१ पं. तें या निश्चयें.—२ पं. अंतरिक्ष. दे. त. अंतराक्षी.—३ पं. गोडी.—४ पं. येथें.—५ पं. आहे.—६ पं. खळ.—७ त. जिन्नस.

तुका ह्मणे नारायण । भाग संचिताचा गुण ॥ ३ ॥

॥ १३४२ ॥

भ्रमणा[1] पाउलें वेचिलीं तीं वाव । प्रवेशतां ठाव एक द्वार ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सार तीं पाउलें विठोबाचीं जीवीं । कोणीं न विसंभावीं[2] क्षणभरि ॥ ध्रु ॥

सुलभ हें केलें सकळां जीवन । फुंकावे[3] चि कान न लगेसें ॥ २ ॥

तुका ह्मणे येथें सकळ ही कोड । पुरे मूळ[4] खोड विस्ताराचें ॥ ३ ॥

॥ १३४३ ॥

कांहीं जाणों नये पांडुरंगाविण । पाविजेल सीण संदेहानें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ भलतिया नावें आळविला[5] पिता । तरि[6] तो जाणता कळवळा ॥ ध्रु ॥

अळंकार जातो[7] गौरवितां वाणी । सर्वगात्रा धणी हरिकथा ॥ २ ॥

तुका ह्मणे उपजे[8] विल्हाळें आवडी । करावा तो घडी घडी लाहो ॥ ३ ॥

॥ १३४४ ॥

बीजापोटीं पाहे फळ । विध न करितां सकळ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तया मूर्ख ह्मणावें[9] वेडें । कैसें तुटेल सांकडें ॥ ध्रु ॥

दावितिया[10] वाट । वेठी धरूं[11] पाहे चाट ॥ २ ॥

पुढिल्या उपाया । तुका ह्मणे राखे काया ॥ ३ ॥

॥ १३४५ ॥

मातेचीं जो थानें फाडी । तया जोडी कोण ते ॥ १ ॥

---

१ दे. भ्रमना.—२ पं. विसंबावीं.—३ पं. फुंकावा.—४ पं. मुळे.—५ पं. आळवितां.—६ त. परि.—७ पं. होतो.—८ दे. उपज विल्हाळे. पं. उपजे विल्हाळ.—९ पं. ह्मणावें तें वेडें.—१० पं. दावावया.—११ पं. धरूनि.

॥ ध्रु. ॥ वेदां निंदी तो चांडाळ । भ्रष्ट सुतकीया[1] खळ ॥ ध्रु ॥

अगी लावी घरा । मग वसती कोठें थारा ॥ २ ॥

तुका ह्मणे वर्म । येरा नांचावितो[2] भ्रम ॥ ३ ॥

॥ १३४६ ॥

वेश वंदाया पुरते । कोण ब्राह्मण निरुते ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसें सांगा मजपाशीं । संतां निरवितों येविशीं ॥ ध्रु ॥

असा जी प्रवीण । ग्रंथीं[3] कळे शुद्धहीण ॥ २ ॥

तुका ह्मणे लोपें । सत्याचिया घडती पापें ॥ ३ ॥

॥ १३४७ ॥

ज्या ज्या आह्मांपाशीं होतील[4] ज्या शक्ति । तेणें हा श्रीपती अळंकारूं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ अवघा पायांपाशीं दिला जीवभाव । जन्ममरणाठाव पुसियेला ॥ ध्रु ॥

ज्याचें देणें त्यासी घातला संकल्प । बंधनाचें पाप चुकविलें ॥ २ ॥

तुका ह्मणे येथें उरला विठ्ठल । खाये बाले बोल गाये[5] नाचे ॥ ३ ॥

॥ १३४८ ॥

आह्मी आळीकरें । प्रेमसुखाचीं लेंकुरें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पायीं गोविली वासना । तुच्छ[6] केलें ब्रह्मज्ञाना ॥ ध्रु ॥

येतां पाहें मुळा । वाट[7] पंढरीच्या डोळां ॥ २ ॥

तुका ह्मणे स्थळें । मग मी पाहेन सकळें[8] ॥ ३ ॥

॥ १३४९ ॥

आइत्याची राशी । आली पाकसिद्धीपाशीं ॥ १ ॥

---

१ दे. पं. सुतक्रिया.—२ पं. जाणवितो.—३ पं. ग्रंथ केले. सुद्धहीण.—४ पं. होईल.—५ गायनाचे.—६ दे. तुश. त. तुष्य.—७ पं. वास पंढरीचा.—८ पं. सकळ.

॥ ध्रु. ॥ आतां सांडोनि भोजन । भिके जावें वेडेपण[1] ॥ ध्रु ॥
उसंतिली[2] वाट । मागें परतावें फुकट ॥ २ ॥
तुका ह्मणे वाणी । वेचों बैसोन ठाकणीं[3] ॥ ३ ॥

॥ १३५० ॥

धन्य[4] शुद्र जाती । घरीं लौकरी परती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐकिलें तें चि कानीं । होय परिपाक मनीं ॥ ध्रु ॥
कळवळा पोटीं । सावधान हितासाठीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भाव । त्यांचा[5] तो चि जाणां देव ॥ ३ ॥

॥ १३५१ ॥

जीवित्व तें किती । हें चि धरितां बरें चित्तीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संत सुमनें[6] उत्तरें । मृदु रसाळ मधुरें ॥ ध्रु ॥
विसांवतां कानीं । परिपाक घडे मनीं ॥ २ ॥
तुका ह्मणे जोडी । हाय जतन रोकडी ॥ ३ ॥

॥ १३५२ ॥

अभिमानाची स्वामिनी[7] शांति । महत्व घेती सकळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कळोनि हीं[8] न कळे वर्म । तरि श्रम पावती ॥ ध्रु ॥
सर्व सत्ता केरितां धीर । वीर्यां[9] वीर आगळा ॥ २ ॥
तुका ह्मणे तिखट तिखें । मृदसखें आवडी ॥ ३ ॥

॥ १३५३ ॥

भोजन तें[10] पाशांतीचें । निचें[11] उंचें उसाळी ॥ १ ॥

---

१ दे. त वेडेपणें.–२ पं. उसंतील.–३ पं. टाकनी.–४ दे. धन्यें.–५ पं. ज्याचा.–६ पं. सुमन.–७ पं. स्वामिणी.–८ पं. हें.–९ पं. धरितां.–१० पं. "तें" शब्द नाहीं.–११ पं. उंच नीच.

॥ ध्रु. ॥ जैशी कारंज्याची कळा । तो जिव्हाळा स्वहिता[1] ॥ ध्रु ॥
कल्पना ते देवाविण । न करी भिन्न इतरीं ॥ २ ॥
तुका ह्मणे पावे मूर्ती । ते निश्चिंती मापली ॥ ३ ॥

॥ १३५४ ॥

पोटापुरतें काम । परि अगत्य तो राम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कारण तें हें चि करीं । चित्तीं पांडुरंग धरीं ॥ ध्रु ॥
प्रारब्धीं हेवा । जोडी देवाची ते सेवा ॥ २ ॥
तुका ह्मणे बळ । बुद्धी वेचूनि सकळ ॥ ३ ॥

॥ १३५५ ॥

बहुतां जन्मां अंतीं । जोडी लागली[2] हे हातीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मनुष्यदेहा ऐसा ठाव । धरीं पांडुरंगीं भाव ॥ ध्रु ॥
बहु केला फेरा । येथें सांपडला थारा ॥ २ ॥
तुका ह्मणे जाणे । ऐसे भले[3] ते शाहाणे ॥ ३ ॥

॥ १३५६ ॥

रूप नांवें[4] माया बोलावया ठाव । भागा आले भाव तयावरि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सींव वांटे परी न खंडे पृथिवी । शाहाणे ते जीवीं समजती ॥ ध्रु ॥
पोटा आलें तिच्या लोळे[5] मांड्यांवरि । पारखी न करी खंती चित्तीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भक्तीसाटीं हरिहर । अरूपीचें क्षर[6]विभाग हें ॥ ३ ॥

॥ १३५७ ॥

लेकराची आळी न पुरवी कैसी । काय तयापाशीं उणें जालें ॥ १ ॥

---

१ पं. स्वाहिताचा.—२ पं. लाधली.—३ पं. भलते. त. भले तें शाहणें.—४ पं. रूप नाव.—५ पं. लोडे मड्यावरी । पारखीये करी खंती तिची.—६ पं. क्षीर०.

॥ ध्रु. ॥ आह्मां लडिवाळां नाहीं तें प्रमाण । कांहीं ब्रह्मज्ञान आत्मस्थिति ॥ ध्रु॥
वचनाचा घेईन अनुभव पदरीं । जें हें जनाचारीं मिरवलें ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी भोळिवेची आटी । दावीन शेवटीं कौतुक हें ॥ ३ ॥

॥ १३५८ ॥

आर्तभूतांप्रति[1] । उत्तम योजाव्या त्या शक्ति ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फळ आणि समाधान । तेथें उत्तम कारण ॥ ध्रु ॥
अल्पें तो संतोषी । स्थळीं सांपडे उदेशीं ॥ २ ॥
सहज संगम । तुका ह्मणे तो उत्तम ॥ ३ ॥

॥ १३५९ ॥

मुळाचिया मुळें । दुःखें वाढती सकळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा योगियांचा धर्म । नव्हे वाढवावा श्रम ॥ ध्रु ॥
न कळे आवडी । कोण आहे[2] कैसी घडी ॥ २ ॥
तुका ह्मणे थींत[3] । दुःख पाववावें चित्त ॥ ३ ॥

॥ १३६० ॥

भाग्यवंतां हें चि काम । मापी नाम वैखरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आनंदाची पुष्टि अंगीं । श्रोते संगीं उद्धरती ॥ ध्रु ॥
पिकविलें[4] तया खाणें किती । पंगतीस सुकाळ ॥ २ ॥
तुका करी प्रणिपात । दंडवत आचारियां[5] ॥ ३ ॥

॥ १३६१ ॥

लटिकें तें रुचे । साच कोणां ही न पचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसा माजल्याचा गुण । भोगें कळों येइल सीण ॥ ध्रु ॥

---

१ पं. आर्तभूः प्रति.– २ त. आणे.– ३ दे त. थीतें. पं. स्थीत.– ४ पं. पिकलें.
५ पं. आचार्या.

वाढवी ममता । नाहीं वरपडला तो दूतां ॥ २ ॥

[1]कांहीं न मनी हेकड । तुका उपदेश माकड ॥ ३ ॥

॥ १३६२ ॥

कौतुकाची सृष्टी । कौतुकें चि केलें कष्टी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ मोडे तरी भलें खेळ । फांके फांकिल्या कोल्हाळ ॥ ध्रु ॥

[2]जाणणियासाटीं । भय सामावलें पोटीं ॥ २ ॥

तुका ह्मणे चेता । होणें तें तूं च आइता ॥ ३ ॥

॥ १३६३ ॥

भोवंडींसरिसें । अवघें भोंवत चि दिसे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ठायीं राहिल्या निश्चळ । आहे अचळीं अचळ ॥ ध्रु ॥

[3]एकें हाकेचा कपाटीं । तेथें आणीक नाद उठी ॥ २ ॥

[4]अभ्रें धांवे शशी । [5]तुका ह्मणे दुसरें भासी ॥ ३ ॥

॥ १३६४ ॥

[6]नव्हों आह्मी आजिकालींचीं । काचीं कुचीं [7]चाळवणी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ एके ठायीं मूळडाळ । ठावा सकळ आहेसी ॥ ध्रु ॥

तुमचें [8]आमचेंसें कांहीं । भिन्न नाहीं वांटलें ॥ २ ॥

तुका ह्मणे जेथें असें । तेथें दिसें तुमचासा ॥ ३ ॥

॥ १३६५ ॥

योग्याची संपदा त्याग आणि शांति । उभयलोकीं कीर्ति सोहळा मान ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ येरयेरांवरी जायांचें उसिणें । भाग्यस्थळीं देणें झाडावेसीं ॥ ध्रु ॥

---

१ दे. पं. न मनी माकड । काहीं उपदेश हेकड ॥.–२ त. पं. जाणनिया.–३ पं. एके.–४ पं. अभ्र.–५ दे. असे ते तें दुसरें भासी. पं. असे तेथें दुसरे भासी.–६ पं. नव्हे.–७ पं. वाळवणी.–८ पं. आमचें तें कांहां ।.

केलिया फावला ठायींचा तो लाहो । तृष्णेचा तो काहो कान्हवितो ॥२॥
तुका ह्मणे लाभ अकर्तव्या नांवें । शिवपद जीवें भोगिजेल ॥ ३ ॥

॥ १३६६ ॥

मरणा हातीं सुटली काया । विचारें या निश्चयें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नासोनियां गेली खंती । सहजस्थिति भो[1]गाचे ॥ ध्रु ॥
न देखें सें जालें श्रम । आलें वर्म हाता हें ॥ २ ॥
तुका ह्मणे कैची कींव । कोठें जीव निराळा ॥ ३ ॥

॥ १३६७ ॥

नव्हे ब्रह्मचर्य बाइलेच्या त्यागें । वैराग्य वाउगें देशत्यागें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काम वाढे भय वासनेच्या द्वारें । सांडावें तें धीरें औ[2]चावाचे ॥ध्रु॥
कांपवूनि टिरी शूरत्वाची मात । केलें वाताहात उचित काळें ॥ २ ॥
तुका ह्मणे करी जिव्हेसी विटाळ । लटिक्याची मळ स्तुति होतां ॥३॥

॥ १३६८ ॥

नको सांडूं अन्न नको सेवूं वन । चिं[3]तीं नारायण सर्व भो[4]गीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मातेचिये खांदीं बाळ नेणे सीण । भावना त्या भिन्न मुंडाविया ॥ ध्रु ॥
नको गुंपों भोगी[5] नको पडों त्यागीं । लावुनि स[6]रें अंगीं देवाचिया ॥२॥
तुका ह्मणे नको पुसों वेळोवेळां । उपदेश वेगळा उरला नाहीं ॥ ३ ॥

॥ १३६९ ॥

अवघी मिथ्या आटी । राम नाहीं तंव कंठीं ॥ १ ॥

---

१ पं. भोगावे.—२ पं. आचावचे —३ पं. चित्तीं —४ त. भागी.—५ पं. भागी.—६ पं. सर्व.—७ त. निराळा.

॥ ध्रु. ॥ सावधान सावधान । उगवीं संकल्पीं हें मन ॥ ध्रु ॥
सांडिलें तें मांडे । आग्रह[1] उरल्या काळें[2] दंडे ॥ २ ॥
तुका ह्मणे आलें[3] भागा । देउनि चित्तीं पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ १३७० ॥

न संगावें[4] वर्म । जनीं असों द्यावा भ्रम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उगीच लागतील पाठीं । होतीं रितीं च हिंपुटीं ॥ ध्रु ॥
सिकविल्या गोटी । शिंकोन न धरिती पोटीं[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे सीण । होइल अनुभवाविण ॥ ३ ॥

॥ १३७१ ॥

जातिविजातीची व्हावयासि भेटी । संकल्प तो पोटीं वाहों नये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ होणार तें घडो होणाराच्या गुणें । होइल नारायणें निर्मिलें तें ॥ ध्रु ॥
व्याघ्राचिये[6] भुके वधावी ते गाय । याचें नांव काय पुण्य असे ॥ २ ॥
तुका ह्मणे न करी विचार पुरता । गरज्याची माता पिता खर ॥ ३ ॥

॥ १३७२ ॥

शाहाणियां पुरे एक चि वचन । विशारती[7] खुण ते चि त्यासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उपदेश असे बहुतांकारणें । घेतला तो मनें पाहिजे हा[8] ॥ ध्रु ॥
फांसावेना तरि दुःख घेतें वाव । मग होतो जीव कासावीस ॥ २ ॥
तुका ह्मणे नको राग धरूं झोंडा । नुघडितां पीडा होइल डोळे ॥ ३ ॥

---

१ दे. आग्र. पं. अग्र.—२ पं. काळ.—३ पं. आला.—४ संगवे.—५ पं. शिकोनि धरितील पोटीं.—६ पं. व्याघ्राची ते.—७ "इशारती" असावें.—८ पं. "पाहिजे हा" याच्याबद्दल "पाहिजेल."

॥ १३७३ ॥

अभिनव[1] सुख तरि या विचारें । विचारावें बरें संतजनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रूपाच्या आठवें दोन्ही ही आपण । वियोग[2] तो क्षण होत नाहीं ॥ ध्रु ॥
पूजा तरि चित्तें कल्पौं[3] तें ब्रह्मांड । आहाच तो खंड एकदेसी ॥ २ ॥
तुका ह्मणे माझा अनुभव यापरि । डोई पायांवरि ठेवीतसें ॥ ३ ॥

॥ १३७४ ॥

नटनाट्य तुह्मी केलें याच साटीं । कवतुकें दृष्टी निववावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं तरि काय कळलें चि आहे । वाघ आणि गाय लांकडाची ॥ध्रु
अभेद चि असे मांडियेलें खेळा । केल्या दीपकळा बहुएकी ॥ २ ॥
तुका ह्मणे रूप नाहीं दर्पणांत । संतोषाची मात दुसरें तें ॥ ३ ॥

॥ १३७५ ॥

रवीचा प्रकाश । तो चि निशी घडे नाश ।
जाल्या बहुवस । तरि त्या काय दीपिका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां हा चि वसो जीवीं । माझे अंतरीं गोसावीं ।
होऊं येती ठावीं । काय वर्में यांच्यानें[4] ॥ ध्रु ॥
सर्वें असतां धणी । आड येऊं न सके कोणी ।
न लगे विनवणी । पृथकाची[5] करावी ॥ २ ॥
जन्माचिया * गति । येणें अवघ्या खुंटती ।
कारण ते प्रीति । तुका ह्मणे जवळी ॥ ३ ॥

---

१ दे. त. पं. अभिन्नव.—२ दे. वियोगें तो क्षीण—३ पं. कल्प.—४ पं. त्या पानें.
५ दे. त. पृथुकाची.

॥ १३७६ ॥

ऐसे सांडुनियां धुरे । किविलवाणी दिसां[1] कां रे ।
कामें[2] उर भरे । हातीं नुरे मृत्तिका ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उदार हा जगदानी । पांडुरंग अभिमानी ।
तुळसीदळ पाणी । चिंतनाचा भुकेला ॥ ध्रु ॥
न लगे पुसावी चाकरी । कोणी[3] वकील ये घरीं ।
त्यांचा[4] तो चाकरी । पारपत्य सकळ ॥ २ ॥
नाहीं आडकाटी । तुका ह्मणे जातां[5] भेटी ।
न बोलतां मिठी । उगी च पायीं घालावी ॥ ३ ॥

॥ १३७७ ॥

उपकारी[6] असे आरोणि उरला । आपुलें तयाला पर नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लाभावरि घ्यावें सांपडलें काम । आपला तो श्रम न विचारी[7] ॥ ध्रु ॥
जीवा ऐसें[8] देखे आणिकां जीवांसी । निखळ चि रासि गुणांची[9] च ॥ २ ॥
तुका ह्मणे देव तयांचा पांगिला । न भंगे संचला धीर सदा ॥ ३ ॥

॥ १३७८ ॥

कोणां[10] पुण्यें यांचा होईन सेवक । जींहीं द्वंद्वादिक[11] दुराविलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें वर्म मज दावीं नारायणा । अंतरीं[12] च खुणा प्रकटोनि[13] ॥ ध्रु ॥
बहु अवघड असे संतभेटी । तरि जगजेठी करुणा केली ॥ २ ॥

---

१ पं. दिसतां.—२ पं. कामीं—३ पं कोण वकील या घरीं.—४ पं. ज्याचा.—५ पं. जा भेटी.—६ पं. अपकारी असो उरोनि उरला.—७ पं. विचारितां.—८ पं. ऐसा—९ पं. गुणांचा.—१० पं. कोण्या पुण्यें त्यांचा.—११ दे. त. पं. द्वंद्वादिक.—१२ पं. अंतरींच्या.—१३ त. पं. प्रगटोनि.

तुका ह्मणे मं[1]ग नयें वृत्तीवरी । सुखाचे शेजारीं पहुडईन ॥ ३ ॥

॥ १३७९ ॥

क्षणक्षणां सांभाळितों । साक्षी होतों आपुला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न घडावी पायीं तुटी । मे[2]न मुठी घातलें ॥ ध्रु ॥
विचारतों वचनां आधीं । धरूनि शुद्धी ठेविली ॥ २ ॥
तुका ह्मणे मार्गे भ्यालों । तरीं जालों जागृत ॥ ३ ॥

॥ १३८० ॥

आगूनियां मना । आवघ्या धांडोळिल्या खुणा ।
देखिला तो राणा । पंढरपूरनिवासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ यासी अनुसरल्या काय । घडे ऐसें वांयां जाय ।
देखि[3]ले ते पाय । सम जीवीं राहाती ॥ ध्रु ॥
तो देखावा हा विध । चिं[4]तनें तें कार्य सिद्ध ।
आ[5]णिकां संबंध । नाहीं पर्वकाळासी ॥ २ ॥
तुका ह्मणे खळ । हो[6]तीं क्षणें चि निर्मळ ।
जाऊनियां मळ । वाळवंटीं नाचती ॥ ३ ॥

॥ १३८१ ॥

ध[7]रितां ये पंढरीची वाट । नाहीं संकट मुक्तीचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वंदूं येती देव पदें । त्या आनंदें उत्साहें ॥ ध्रु ॥
नृत्यछंदें उडती रज । जे सहज चालतां ॥ २ ॥
तुका ह्मणे गरुड टं[8]के । वैष्णव निके संभ्रम ॥ ३ ॥

---

१ पं. मन —२ पं. मनें मिठी घातली —३ पं धरिले.—४ पं. चिंतनें चि —५ पं. आणीक.—
६ दे. हो. त. होय.—७पं. धरितां पंढरीचीo.—८ दे. डके.

॥ १३८२ ॥

नाम घेतां मन निवे । जिव्हे[1] अमृत चि स्रवे ।
होताती बरवे । ऐसे शकुन लाभाचे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मन रंगलें रंगलें । तुझ्या चरणीं स्थिरावलें ।
केलिया विठ्ठलें । ऐसी कृपा जाणावी ॥ ध्रु ॥
जालें भोजनसें दिसे । चिरा पडोनि ठेला[2] इच्छे ।
धालियाच्या ऐसें । अंगा येती उद्गार ॥ २ ॥
सुख भेटों आलें सुखा । निध सांपडला मुखा ।
तुका ह्मणे लेखा । आतां नाहीं आनंदा ॥ ३ ॥

॥ १३८३ ॥

रुची रुची घेऊं गोडी । प्रेमसुखें जाली जोडी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काळ जाऊं नेदूं वांयां । चिंतूं[3] विठोबाच्या पायां ॥ ध्रु ॥
करूं भजन भोजन । धणी घेऊं नारायण ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव धाला । होय तुझ्यानें विठ्ठला ॥ ३ ॥

॥ १३८४ ॥

वेळोवेळां हें चि सांगें । दान मागें जगासी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठल हे मंगळवाणी । घेऊं धणी पंगती ॥ ध्रु ॥
वेचतसे पळें पळ । केलें बळ पाहिजे ॥ २ ॥
तुका ह्मणे दुश्चित नका । राहों[4] फुका नाड हा ॥ ३ ॥

---

१ पं. जीवें.—२ दे. छेला—३ दे. चिंतितां. त. चिंती.—४ पं. राहे.

॥ १३८५ ॥

आणीक ऐसें कोठें सांगा । पांडुरंगा सारिखें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दैवत ये भूमंडळीं । उद्धार कळी पावविते॑ ॥ ध्रु ॥
कोठें कांहीं कोठें कांहीं । शोध ठायीं स्थळासी ॥ २ ॥
अन्यत्रींचें॑ तीर्थीं नासे । तीर्थीं वसे वज्रलेप ॥ ३ ॥
पांडुरंगींचें पांडुरंगीं । पाप अंगीं राहेना ॥ ४ ॥
ऐसें हरें गिरिजेप्रति । गुह्य स्थिती सांगितली ॥ ५ ॥
तुका ह्मणे तीर्थ क्षेत्र । सर्वत्र हें दैवत ॥ ६ ॥

॥ १३८६ ॥

पुराणींचा॑ इतिहास । गोड रस सेविला॑ ॥ १ ॥
नव्हती हे आह्माच बोल । मोकळे फोल कवित्व ॥ ध्रु ॥
भावें घ्या रे भावें घ्या रे । ऐंकदा॑ जा रे पंढरिये ॥ २ ॥
भाग्यें आलेति मनुष्यदेहा । तो हा पाहा विठ्ठल ॥ ३ ॥
पापपुण्या करील झाडा । जाइल पीडा जन्माची ॥ ४ ॥
घ्यावी हातीं टाळदिंडी । गावे तोंडीं गुणवाद ॥ ५ ॥
तुका ह्मणे घटापटा । न लगे वाटा शोधाव्या ॥ ६ ॥

॥ १३८७ ॥

कर्म धर्म नव्हती सांग । उण्या अंगें पतन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भलत्या काळें॑ नामावळी । सुलभ भोळी भाविकां ॥ ध्रु ॥
प्रायश्चित्तें पडती पायां । गातीं तयां वैष्णवां ॥ २ ॥

१ दे. पाविते.—२ दे. आनेत्रींचें. त. अन्नेत्रींचें.—३ त. हा अभंग चार चरणी धरून “ भावें घ्यारे भावे घ्यारे । एकदा जारे पंढरिये ” हें एवढेंच ध्रुवपद धरलें आहे; आणि शेवटच्या कडव्यांत “ तुका ह्मणे० ” हें अर्ध पूर्वीं असून “ घ्यावी हातीं० ” हें अर्ध पुढें आहे.—४ त. पं. निवडिला.—५ दे. येगदा.—६ पं. काळीं.

तुका ह्मणे नुपजे दोष । करा घोष आनंदें ॥ ३ ॥

॥ १३८८ ॥

पाहा रे हें दैवत कैसें । भक्तिपिसें भाविक[1] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पाचारिल्या सरिसें पावे । ऐसें[2] सेवे बराडी ॥ ध्रु ॥
शुष्ककाष्टीं[3] गुरुगुरी । लाज हरि न धरी ॥ २ ॥
तुका ह्मणे अर्धनारी । ऐसीं धरी रूपडीं ॥ ३ ॥

॥ १३८९ ॥

बहुत सोसिले मागें न कळतां । पुढती काय आतां अंध व्हावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एकाचिये अंगीं हें ठेवावें लावून । नये भिन्न भिन्नां[4] चांचपडों ॥ ध्रु ॥
कोण होईल तो ब्रह्मांडचाळक । आपण चि हांक[5] देइल हाके ॥ २ ॥
तुका ह्मणे दिलीं चेतवूनि सुनीं[6] । कौतुकावांचूनि नाहीं छळ ॥ ३ ॥

॥ १३९० ॥

आश्चर्य या वाटे नसत्या छंदाचें । कैसें दिलें साचें करोनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दुजियासी तंव अँकळ[7] हा भाव । करावा तो जीव सांक्षी[8] येथें ॥ ध्रु
एकीं अनेकत्व अनेकीं एकत्व । प्रकृतिस्वभाव प्रमाणें चि ॥ २ ॥
तुका ह्मणे करूं उगवूं जाणसी । कुशळ येविशीं तुह्मी देवा ॥ ३ ॥

॥ १३९१ ॥

अस्त नाहीं आतां एक चि मोहोरा[9] । पासूनि अंधारा दुरि जालों ॥ १ ॥
॥ ध्रु. सांक्षत्वें[10] या जालों गुणाचा देखणा । करीं नारायणा तरी खरें ॥ध्रु॥

---

१ पं. भाविका.—२ पं. ऐसी सवें.—३ दे. त. शुल्क काष्टीं. पं. शुष्त्र काष्टीं गुरगुरी.—४ पं. भिन्न भिन्न.—५ दे. आपणें चि हाके देईल हाके. । पं. आपण चि हाके देइल हाक.—६ दे. सुणीं—७ दे. त. पं. आकळ.—८ दे. पं. साक्ष.—९ पं. मोहरा.—१० पं. साक्षेत्वें.

आठवें विसरु पडियेला मार्गें । आलें तें चि भार्गें यत्न केलें ॥ २ ॥

तुका ह्मणे माझा विनोद देवासी । आह्मी तुह्मां ऐसीं दोन्ही नव्हों ॥ ३ ॥

॥ १३९२ ॥

क्षर अक्षर हे तुमचे विभाग । कासयानें जग दुरी धरा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तैसें आह्मी नेणों पालटों च कांहीं । त्यागिल्याची नाहीं मार्गें चाड ॥ ध्रु ॥

प्रतिपादिता तूं समविषमाचा । प्रसाद तो याचा पापपुण्य ॥ २ ॥

तुका ह्मणे तुह्मां नाना अवगणीं । लागे संपादणी लटिक्याची ॥ ३ ॥

॥ १३९३ ॥

सर्वरसीं मीनलें चित्त । अखंडित आनंदु ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ गोत पति विश्वंभरीं । जाला हरि सोयरा ॥ ध्रु ॥

वोळखी ते एका नांवें । इतरभावें खंडणा ॥ २ ॥

तुका ह्मणे नांवें रूपें । दुसरीं पापें हारपलीं ॥ ३ ॥

॥ १३९४ ॥

मीं हें ऐसें काय जाती । अवघड किती पाहातां ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नाहीं होत उल्लंघन । नसतां भिन्न दुसरें ॥ ध्रु ॥

अंधारानें तेज मेलें । दृष्टिखालें अंतर ॥ २ ॥

तुका ह्मणे सर्वें देव । घेतां ठाव दावील ॥ ३ ॥

॥ १३९५ ॥

कवीश्वरांचा तो आह्मांसी विटाळ । प्रसाद वोंगळ चिवडिती ॥ १ ॥

---

१ पं. त. इतर वाव.—२ दे. कवेश्वरांचा. त. पं. कवेश्वराचा.—३ पं. आह्मां.

॥ ध्रु.॥ दंभाचे[1] आवडी बहिराट अंधळे । सेवटासि काळें होइल तोंड ॥ध्रु.॥
सोन्यासेजारीं[2] तों लाखेची जतन । संतंत[3] ते गुण जैसेतैसे ॥ २ ॥
सेव्यसेवकता[4] न पडतां ठावी । तुका ह्मणे गोवी पावती हीं ॥ ३ ॥

॥ १३९६ ॥

वाढलियां मान न मनावी निश्चिती । भूतांचिये प्रीती भूतपण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि[5] मना लावावी कांचणी । इंद्रियांचे ह्मणी ओढी भरे ॥ध्रु.॥
एका एकपणें एकाचिये अंगीं । लागे रंग रंगीं मिळालिया[6] ॥ २ ॥
तुका ह्मणे देव निष्काम निराळा । जीवदशे चाळा चळणांचा ॥ ३ ॥

॥ १३९७ ॥

माया साक्षी आह्मी नेणों भीड भार । आप आणि पर नाहीं दोन्ही ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सत्याचिये साटीं अवघा चि भरे । नावडे व्यापार तुटीचा तो ॥ध्रु.॥
पोंभाळितां[7] चरे अंतरींचें दुःख । लासें फांसें मुख उघडावें ॥ २ ॥
तुका ह्मणे नव्हे स्फीतीचा हा ठाव । निवाड्यासी देव साक्षी केला ॥ ३ ॥

॥ १३९८ ॥

संतां आवडे तो काळाचा ही काळ । समर्थाचें बाळ जेवीं समर्थ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ परिसतां तेथें नाहीं एकविणें[8] । मोहें[9] न पवे सीण ऐसें राखे ॥ध्रु.॥
केले अन्याय ते सांडवी उपचारें । न देखे दुसरें नाशा[10] मूळ ॥ २ ॥
तुका ह्मणे मुख्य कल्पतरुछाया । काय नाहीं दया तये ठायीं ॥ ३ ॥

॥ १३९९ ॥

संतांच्या धिक्कारें[11] अमंगळ जिणें । विश्वशत्रु तेणें सांडी परि ॥ १ ॥

---

१ पं. दंभाची आवडी बहिरट०.–२ पं. सोन्याचे सेजारीं०.–३ पं. सतंत.–४ दे. सेव्य सेववता. पं. सेव्य सेकता.–५ पं. ह्मणोनिया.–६ त. मिळालिया.–७ दे. पोंभाळितां.–८ पं. एकेविणे. त. एकेविण.–९ पं. मोहो.–१० दे. पं. नासा.–११ दे. त. पं. धीकारें.

॥ ध्रु. ॥ कुळ आणि रूप वांयां संवसार[1] । गेला भरतार[2] मोकलितां ॥ ध्रु ॥
मूळ राखे तया फळा काय उणें । चतुर लक्षणें[3] राखों जाणे ॥ २ ॥
तुका ह्मणे सायास तो एके ठायीं । दीप हातीं तई अवघें बरें ॥ ३ ॥

॥ १४०० ॥

ओलें मूळ भेदी खडकाचें अंग । आभ्यासासी सांग कार्यसिद्धि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड । नाहीं कईवाड तोंच वरि ॥ ध्रु ॥
दोरें चिरा कापे पडिला[4] कांचणी । अभ्यासें[5] सेवनीं विष पडे ॥ २ ॥
तुका ह्मणे कैंचा बैसण्यासी ठाव । जठरीं बाळा वाव एकाएकीं ॥ ३ ॥

॥ १४०१ ॥

अमर आहां अमर आहां । खरें कीं पाहा खोटें हें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न ह्मणां देह माझा ऐसा । मग भरवसा कळेल ॥ ध्रु ॥
कैंचा धाक कैंचा धाक । सकळिक हें आपुलें ॥ २ ॥
देव चि बरे देव चि बरे । तुका ह्मणे खरे[6] तुह्मी ॥ ३ ॥

॥ १४०२ ॥

काम नाहीं काम नाहीं । जालों पाहीं रिकामा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फावल्या या करूं चेष्टा । निश्चळ द्रष्टा[7] बैसोनि ॥ ध्रु ॥
नसत्या छंदें नसत्या छंदें । जग विनोदें विन्हडतसे[8] ॥ २ ॥
एकाएकीं एकाएकीं । तुका लोकीं[9] निराळा ॥ ३ ॥

॥ १४०३ ॥

हातीं घेऊनियां काठी । तुका लागला कांळिवरा[10] पाठी ॥ १ ॥

---

१ पं. संसार –२ पं. भ्रतार.–३ पं. लक्षण.–४ पं. पडिल्या –५ पं. अभ्यास.–६ त. खरे खरे तुह्मी.–७ दे. त. पं. दृष्टा.–८ पं. विन्हळतसे.–९ त. लोकिकीं –१० पं. कळिवरा.

॥ ध्रु. ॥ नेऊनि निजविलें स्मशानीं । माणसें जाळी[1] ते ठाकणीं ॥ ध्रु ॥
काढिलें तें ओढें । मागील उपचाराचें पुढें ॥ २ ॥
नाहीं वाटों आला भेव । सुख दुःख भोगिता देव ॥ ३ ॥
याजे[2]साटीं हें निर्वाण । केलें कसियेलें मन ॥ ४ ॥
तुका ह्मणे अनुभव बरा । नाहीं तरी शास्त[3] होय चोरा ॥ ५ ॥

॥ १४०४ ॥

कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ प्रेमाछंदें नाचे डोले । [4]हारपला देहभाव ॥ ध्रु ॥
एकदेशीं जीवकळा । हा सकळां सोयरा[5] ॥ २ ॥
तुका ह्मणे उरला देव । गेला भेव त्या[6] काळें ॥ ३ ॥

॥ १४०५ ॥

न[7] बोलेसी करा वाचा । उपाधीचा संबंध ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एका तुमच्या नामाविण । अवघा सीण कळतसे ॥ ध्रु ॥
संकल्पाचे ओढी मन । पापपुण्य सम[8] चि ॥ २ ॥
तुका ह्मणे नारायणीं । पावो वाणी विसांवा ॥ ३ ॥

॥ १४०६ ॥

प्रारब्धा हातीं जन । सुख सीण पावतसे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करितां घोंयाळाचा[9] संग । अगें अंग माखावें ॥ ध्रु ॥
आविसा अंगें पीडा वसे । त्यागें असे बहु सुख ॥ २ ॥
तुका ह्मणे जीव भ्याला । अवघ्या आला बाहेरी ॥ ३ ॥

---

१ पं. " जाळी ते " याच्याबद्दल " जाळीत. " .—२ पं. याच साटीं.—३ दे. सास्त.—४ पं. हरपले.—५ पं. सोइरा —६ पं. ते काळीं.—७ पं. न बोलसी.—८ पं. सवें.—९ दे. घाईळाचा.

॥ १४०७ ॥

आशा ते करविते बुद्धीचा[1] लोप । संदेह तें पाप कैसें नव्हे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आपला आपण करावा विचार । प्रसन्न तें सार मन ग्वाही[2] ॥ ध्रु. ॥

नांवें रूपें अंगीं लाविला विटाळ । होतें[3] त्या निर्मळ शुद्ध बुद्ध ॥ २ ॥

अंधळ्यानें नये देखण्याची चाली । चालों ऐसी बोली तुका बोले ॥ ३ ॥

॥ १४०८ ॥

जळो आतां नांव रूप । माझें पाप गांठींचें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ संतांचिया चरणरजें । उतरूं ओझें मातीचें ॥ ध्रु. ॥

लटिकियाचा[4] अभिमान । होता शीण पाववित[5] ॥ २ ॥

तुका ह्मणे अरूपींचें । सुख साचें निनांवें ॥ ३ ॥

॥ १४०९ ॥

निंदा स्तुती करवी पोट । सोंग दाखवी बोभाट ॥ १ ॥

॥ जटा राख विटंबना । धीर नाहीं क्षमा मना ॥ ध्रु. ॥

शृंगारिलें मढें । जीवेंविण जैसें कुडें ॥ २ ॥

तुका ह्मणे रागें । भलतें चावळे वाउगें ॥ ३ ॥

॥ १४१० ॥

भिक्षापात्र[6] अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ।

ऐसियासी नारायणें । उपेक्षीजे सर्वथा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ देवा पायीं नाहीं भाव । भक्ति वरी वरी वाव ।

समर्पिला जीव । नाहीं तो हा व्यभिचार ॥ ध्रु. ॥

---

१ पं. आपुल्या.—२ दे. गोही.—३ पं. ते.—४ पं. लटिका चि.—५ दे. पाविव.—६ दे. भिक्ष्यापत्र. त. भिक्षापात्र.

जगा घालावें सांकडें । दीन होऊनि बापुडें ।
हें चि अभाग्य रोकडें । मूळ[१] आणि विश्वास ॥ २ ॥
काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार ।
तुका ह्मणे सार । दृढ पाय धरावे ॥ ३ ॥

॥ १४११ ॥

भावबळें विष्णुदास । नाहीं नाश[२] पावत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ योगभाग्यें घरा येती । सर्व शक्ति चालत ॥ ध्रु ॥
पित्याचें जें कांय[३] धन । पुत्रा कोण वंचील ॥ २ ॥
तुका ह्मणे कडे बैसों । तेणें असों निर्भर ॥ ३ ॥

॥ १४१२ ॥

कोरड्या [४]गोष्टी चटक्या बोल । शिकल्या सांगे नाहीं ओल ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोण यांचें मना आणी । ऐकों कानीं नाइकोनि ॥ ध्रु ॥
घरोघरीं सांगती ज्ञान । भूस [५]सिणें कांडिती ॥ २ ॥
तुका ह्मणे आपुल्या मति । काय रितीं पोकळें[६] ॥ ३ ॥

॥ १४१३ ॥

नव्हतियाचा सोस होतां । झडो आतां पदर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देखणें तें देखियेलें । आतां भलें साक्षित्वें ॥ ध्रु ॥
लाभें[७] कळों आली हानि । राहों दोन्हीं निराळीं ॥ २ ॥
तुका ह्मणे एकाएकीं । हा[८] कां लोकीं पसारा ॥ ३ ॥

१ पं. मूळ आणि विश्वासा.— २ दे. त. नास.—३ पं. का.—४ दे. त. गोठी.—५ पं. त. सीण.—६ पं. पोकळ.—७ पं. लाभ.—८ पं. हा लोकिकीं पसारा. त. हा कां लोकिकीं पसारा.

॥ १४१४ ॥

सोसें वाढे दोष । जाला न पालटे कस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसें बरवें वचन । करितां[1] तें नारायण ॥ ध्रु ॥
असे[2] प्रारब्ध नेमें । श्रमें चि उरे श्रमें[3] ॥ २ ॥
सुख देते शांती । तुका ह्मणे धरितां चित्तीं ॥ ३ ॥

॥ १४१५ ॥

काय शरीराचें काम । कृपा साधावया प्रेम ।
उचिताचे धर्म । भागा आले ते करूं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देईन हाक नारायणा । तें तों नाकळे बंधना ।
पंढरीचा राणा । आइकोन धांवेल ॥ ध्रु ॥
सातांपांचांचें गोठलें । प्रारब्धें आकारलें ।
आतां हें संचलें । असो भोगा सांभाळीं ॥ २ ॥
फांवली[4] ते बरवी संधि । सावधान करूं बुद्धी ।
तुका ह्मणे मधीं । कोठें नेघें विसावा ॥ ३ ॥

॥ १४१६ ॥

न लगे देशकाळ । मंत्रविधानें सकळ ।
मनें चि निश्चळ । करूनि करुणा भाकावी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ येतो बैसलिया ठाया । आसनें[5] व्यापी देवराया ।
निर्मळ ते काया । अधिष्ठान तयाचें ॥ ध्रु ॥
कल्पनेचा साक्षी । तरि आदरें[6] चि लक्षी ।

---

१ त. करितो.—२ पं. असो—३ दे. श्रमुचि उरे श्रम. त. श्रमुचि उरे श्रमें.—४ पं. पावली.—५ दे. आसणें. त. असणें—६ पं. आदर लक्षी.

आवडीनें भक्षी । कोरडे धान्य मटमटां ॥ २ ॥
घेणें तरि भाव । लक्षी दासांचा उपाव ।
तुका ह्मणे जीव । जीवीं मेळविल अनंत ॥ ३ ॥

॥ १४१७ ॥

नाहीं ऑलें[1] भक्तिसुख अनुभवा । तो मी ज्ञान देवा काय करूं ॥ १ ॥
॥ध्रु.॥ नसावें जी तुह्मी कांहीं निश्चिंतीनें । माझिया वचनें अभेदाच्या ॥ध्रु॥
एकाएकीं मन नेदी समाधान । देखिल्या चरण वांचूनियां ॥ २ ॥
तुका ह्मणे वाचा गुणीं लांचावली । न राहे उगली मौन्य मज ॥ ३ ॥

॥ १४१८ ॥

मागतां विभाग । कोठें लपाल जी मग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ संत साक्षी या वचना । त्यांसी ठाउकिया खुणा ॥ ध्रु ॥
होइन धरणेकरी । मग मी रिघों नेदीं बाहेरी ॥ २ ॥
तुका ह्मणे मी अक्षर । तुज देवपणाचा भार ॥ ३ ॥

॥ १४१९ ॥

मिटवण्याचे[2] धनी । तुह्मी व्यंवसाय[3] जनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोण पडे ये लिगाडीं । केली तैसीं उगवा कोडीं ॥ ध्रु ॥
केलें सांगितलें काम । दिले पाळूनियां धर्म ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां । असो तुमचें तुमचे माथां ॥ ३ ॥

॥ १४२० ॥

समर्पिली वाणी । पांडुरंगीं घेते[4] धणी ॥ १ ॥

---

१ पं त. "आलें" हा शब्द नाहीं--२ मी टेवण्याचे धणी । तुह्मीं येवसाय.—३ दे. बेवसाय.—४ पं. घेती.

॥ ध्रु. ॥ पूजा होते[1] मुक्ताफळीं । रस ओविया मंगळीं ॥ ध्रु ॥
धार अखंडित । ओघ[2] चालियेला नित्य ॥ २ ॥
पूर्णाहुति जीवें[3] । तुका घेउनि[4] ठेला भावें[5] ॥ ३ ॥

॥ १४२१ ॥

अवघा चि आकार ग्रासियेला काळें । एक[6] चि निराळें हरिचें नाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धरूनि राहिलों अविनाश कंठीं । जीवन हें पोटीं सांटविलें ॥ ध्रु ॥
शरीरसंपत्ति मृगजळभान । जाईल नासोन खरें नव्हे ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां उपाधीच्या नांवें । आणियेला देवें वीट मज ॥ ३ ॥

॥ १४२२ ॥

बोलणें चि नाहीं । आतां देवाविण कांहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एकसरें केला नेम । देवा दिले क्रोध काम ॥ ध्रु ॥
पाहेन ते पाय । जोंवरि हे दृष्टि धाय ॥ २ ॥
तुका ह्मणे मनें । हे चि संकल्प वाहाणें ॥ ३ ॥

॥ १४२३ ॥

येथूनियां ठाव । अवघे लक्षायाचे भाव ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उंची देवाचे चरण । तेथें जालें अधिष्ठान ॥ ध्रु ॥
आघातांविगळा । असे ठाव हा निराळा ॥ २ ॥
तुका ह्मणे स्थळ । धरूनि राहिलों अचळ ॥ ३ ॥

॥ १४२४ ॥

भरला दिसे हाट । अवघी वाढली खटपट ।

---

१ पं. होती.–२ दे. नित.–३ पं जीव.–४ त होउनि.–५ पं. भाव.–६ त. एका चि. पं. एकलें. निराळें०.

संचिताचे[1] वाट । वाटाऊनि फांकती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भोगा ऐसे ठायाठाव । कर्मा त्रिविधाचे भाव ।
द्रष्टा येथें देव । विरहित संकल्पा[2] ॥ ध्रु ॥
दिला पाडूनियां धडा । पापपुण्यांचा निवाडा ।
आचरती गोडा । आचरणें आपुलाल्या ॥ २ ॥
तुका ह्मणे पराधीनें । जालीं ओढलिया ऋणें ।
तुटती बंधनें । जैंरि[3] देवा आळविते ॥ ३ ॥

॥ १४२५ ॥

आला भागासी तो करीं वेवसाव । परि राहो भाव तुझ्या पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय चाले तुह्मीं बांधलें दातारा । वाहिलिया भारा उसंतितों ॥ ध्रु ॥
शरीर तें करी शरीराचे[4] धर्म । नको देऊं वर्म चुकों मनौं[5] ॥ २ ॥
चळण फिरवी ठाव बहुवस । न घडो[6] आळस चिंतनाचा ॥ ३ ॥
इंद्रियें करोत आपुले[7] व्यापार । आवडीसी थार देई पायीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे नको देऊं काळा हातीं । येतों काकुलती ह्मणऊनि ॥ ५ ॥

॥ १४२६ ॥

आह्मां अवघें भांडवल । येथें[8] विठ्ठल एकला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कायावाचामनोभावें । येथें जीवें वेचलों ॥ ध्रु ॥
परतें कांहीं नेणें दुजें । तत्त्वेंबीजें[9] पाउलें ॥ २ ॥
तुका ह्मणे संतसंगें । येणें रंगें रंगलों ॥ ३ ॥

---

१ त. संचिताची वाट. पं. संचिताचे वाटे । वाटा होउनि फाकती ॥.—२ त. पं. संकल्प.—३ पं. जरि या देवा.—४ पं. शरीराचा.—५ पं. मज.—६ पं. पडो.—७ त. आपुला. पं. आपुलाला.—८ पं. एक.—९ पं. तत्वबीज.

॥ १४२७ ॥

साहोनियां टोले उरवावें सार । मग अंगीकार खऱ्या मोलें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ भोगाचे सांभाळीं द्यावें कळिवर । संचितांची[1] थार मोडूनियां ॥ ध्रु ॥

महत्त्वाचे ठायीं भोगावी अप्रतिष्ठा । विटवावें नष्टां पंचभूतां ॥ २ ॥

तुका ह्मणे मग कैंचा संवसार । जयाचा आदर तें चि व्हावें ॥ ३ ॥

॥ १४२८ ॥

निर्वैर होणें साधनाचें[2] मूळ । येर ते विल्हाळ सांडीमांडी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नाहीं चालों येतें[3] सोंगसंपादणी[4] । निवडे अवसानीं शुद्धाशुद्ध ॥ ध्रु ॥

त्यागा नांव तरी निर्विषयवासना । कार्यकारणांपुरते[5] विधि ॥ २ ॥

तुका ह्मणे राहे चिंतनीं आवडी । येणें नांवें जोडी सत्यत्वेंशीं ॥ ३ ॥

॥ १४२९ ॥

पशु ऐसे होती ज्ञानी । चर्वणीं यां[6] विषयांचे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ठेवूनियां लोभीं लोभ । जाला क्षोभ आत्मत्वीं ॥ ध्रु ॥

केला आणिकां वाढी पाक । खाणें ताक मूर्खासी ॥ २ ॥

तुका ह्मणे मोठा घात । वाताहात हा देह ॥ ३ ॥

॥ १४३० ॥

कां जी धरिलें नाम । तुह्मी असोनि निष्काम ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कोणां सांगतसां ज्ञान । ठकाठकीचें लक्षण ॥ ध्रु ॥

आवडीनें नाचें । आहे तरी पुढें साचें ॥ २ ॥

---

१ दे. संचित चि.—२ पं. साधनाच्या मुळें.—३ दे येती.—४ त. सोंग संपादनी.—५ दे. त. कारीये.—६ पं. "या" नाहीं.

तुका ह्मणे प्रेम । नाहीं भंगायाचें काम ॥ ३ ॥

॥ १४३१ ॥

खरें बोले तरी । फुकासाठीं जोडे हरी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसे फुकाचे उपाय । सांडूनियां वांयां जाय ॥ ध्रु ॥

परउपकार । एका वचनाचा फार ॥ २ ॥

तुका ह्मणे मळ । मनें सांडितां शीतळ ॥ ३ ॥

॥ १४३२ ॥

दया क्षमा शांति । तेथें[1] देवाची वसति ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पावे धांवोनियां घरा । राहे धरोनियां थारा ॥ ध्रु ॥

कीर्तनाचे वाटे । बराडिया ऐसा लोटे ॥ २ ॥

तुका ह्मणे घडे । पूजा नामें[2] देव जोडे ॥ ३ ॥

॥ १४३३ ॥

शिष्याची जो नेघे सेवा । मानी देवासारिखें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ त्याचा फळे[3] उपदेश । आणिकां[4] दोष उफराटे ॥ ध्रु ॥

त्याचें खरें ब्रह्मज्ञान । उदासीन देहभावीं[5] ॥ २ ॥

तुका ह्मणे सत्य सांगें । येति[6] रागें येती ते ॥ ३ ॥

॥ १४३४ ॥

माझीं मेलीं बहुवरि । तूं कां जैसा तैसा हरी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ विठो कैसा वांचलासि । आतां सांग मजपाशीं ॥ ध्रु ॥

तुज देखतां चि माझा । बाप गेला आजा पणजा ॥ २ ॥

---

१ पं. तेथें देवाची हे वस्ती.–२ पं.० नाम देव०.–३ त. खरा.–४ पं. येरा.–५ पं. देहेभावे.–६ पं. येउत.

आह्मां लागलेंसे पाठीं । बाळत्व तारुण्य[1] काठीं ॥ ३ ॥
तुज फावलें तें मार्गें । कोणी नसतां वादिलागें ॥ ४ ॥
तुका ह्मणे तुझ्या अंगीं । मज देखिल लागलीं अवघीं[2] ॥ ५ ॥

॥ १४३५ ॥

आणीक कोणाचा न करीं मी संग । जेणें होय भंग माझ्या चित्ता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठलावांचूनि आणीक जे वाणी । नाइकें मी कानीं आपुलिया ॥ ध्रु ॥
समाधानासाटीं बोलावी हे मात । परि माझें चित्त नाहीं कोठें ॥ २ ॥
जिवाहूनि मज ते चि आवडती । आवडे ज्या चित्तीं पांडुरंग ॥ ३ ॥
तुका[3] ह्मणे माझें तो चि जाणे हित । आणिकांच्या चित्त नेदीं[4] बोला ॥ ४ ॥

॥ १४३६ ॥

आशा हे समूळ खाणोनि काढावी । तेव्हां चि गोसावी व्हावें तेणें[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं तरि सुखें असावें संसारीं । फजिती दुसरी करूं नये ॥ ध्रु ॥
आशा मारूनियां जयवंत व्हावें । तेव्हां चि निघावें सर्वांतूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे जरीं योगाची तांतडी । आशेची बीबुडी करीं आधीं ॥ ३ ॥

॥ १४३७ ॥

निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म । निर्धार हें वर्म चुकों नये ॥ १ ॥
निष्काम निश्चळ विठ्ठलीं विश्वास । पाहों नये वास आणिकांची ॥ २ ॥
तुका ह्मणे ऐसा कोणें[6] उपेक्षिला । नाहीं ऐकिला ऐसा कोणीं ॥ ३ ॥

---

१ दे. तारुण्यें.—२ दे. औघीं—३ पं. तुका ह्मणे तो चि जाणे माझें हित ।.—४ पं. नाहीं.—५ त. त्यांनीं.—६ पं. कोण.

॥ १४३८ ॥

नामाचें चिंतन प्रगट पसारा । असाल तें करा जेथें तेथें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सोडवील माझा स्वामी निश्चयेसीं । प्रतिज्ञा हे दासीं केली आह्मीं ॥ ध्रु ॥

गुण दोष नाहीं पाहात[1] कीर्तनीं । प्रेमें चक्रपाणी वश्य होय ॥ २ ॥

तुका ह्मणे कडु वाटतो प्रपंच । रोकडे रोमांच कंठ दाटे ॥ ३ ॥

॥ १४३९ ॥

नाम ह्मणतां मोक्ष नाहीं । ऐसा उपदेश करिती[2] कांहीं ।

बधिर व्हावें त्याचे ठायीं । दुष्ट वचन वाक्य तें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जयाचे राहिलें मानसीं । ते[3] चि पावले तयासी ।

यांचपडतां मेलीं पिसीं । भलतैसीं वाचाळें ॥ ध्रु ॥

नवविधीचा[4] निषेध । जेणें मुखें करिती वाद ।

जन्मा आले निंद्य । शूकरयाती संसारा ॥ २ ॥

काय सांगों वेळोवेळां । आठव नाहीं[5] चांडाळा ।

नामासाटीं बाळा । क्षीरसागरीं कोंडिलें ॥ ३ ॥

आपुलिया नामासाठीं । लागे शंखासुरापाठीं ।

फोडोनियां[6] पोटीं । वेद चारी काढिले ॥ ४ ॥

जगीं प्रसिद्ध[7] हे बोली । नामें गणिका तारिली ।

आणिकें ही उद्धरिलीं । पातकी महादोषी ॥ ५ ॥

जे हे पवाडे गर्जती । नाम प्रल्हादाच्या[8] चित्तीं ।

१ त. पाहातां.—२ त. करितिल.—३ त. तें चि पावले० —४ पं. नवविधाचा.—५ पं. नाहीं त्या चांडाळा.—६ पं. फोडिया.—७ पं प्रसिद्ध बोली.—८ दे. त. प्रल्हादाचा.

जळतां बुडतां घातीं । राखे हातीं विषाचे ॥ ६ ॥
काय सांगों ऐशीं कीर्ती । तुका ह्मणे नामख्याती ।
नरकाप्रती जाती । निषेधिती तीं एकें ॥ ७ ॥

॥ १४४० ॥

किती या काळाचा सोसावा वेंळसा । लागला सरिसा पाठोवाठीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लक्ष चौऱ्याशीची करा सोडवण । रिघा या शरण पांडुरंगा ॥ ध्रु ॥
उपजल्या पिंडा मरण सांगातें । मरतें उपजतें सवें चि तें ॥ २ ॥
तुका ह्मणे माळ गुंतली राहाटीं । गाडग्याची सुटी फुटलिया ॥ ३ ॥

॥ १४४१ ॥

गासी तरि एक विठ्ठल चि गाई । नाहीं तरि ठायीं राहें उगा ॥ १ ॥
अद्वैतीं तों नाहीं बोलाचें कारण । जाणिवेचा श्रम करिसी वांयां ॥ २ ॥
तुका ह्मणे किती करावी फजिती । लाज नाहीं चित्तीं निलाजिरा ॥ ३ ॥

॥ १४४२ ॥

जयाचिये वाचे नये हा विठ्ठल । त्याचे मज बोल नावडती ॥ १ ॥
शत्रु तो म्यां केला न ह्मणें आपुला । जो विन्मुख विठ्ठला सर्वभावें ॥ २ ॥
जयासी नावडे विठोबाचें नाम । तो जाणा अधम तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ १४४३ ॥

आह्मांसी तों नाहीं आणीक प्रमाण । नामासी कारण विठोबाच्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घालूनियां कास करितों कैवाड । वागों नेदीं आड कळिकाळासी ॥ ध्रु ॥

---

१ त. कीर्ती.—२ पं. वोळसा.—३ पं. पीडा.—४ पं. सरे चि तो.—५ पं. सीण.—६ दे. त. नीति.

अबद्ध वांकडें जैशी[1]तैशा परी । वाचे हरि हरि उच्चारावें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां सांपडलें निज । सकळां[2] हें बीज पुराणांचें ॥ ३ ॥

॥ १४४४ ॥

जीव तो चि देव भोजन ते भक्ति । मरण[3] ते चि मुक्ति पाषांड्याची ॥ १ ॥ ध्रु. ॥ पिंडाच्या पोषकीं नागविलें जन । लटिकें पुराण केले वेद ॥ ध्रु॥
मना आला तैसा करिती विचार । ह्मणती संसार नाहीं पुन्हा ॥ २ ॥[4]
तुका ह्मणे पाठीं उडती यमदंड । पापपुण्य लंड न विचारिती[5] ॥ ३ ॥

॥ १४४५ ॥

भक्तांचा[6] महिमा भक्त चि जाणती । दुर्लभ या गति आणिकांसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाणोनि नेणते जाले तेणें सुखें । नें[7] बोलोनि मुखें बोलताती ॥ध्रु॥
अभेदूनि भेद राखियेला अंगीं । वाढावया जगीं प्रेमसुख ॥ २ ॥
टाळ घोष[8] कथा प्रेमाचा सुकाळ । मूढ लोकपाळ तरावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे हें तों आहे तयां ठावें । जिहीं एक्या भावें जाणीतलें ॥ ४ ॥

॥ १४४६ ॥

आशा तृष्णा माया अपमानाचें बीज । नासिलिया[9] पूज्य होइजेतें ॥ १ ॥
अधीरासी नाहीं चालों जातां मान । दुर्लभ दर्शन[10] धीर त्याचें ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं आणिकांसी बोल । वांयां जाय मोल बुद्धीपाशीं ॥ ३ ॥

॥ १४४७ ॥

चिंतनें[11] सरे तो धन्य[12] जाणा काळ । सकळ मंगळ मंगळांचें ॥ १ ॥

---

१ त. पं. जैसें तैशापरी.–२ पं. सकळ ही बीज०.–३ त. पं. मरण ते 'मुक्ति.–४ पं. आपुले मनींचें करूनि पाषांड । जनामध्यें भांड पोट भरी ॥ हें कडवें येथें जास्त आहे.–५ दे. विचारी.–६ पं. भक्तीचा.–७ दे. नो.–८ पं. त. घोळ.–९ पं नासील या.–१० दे. त. दरुषण.–११ पं. चिंतनें जो सरे तो चि धन्य काळ ।.–१२ दे. "धन्य जाणा काळ" याच्याबद्दल "धन्य काळ ।."

॥ ध्रु. ॥ संवसार[1]सिंधु नाहीं हरिदासां[2] । गर्भवास कैसा नेणती ते ॥ ध्रु ॥
जनवन ऐसें[3] कृपेच्या सागरें । दाटला आभारें[4] पांडुरंग ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा भक्तांचें बंधन । दाखविलें भिन्न परी एक ॥ ३ ॥

॥ १४४८ ॥

मोक्षाचें आह्मांसी नाहीं अवघड । तो असे उघंड[5] गांठोळीस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भक्तीचे सोहळे होतील जीवासी । नवल तेविशीं पुरवितां ॥ ध्रु ॥
ज्याचें त्यासी दणें कोंग[6] तें उचित । मानूनियां हित घेतां सुख ॥ २ ॥
तुका ह्मणे सुखें[7] देई[8] संवसार । आवडीसी थार करीं माझे ॥ ३ ॥

॥ १४४९ ॥ ॥ १२ ॥

चिंतनासी न लगे वेळ । सर्व काळ करावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सदा वाचे नारायण । तें वदन मंगळ ॥ ध्रु ॥
पढिये सर्वोत्तम[9] भाव । येथें[10] वाव[11] पसारा ॥ २ ॥
ऐसें उपदेशी तुका । अवघ्या लोकां सकळां ॥ ३ ॥

॥ १४५० ॥

अंतराय पडे गोविंदीं अंतर । जो जो घ्यावा भार तो चि बाधी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बैसलिये ठायीं आठवीन पाय । पाहीन तो ठायें तुझा देवा ॥ ध्रु ॥
अखंड तें खंडे संकल्पीं विकल्प । मनोजन्य पाप रज्जुसर्प ॥ २ ॥
तुका ह्मणे विश्वीं विश्वंभर वसे । राहों ऐसे दशे सुखरूप ॥ ३ ॥

---

१ दे. त. संसार.—२ पं. हरिच्या दासा.—३ पं. ऐसा.—४ पं. आभार.—५ दे. उघाड.—६ पं. कोणाचें उचित.—७ पं. सुखें.—८पे. घेई.—९ दे. सर्वोत्तमा.—१० पं. इतर.—११ पं. ठाव.

॥ १४५१ ॥

एकाचिया घांटया[1] टोके । एक फिके उपचार ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसी सवे गोवळिया । भाव तया पढियंता ॥ ध्रु ॥
एकोचें[2] तें उच्छिष्ट खाय । एका जाय ठेंकवूनि[3] ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु सोपें । बहु रूपें अनंत ॥ ३ ॥

॥ १४५२ ॥

कोठें नाहीं अधिकार । गेले नर वांयां ते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐका हें सोपें वर्म । न लगे श्रम चिंतना ॥ ध्रु ॥
मृत्याचिये अंगीं छाये । उपाये चि खुंटतां ॥ २ ॥
तुका ह्मणे अवघे जन । येथें मन असों द्या ॥ ३ ॥

॥ १४५३ ॥

ज्यानें[4] ज्यानें जैसें ध्यावें । तैसें व्हावें कृपाळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सगुणनिर्गुणांचा ठाव । विटे पाव धरियेले ॥ ध्रु ॥
अवघें साकरेचें अंग । नये व्यंग निवडितां ॥ २ ॥
तुका ह्मणे जें जें करी । तें तें हरी भोगिता ॥ ३ ॥

॥ १४५४ ॥

आचरती कर्में । तेथें काळें कर्मधर्में[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ खेळे गोवळियांसवें । करिती तें त्यांचें साहावें ॥ ध्रु ॥
यज्ञमुखें घांस । मंत्रपूजेसी उदास ॥ २ ॥
तुका ह्मणे चोरी । योगियां ही सर्वें करी ॥ ३ ॥

---

१ पं. घाटा टोके । एका फिके०.—२ दे. एकाचेंथें उच्छिष्ट०.—३ पं. ठकाउनी. दे. त. ठकोणि.—४ दे. त. ज्याणें ज्याणें.—५ पं. धर्माधर्में.

॥ १४५५ ॥

नामाचे पवाडे बोलती पुराणें । होऊनि कीर्तन तो चि ठेला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आदिनाथा कंठीं आगळा हा मंत्र । आवडीचें स्तोत्र सदा घोकी ॥ ध्रु ॥
आगळें हें सार उत्तमा उत्तम । ब्रह्मकर्मा नाम एक तुझें ॥ २ ॥
तिहीं त्रिभुवनीं गमन नारदा । हातीं विणा सदा नाम मुखीं ॥ ३ ॥
परिक्षिती मृत्यु सातां दिवसांचा । मुक्त जाला वाचा उच्चारितां ॥ ४ ॥
कोळियाची कीर्ति वाढली गहन । केलें रामायण रामा आधीं ॥ ५ ॥
सगुण निर्गुण तुज ह्मणे वेद । तुका ह्मणे भेद नाहीं नांवां ॥ ६ ॥

॥ १४५६ ॥

भूतदयापरत्वें जया तया परी । संत नमस्कारीं सर्वभावें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ शिकल्या बोलाचा वरीसील ताठा । तरी जासी वाटा यमपंथें ॥ ध्रु ॥
हिरा परिस मोहरा आणीक पाषाण । नव्हे परी जन संतां तैसी ॥ २ ॥
सरितां वाहाळां गंगे सागरा समान । लेखी तयाहून अधम नाहीं ॥ ३ ॥
आणीक अमुप होती तारांगणें । रविशशिमानें लेखूं नये ॥ ४ ॥
तुका ह्मणे नाहीं नरमता अंगीं । नव्हे तें फिरंगी कठिण लोह ॥ ५ ॥

॥ १४५७ ॥

आणीक कांहीं मज नावडे मात । ऐका पंढरिनाथावांचूनियां ॥ १ ॥
त्याची च कथा आवडे कीर्तन । तें मज श्रवण गोड लागे ॥ २ ॥

---

१ पं. कीर्तनें तूं चि ठेलें.—२ पं. जाला.—३ पं. नामीं.—४ पं. धरितील.—५ पं. जाती—६ पं. वोहळ. त. वाहळ.—७ पं. मोजूं०.—८ पं. नम्रता—९ पं. "मज" हा शब्द नाहीं.—१० दे. त. एक पंढरिनाथ वांचुनिया—११ दे. श्रवणें.

तुका ह्मणे संत ह्मणोत भलतें । विठ्ठलापरतें न मनी कांहीं ॥ ३ ॥

॥ १४५८ ॥

ठेवा जाणवि गुंडून । येथें भाव चि प्रमाण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एका अनुसरल्या काज । अवघें जाणे पंढरिराज ॥ ध्रु ॥
तर्कवितर्कासी । वाव न लगे सायासीं ॥ २ ॥
तुका ह्मणे भावेंविण । अवघा बोलती तो सीण ॥ ३ ॥

॥ १४५९ ॥

येथें दुसरी न सरे आटी । देवा भेटी जावया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तो चि ध्यावा ऐका[1] चित्तें । करूनि रितें कळिवर ॥ ध्रु ॥
षडउर्मी ह्रदयांत । यांचा अंत पुरवूनि ॥ २ ॥
तुका ह्मणे खुंटे आस । तेथें वास करी तो ॥ ३ ॥

॥ १४६० ॥

मुक्त तो आशंका नाहीं जया अंगीं । बद्ध मोहोसंगीं लज्जा चिंता[2]॥१॥
सुख पावे शांति धरूनि एकांत । दुःखी तो लोकांत दंभ करी ॥ २ ॥
तुका ह्मणे लागे थोडा च विचार । परी हे प्रकार नागविती ॥ ३ ॥

॥ १४६१ ॥

कानीं धरी बोल बहुतांचीं मतें । चाट त्यापरतें आणीक नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ पावेल गौरव वोढाळाचे परी । दंड पाठीवरी यमदूतां ॥ ध्रु ॥
शब्दज्ञानी एक आपुलाल्या मतें । सांगती वेदांत भिन्नभावें ॥ २ ॥
तुका ह्मणे एक भाव न धरिती । पडिली हे माती त्यांचे तोंडीं ॥ ३ ॥

---

१ पं. एक चित्तें.—२ पं. चित्ता.

॥ १४६२ ॥

देवा ऐकें हे विनंती । मज नको रे हे मुक्ति ।
तया इच्छा गति । हें चि सुख आगळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ या वैष्णवांचे घरीं । प्रेमसुख इच्छा करी ।
रिद्धिसिद्धी द्वारीं । कर जोडूनि उभ्या[1] ॥ ध्रु ॥
नको वैकुंठींचा वास । असे तया सुखा नास ।
अद्भुत हा रस । कथाकाळीं नामाचा ॥ २ ॥
ह्या नामाचा महिमा । तुज न कळे रे मेघ[2]श्यामा ।
तुका ह्मणे आह्मां । जन्म गोड यासाटीं ॥ ३ ॥

॥ १४६३ ॥

न पूजीं आणिकां देवां न करीं त्यांची सेवा । न मनीं या केशवाविण दुजें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय उणें जालें मज तयाशायीं । तें मी मागों काई कवणा[3]सी ॥ध्रु॥
आणिकाची कीर्ती नाइकें न[4] बोलें । चाड या विठ्ठलेंविण नाहीं ॥ २ ॥
न पाहें लोचनीं श्रीमुखावांचूनि । पंढरी सांडूनि न वजें कोठें ॥ ३ ॥
न करीं कांहीं आस मुक्तीचे सायास । न भें[5] संसारास येतां जातां ॥ ४ ॥
तुका ह्मणे कांहीं व्हावें ऐसें जीवा । नाहीं या केशवाविण दुजें ॥ ५ ॥

॥ १४६४ ॥

नव्हे खळवादी मतां[6] च पुरता । सत्याची हे सत्ता उपदेश ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ साक्षत्वेंसी मना आणावीं उत्तरें । परिपाकीं खरें खोटें कळे ॥ध्रु॥

१प. उभया.–२ दे. त. मेघशामा–३ पं. कवणापें.–त. आणिकांसी.–४ पं. "न बोलें" याबद्दल "नाबोल."–५ पं. भीये.–६ त. मताचा पुरता. पं. मताचि.

नव्हे एकदेशी शब्द हा उखता । ब्रह्मांडापुरता घेईल त्यासी ॥ २ ॥
तुका विनवणी करी जाणतियां । बहुमतें वांयां श्रमों नये ॥ ३ ॥

॥ १४६५ ॥

या चि नांवें दोष । राहे अंतरीं किल्मिष ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मना अंगीं पुण्य पाप । शुभ उत्तम संकल्प ॥ ध्रु ॥
बिजाऐसीं फळें । उत्तम कां अमंगळें ॥ २ ॥
तुका ह्मणे चित्त । शुद्ध करावें हे नित ॥ ३ ॥

॥ १४६६ ॥

कुशळ वक्ता नव्हे जाणिव श्रोता । राहे भाव चित्ता धरूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन्य तो जगीं धन्य तो जगीं । ब्रह्म तया अंगीं वसतसे ॥ ध्रु ॥
न धोवी तोंड न करी अंघोळी । जपे सदाकाळीं रामराम ॥ २ ॥
जप तप ध्यान नेणे योग युक्ती । कृपाळु जो भूतीं दयावंत ॥ ३ ॥
तुका ह्मणे होय जाणोनि नेणता । आवडे अनंता जीवाहूनि ॥ ४ ॥

॥ १४६७ ॥

काळाचिया सत्ता ते नाहीं घटिका । पंढरीनायका आठवितां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सदाकाळ गणना करी आयुष्याची । कथेचे वेळेची आज्ञा नाहीं ॥ ध्रु ॥
याकारणें माझ्या विठोबाची कीर्ति । आहे हे त्रिजगतीं थोर वाट ॥ २ ॥
तुका ह्मणे जन्मा आलियाचें फळ । स्मरावा गोपाळ तें चि खरें ॥ ३

१ पं. अशुभ.—२ पं. हित.—३ पं. जाणीव तो श्रोता.—४ पं. रामनाम.—५ दे. याग.—
६ पं. काळाची ते सत्ता.—७ पं. वाटे.

॥ १४६८ ॥

घरोघरीं बहु जाले कवि । नेणे प्रसादाची चवी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ लंडा भूषणांची चाड । पुढें न विचारी नाड ॥ ध्रु ॥
काढावें आइतें । तें चि जोडावें स्वहितें ॥ २ ॥
तुका ह्मणे कळे । परि होताती अंधळे ॥ ३ ॥

॥ १४६९ ॥

नये पाहों मुख मात्रागमन्याचें । तैसें अभक्ताचें गुरुपुत्रा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि बरें धरितां एकांत । तेणें नव्हे घात भजनासी ॥ ध्रु ॥
नये होऊं कदा निंदकाची भेटी । जया द्वैत पोटीं चांडाळाच्या ॥ २ ॥
तुका ह्मणे नका बोलों त्यासी गोष्टी । जयाचिये दृष्टी पाप वाढे ॥ ३ ॥

॥ १४७० ॥

कथा करोनियां द्रव्य घेती देती । तयां अधोगति नरकवास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रवरव कुंभपाक भोगिती यातना । नये नारायणा करुणा त्यांची ॥ ध्रु ॥
असिखड्गधारा छेदिती सर्वांग । तप्तभूमी अंग लोळविती ॥ २ ॥
तुका ह्मणे तया नरक न चुकती । सांपडले हातीं यमाचिया ॥ ३ ॥

॥ १४७१ ॥

नाइकावे कानीं तयाचे ते बोल । भक्तीविण फोल ज्ञान सांगे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वाखाणी अद्वैत भक्तिभावेंविण । दुःख पावे सीण श्रोता वक्ता ॥ ध्रु ॥

---

१ पं. "बहु" शब्द नाहीं.–२ पै. आहाच ज्ञानाकेतील डोळे ।.–३ पं. करिती.

अहं ब्रह्म ह्मणोनि पोळीतसे[1] पिंडा । नो[2] बोलावें भांडा तया सवें ॥ २ ॥
वेदबाह्य लंड बोले जो[3] पाषांड । त्याचें काळें तोंड संतांमध्यें ॥ ३ ॥
तुका ह्मणे खंडी देवभक्तपण । वरिष्ठ[4] त्याहूनि श्वपच तो ॥ ४ ॥

॥ १४७२ ॥

वेदविहित तुह्मी आइका हो कर्में । बोलतां[5] तीं वर्में संतांपुढें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चारी वर्ण जाले एकाचिये अंगीं । पापपुण्य भोगीं[6] विभागिलें ॥ ध्रु. ॥
प्रथम पाउलीं पावविला पंथ । आदि मध्य अंत भेद नाहीं ॥ २ ॥
आंबे बोरी वड[7] बाभुळा चंदन । गुणांगुणें[8] भिन्न अग्नि एक ॥ ३ ॥
तुका ह्मणे मन उन्मन जों होय । नोवरि हे सोय विधि पाळीं ॥ ४ ॥

॥ १४७३ ॥

तीर्थांचें[9] जें मूळ व्रतांचें जें फळ । ब्रह्म तें केवळ पंढरिये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तें आह्मीं देखिलें आपुल्या नयनीं । फिटलीं पारणीं डोळियांचीं ॥ ध्रु. ॥
जीवांचें जीवन सुखाचें सेजार । उभें कटीं कर ठेवूनियां ॥ २ ॥
जनांचा[10] जनिता कृपेचा सागर । दीनां लोभापर दुष्टां[11] काळ ॥ ३ ॥
सुरवरां चिंतनीं मुनिवरां ध्यानीं । आकार निर्गुणीं तें[12] चि असे ॥ ४ ॥
तुका ह्मणे नाहीं श्रुती आतुडलें । आह्मां सांपडलें गीतीं गातां ॥ ५ ॥

॥ १४७४ ॥

माझे मनोरथ पावविले[13] सिद्धी । तईं पायीं बुद्धि स्थिरावली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ समाधान जीव राहिला निश्चळ । गेली हळहळ स्मरणें[14] हे ॥ ध्रु. ॥

---

१ दे. त. पाळित.–२ पं. बोलों नये भांडा०.–३ पं. तो.– त. वरिष्ठ तो जाण श्वपचाहूनि ।.–५ पं. बालतो तें वर्म.–६ पं. जगीं.–७ पं. वन.–८ पं. गुणागुण. त. गुणागुणीं–९ दे. तीर्थांचे मूळ व्रतांचें फळ. त. तीर्थांचें तें मूळ व्रतांचें तें फळ–१० पं जगाचा–११ दे. त पं. दृष्टां.–१२ पं. तो.–१३ दे. पावले.–१४ दे. स्मरण हें.

त्रिविध तापाचें जालेंसे दहन । सुखावलें मन प्रेमसुखें ॥ २ ॥
महालाभ वाचे वसे पांडुरंग । अंगोअंगीं[1] संग अखंडित ॥ ३ ॥
जीवनाचा जाला ओलावा अंतरीं । विश्व विश्वंभरीं सामावलें[2] ॥ ४ ॥
तुका ह्मणे माप भरी आलें सिंगे[3] । धारबोळ गंगे पूर वाहे ॥ ५ ॥

॥ १४७५ ॥

कृपेचें[4] उत्तर देवाचा प्रसाद । आनंदीं आनंद वाढवावा ॥ १ ॥
॥ ध्रु ॥ बहुतांच्या भाग्यें लागलें जाहाज । येथें आतां काज लवलाहें[5] ॥ ध्रु ॥
अलभ्य तें आलें दारावरी फुका । येथें[6] आतां चुका न पाहिजे ॥ २ ॥
तुका ह्मणे जिव्हाश्रवणाच्या द्वारें । माप भरा बरें सिगेवरि ॥ ३ ॥

॥ १४७६ ॥

पापपुण्यसुखदुःखाचीं मंडळें । एक एकांबळें[7] वाव घेती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कवतुक डोळां पाहिलें सकळ । नाचवितो काळ जीवांसी[8] तो[9] ॥ ध्रु ॥
स्वर्गाचिया भोगें सरतां नरक । मागें पुढें एक एक दोन्ही ॥ २
तुका ह्मणे भय उपजलें मना । घेई नारायणा कडिये मज ॥ ३ ॥

॥ १४७७ ॥

वचना फिरती अधम जन । नारायण तो नव्हे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ केला आतां अंगीकार । न मनी भार समर्थ ॥ ध्रु ॥
संसाराचा नाहीं पांग । देवें[10] सांग सकळ ॥ २ ॥
तुका ह्मणे [11]कीर्त वाणूं । मध्यें नाणूं संकल्प ॥ ३ ॥

---

१ पं. अंगोअंगीं.—२ पं. मावळलें.—३ पं. सीग.—४ पं. कृपेची.—५ पं. लवलाहो.—६ पं. आतां येथें चुका०.—७ पं. एका वेळे डाव घेती ।.—८ त. भूतांसी.—९ पं. हा.—१० पं. देवें.—११ पं. कीर्ती.

॥ १४७८ ॥

कथा करोनियां मोल ज्यापें घेती । ते ही दोघे जाती नरकामध्यें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ब्रह्म पूर्ण करा ब्रह्म पूर्ण करा । [१]अखंड स्मरा रामराम ॥ ध्रु ॥
[२]मधुरवाणीच्या नका पडों भरी । जाल यमपुरी भोगावया ॥ २ ॥
तुका ह्मणे करीं ब्रह्मांड [३]ठेंगणें । हात पसरी जिणें धिग त्याचें ॥ ३ ॥

॥ १४७९ ॥

गोड नांवें क्षीर । [४]परी साकरेचा धीर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें जाणा ब्रह्मज्ञान । बापुडें तें भक्तीविण ॥ ध्रु ॥
रुची नेदी अन्न । ज्यांत नसतां लवण ॥ २ ॥
अंधळ्याचे श्रम । शिकविल्याचें चि [५]नाम ॥ ३ ॥
तुका ह्मणे तारा । [६]नांवें तंबुऱ्याच्या सारा ॥ ४ ॥

॥ १४८० ॥

नम्र जाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हें चि शूरत्वाचें अंग । हरी आणिला श्रीरंग ॥ ध्रु ॥
अवघा जाला पण । लवण सकळां कारण ॥ २ ॥
तुका ह्मणे पाणी । [७]पाताळ तें परी खणी ॥ ३ ॥

॥ १४८१ ॥

आपुल्या महिमानें । धातु [८]परिसें केलें सोनें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसे न मनीं माझे आतां । गुणदोष पंढरिनाथा ॥ ध्रु ॥
[९]गांवाखालील वाहाळ । गंगा न मनी अमंगळ ॥ २ ॥

---

१ पं. अखंडित स्मरा रामनाम ।—२ पं मधुरा वाणीच्या.—३ पं. कळिकाळ.—४ त. परि त्या साकरेचा०.—५ पं. काम.—६ दे पं. नाव.—७ पं. पातळपणें तळा आणि ।—८ पं. पारिस.—९ पं. गांवा मागील वोहळ.

तुका ह्मणे माती । केली कस्तुरीनें सरती ॥ ३ ॥

॥ १४८२ ॥

आशाबद्ध वक्ता । भय श्रोति[1]याच्या चित्ता ॥ १ ॥

॥ ध्रु. गातो तें चि[2] नाहीं ठावें । तोंड वासी कां[3]हीं द्यावें ॥ ध्रु ॥

जालें लोभाचें मांजर । भीक मागे दारोदार ॥ २ ॥[4]

माप आणि गोणी । तुका[5] ह्मणे रितीं दोन्ही ॥ ३ ॥

॥ १४८३ ॥

तक्र शिष्या मान । दुग्धा ह्मणे नारायण ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐशीं ज्ञानाचीं डोबडें । आशाविटंबिलीं मूढें ॥ ध्रु ॥

उपदेश तो जगा । आपण सोंवळा इतका मांगा ॥ २ ॥

रसनाशिश्नाचे अंकित । तुका ह्मणे वरदळ स्फीर्ति[6] ॥ ३ ॥

॥ १४८४ ॥

ब्रह्मचारि धर्म घोकावें[7] अक्षर । आश्रमीं विचार षट्कर्में[8] ॥ १ ॥

॥ध्रु.॥ वानप्रस्थ तरी संयोगीं वियोग । संन्यास तो त्याग संकल्पाचा ॥ध्रु॥

परमहंस तरी जाणे सहज वर्म । तेथें याती धर्म कुळ नाहीं ॥ २ ॥

बोले वर्म जो चाले याविरहित । तो जाणा पतित श्रुति बोले ॥ ३ ॥

तुका ह्मणे कांहीं नाहीं नेमाविण । मोकळा तो सीण दुःख पावे ॥ ४ ॥

॥ १४८५ ॥

आह्मी क्षेत्रींचे संन्यासी । देहभारित ऱ्हषीकेशी ।

नाहीं केली ऐशी । आशाकामबोहरी ॥ १ ॥

---

१ दे. त. श्रोतयाच्या.–२ पं. हीं.–३ पं काय.–४ पं. "उभयतां लोभी मन । वांयां गेलें तें भजन ॥ बहिर्मुख एके ठायीं । तैसें जालें तयां दोहीं ॥" हीं दोन कडवीं जास्त आहेत.–५ दे. त. तुका ह्मणे गोणी । माप आणि रितीं दोन्ही.–६ दे. स्पित. त. स्थित.–७ पं. घोकावीं अक्षरें.–८ त. पं. षट्कर्म.

॥ ध्रु. ॥ आलें अयाचित अंगा । सहज तें आह्मां भागा ।
दाता पांडुरंगा । ऐसा करितां निश्चिती ॥ ध्रु. ॥
दंड धरिला दंडायमान । मुळीं मुंडिलें मुंडण ।
बंदीं[1] बंद कौपीन । बहिरवास औठडें ॥ २ ॥
काळें साधियेला काळ । मन करूनि निश्चळ ।
लौकिकीं विटाळ । धरूनि असों ऐकांत[2] ॥ ३ ॥
कार्यकारणाची चाली । वाँचावाचत्वें[3] नेमिली ।
एका नेमें चाली । स्वरूपीं च राहाणें ॥ ४ ॥
नव्हे वेषधारी । तुका आहाच वरवरी ।
आहे तैसीं बरीं । खंडें निर्वाडितों[4] वेदांची ॥ ५ ॥

॥ १४८६ ॥

निर्वाहापुरतें अन्न आच्छादन । आश्रमासी स्थान कोंपी गुहा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोठें ही चित्तासी नसावें बंधन । हृदयीं नारायण सांटवावा[5] ॥ ध्रु. ॥
नये बोलों फार बैसों जनामधीं । सावधान बुद्धी इंद्रियें[6] दमी ॥ २ ॥
तुका ह्मणे घडी घडीनें साधावी । त्रिगुणांची गोवी उगवूनि ॥ ३ ॥

॥ १४८७ ॥

जैसीं तैसीं तरी । शरणागतें[7] तुझीं हरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां न पाहिजे केलें । ब्रीद लटिकें आपुलें ॥ ध्रु. ॥
शुद्ध नाहीं चित्त । परी ह्मणवितों भक्त ॥ २ ॥

---

१ पं. बंद्द बंदाचा कोपीन ।.—२ पं. एकांता.—३ "वाच्यावाच्यत्वें" असावें.—४ पं. "निवडितों" याबद्दल "निवडी."—५ पं. सर्वकाळ.—६ पं. इंद्रिय.—७ पं. तुझीं शरणांगतें हरी.

मज कोण पुसे रंका । नाम सांगे तुझें तुका ॥ ३ ॥

॥ १४८८ ॥

नाशवंत देह नासेल हा जाणा । कां रे उच्चाराना वाचे नाम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नामें चि तारिले कोट्यान हे कोटी । नामें हे[1] वैकुंठीं बैसविले ॥ ध्रु ॥
नामापरतें सार नाहीं त्रिभुवनीं । तें कां तुह्मी मनीं आठवाना ॥ २ ॥
तुका ह्मणे नाम वेदांसी आगळें । तें दिलें गोपाळें फुकासाटीं ॥ ३ ॥

॥ १४८९ ॥

ओंळवितां[2] बाळें । मातेतें सुख आगळें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ द्यावें आवडी भातुकें । पाहे निवे कवतुकें ॥ ध्रु ॥
लेवूनि[3] अळंकार । दृष्टी करावी सादर ॥ २ ॥
आपुलिये पदीं । बैसवूनि कोडें वंदी ॥ ३ ॥
नेदी लागों दिठी । उचलोनि लावी कंठीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे लाभा । वारि घ्यौं[4] वो पद्मनाभा ॥ ५ ॥

॥ १४९० ॥

तप तीर्थ दान व्रत आचरण । गातां हरिगुण वारूं नये ॥ १ ॥
॥ ध्र. ॥ कोटि कुळें[5] त्याचीं वाटुली पाहाती । त्या तया घडती ब्रह्महत्या ॥ ध्रु ॥
आपुलिया पापें न सुटे सायासें । कोणा काळें ऐसें निस्तरेल ॥ २ ॥
व्हावें साह्य तया न घलावें भय । फुकासाटीं पाहे लाभ घात ॥ ३ ॥

१ पं. ची.–२ पं. आळविती.–३ पं लेउनि.–४ पं. घ्यावें.–५ पं. कुळी.

तुका ह्मणे हित माना या वचना । सुख दुःख जाणा साचे फुका ॥ ४ ॥

॥ १४९१ ॥

देवासाटीं जाणा तयासी च आटी । असेल ज्या गांठीं पुण्यराशी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निबळा पाठवी बळें वाराणसी । गेला[1] आला त्यासी अर्ध पुण्य ॥ ध्रु ॥
कथे निद्राभंग करावा भोजनीं । तया सुखा धणी पार नाहीं ॥ २ ॥
यागीं ऋणें[2] घ्यावें द्यावें सुख लाहीं । बुडतां चिंता नाहीं उभयतां ॥ ३ ॥
तुका ह्मणे वर्म जाणोनि करावें । एक न घलावें[3] एकावरी ॥ ४ ॥

॥ १४९२ ॥

अग्नीमाजी पडे धातु । लीन होउनि राहे आंतु[4] ॥
होय शुद्ध न पवे घातु । पटतंतुप्रमाणें[5] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बाह्यरंगाचें कारण । मिथ्या अवघें चि भाषण[6] ।
गर्व ताठा हें अज्ञान । मरण[7] सर्व वाहातसे ॥ ध्रु ॥
पुरें मातलिया नदी । लव्हा नांदे जीवनसंधी ।
वृक्ष उन्मळोनि भेदी । परि तो कधीं भंगेना ॥ २ ॥
हस्ती परदळा[8] जो भंगी । तया पायीं न मरे मुंगी ।
कोण जाय संगी । पाणीवाणी तयेच्या[9] ॥ ३ ॥
पिटितां घणें वरि सैरा । तया पोटीं राहे हिरा ।
तैशा काय तगती गारा । तया थोरा होऊनि ॥ ४ ॥
लीन दीन हें चि सार । भव उतरावया पार ।

१ दे. त. मेला.—२ दे. त. रीण. पं. रुण.—३ पं. घालावें.—४ दे. अतु. त. अतुं. पं. आतु.—५ दे. पं. पटतंतुप्रमाण.—६ दे. भषण. पं. भूषण.—७ पं. मरणा.—८ त. परदळा तें भंगी. दे. परदळ तें भंगी.—९ पं. तयाच्या.

बुडे माथां भार । तुका ह्मणे वोहोनि[1] ॥ ५ ॥

॥ १४९३ ॥

आह्मी वीर जुंझार । करूं नमदाढे मार ।
तोपटिले[2] भार । मोड जाला दोषांचा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जाला हाहाकार[3] । आले हांकीत जुंझार ।
शंखचक्रांचे शृंगार । कंठीं हार तुळसीचे ॥ ध्रु. ॥
रामनामांकित बाण । गोपी लाविला चंदन ।
झळकती निशाणें[4] । गरुडटके पताका ॥ २ ॥
तुका ह्मणे काळ । जालों जिंकोनि निश्चळ ।
पावला सकळ । भोग आह्मां आमचा ॥ ३ ॥

॥ १४९४ ॥

आशाबद्ध तो जगाचा दास । पूज्य तो उदास सर्वजना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आहे तें अधीन आपुले हातीं । आणिकां ठेविती काय बोल ॥ध्रु.॥
जाणतिया पाठीं लागला उपाध । नेणता[5] तो सिद्ध भोजनासी ॥ २ ॥
तुका ह्मणे भय बांधलेंसे[6] गांठी । चोर लागे पाठी दुम तया ॥ ३ ॥

॥ १४९५ ॥

आणिकांसी तारी ऐसा नाहीं कोणी । धड तें नासोनि मळता टाकी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सोनें शुद्ध होतें अविट तें घरीं । नासिलें सोनारीं अळंकारीं[7] ॥ध्रु.॥
ओल शुद्ध काळीं[8] काळें जिरें बीज । कैंचें लागे निज हाता[9] तेथें ॥ २ ॥
एकें[10] गहू करिती अनेक प्रकार । सांजा दिवसीं क्षीर घुगरिया ॥ ३ ॥

---

१ पं. राहोनि.—२ पं. थापटिले भार । मोड जाला महा दोषां ।.—३ पं. हाहःकार.—४ पं. निशाण.—५ पं. नेणता तो सावध भजनासी ।.—६ दे. बांधलें गांठीं त. बांधियेलें.—७ त. अळंकारें.—८ पं. काळी.—९ पं. हातीं.—१० पं. एका गहु करी.

तुका ह्मणे विषा रुचि एका हातीं । पाधानी नासिती नवनीत ॥ ४ ॥

॥ १४९६ ॥

वाटे या जनाचें थोर बा आश्चर्य । न करिती विचार कां हिताचा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कोण दम ऐसा आहे यांचे पोटीं । येईल शेवटीं कोण कामा ॥ ध्रु ॥

काय मानुनियां राहिले निश्चिती । काय जाब देती यमदूतां ॥ २ ॥

कां हीं विसरलीं मरण बापुडीं । काय यांसी गोडी लागलीसे ॥ ३ ॥

काय हातीं नाहीं करील तयासी । काय जालें यांसी काय जाणों ॥४॥

कों हीं नाठविती देवकीनंदना । सुटाया बंधनापासूनियां ॥ ५ ॥

काय मोल यासी लागे धन वित्त । कां हें यांचें चित्त घेत नाहीं ॥ ६ ॥

तुका ह्मणे कों हीं भोगितील खाणी । कां त्या चक्रपाणी विसरलीं ॥ ७ ॥

॥ १४९७ ॥

काय एकां जालें तें कां नाहीं ठावें । काय हें सांगावें काय म्हूण ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ देखतील डोळां ऐकतील कानीं । बोलिलें पुराणीं तें ही ठावें ॥ ध्रु ॥

काय हें शरीर साच कीं जाणार । सकळ विचार जाणती हा ॥ २ ॥

कां हें कळों नये आपुलें आपणा । बाळत्व तारुण्य वृद्धदशा ॥ ३ ॥

कां हें आवडलें प्रियापुत्रधन । काय कामा कोण कोणा आलें ॥ ४ ॥

कां हें जन्म वांयां घातलें उत्तम । कां हे रामराम न ह्मणती ॥ ५ ॥

काय भुली यांसी पडली जाणतां । देखती मरतां आणिकांसी ॥ ६ ॥

काय करिती हे बांधलिया काळें । तुका ह्मणे बळें वज्रपाशीं ॥ ७ ॥

---

१ पं. एक.—२ पं. "का हीं" याच्याबद्दल "का हे."—३ पं. ह्मणे.—४ दे. पं. ऐकवी.—५ पं. आपण.—६ पं. कामा (ह्मणजे "कामा" असें दोन वेळ आहे).—७ पं. बांधियेले.

॥ १४९८ ॥

जुंझार ते एक विष्णुदास जगीं । पापपुण्य अंगीं नातळे त्यां ॥ १ ॥
॥ धृ. ॥ गोविंद आसनीं गोविंद शयनीं । गोविंद त्यां मनीं बैसलासे ॥ ध्रु ॥
ऊर्ध्व[1] पुंड्र भाळीं कंठीं[2] शोभे माळ । कांपिजे कळिकाळ[3] तया भेणें ॥ २ ॥
तुका ह्मणे शंखचक्रांचे शृंगार । नामामृतसार मुखामाजी ॥ ३ ॥

॥ १४९९ ॥

जेणें नाहीं केलें आपुलें स्वहित । पुढिलांचा घात इच्छीतसे ॥ १ ॥
॥ धृ. ॥ संचितासी जाय मिळोनियां खोडी । पतनाचे ओढीवरी[4] हांव ॥ ध्रु ॥
बांधलें गांठी तें लागलें भोगावें । ऐसियासी देवें काय कीजे ॥ २ ॥
तुका ह्मणे जया गांवां जाणे जया । पुसोनियां तथा वाट चाले ॥ ३ ॥

॥ १५०० ॥

मानी भक्तांचे उपकार । ऋणीया ह्मणवी निरंतर ।
केला निर्गुणीं आकार । कीर्ति मुखें वर्णितां ॥ १ ॥
॥ धृ. ॥ ह्मणोनि जया जे वासना । ते पुरवितो पंढरिराणा ।
जाला भक्तांचा आंदणा । ते उपकार फेडावया ॥ ध्रु ॥
अंबऋषीकारणें । जन्म घेतले नारायणें ।
एवढें भक्तीचें लेंहणें । दास्य करी हां दासाचें ॥ २ ॥
ह्मणियें[11] करितां शंका न धरी । रक्षपाळ बळिच्या द्वारीं ।
भक्तीचा आभारी । रीग न पुरे जावया ॥ ३ ॥
अर्जुनाचे रथवारु । ते वागवी सर्वेश्वरु ।

---

१ दे. ऊर्ध पुंड भाळीं. त. उर्ध्व पुंड भाळीं. पं. ऊर्ध्व पुंड भाळ.—२ दे. कंठीं शोभे माळीं. त कंठीं शोभे माळ.—३ त. काळि काळें.—४ पं. जोडीवरि.—५ पं. लागतें.—६ पं. "तया" हा शब्द नाहीं.—७ दे. त. रुणीया.—८ पं. कीर्ति मुखें गर्जतां.—९ पं. ल्हाहणें.—१० त. पं. "हा" शब्द नाहीं.—११ पं. मळीयें.

एवढे भक्तीचे उपकारु । मागें मागें हिंडतसे ॥ ४ ॥
पुंडलिकाचे द्वारीं । सम पाउलीं[1] विटेवरी ।
न वजे कट करीं । धरूनि तेथें राहिला ॥ ५ ॥
भावभक्तीचा अंकित । नाम साजे दिनानाथ ।
ह्मणोनि राहिला निवांत । तुका चरण धरोनि ॥ ६ ॥

॥ १५०१ ॥

सांगों जाणती शकुन । भूत भविष्य वर्तमान ॥ १ ॥
॥ धु. ॥ त्यांचा आह्मांसी कंटाळा । पाहों नावडती डोळां ॥ ध्रु ॥
रिद्धिसिद्धींचे साधक । वाचासिद्ध होती एक ॥ २ ॥
तुका ह्मणे जाती । पुण्यक्षयें अधोगती ॥ ३ ॥

॥ १५०२ ॥

ठाकलोंसें द्वारीं । उभें याचक भीकारी ॥ १ ॥
॥ धु. ॥ मज भीक कांहीं देवा । प्रेमभातुकें[2] पाठवा ॥ ध्रु ॥
याचकाचा भार । नये घेऊं येरझार ॥ २ ॥
तुका ह्मणे दान । सेवा घेतल्यावांचून ॥ ३ ॥

सदाशिवावर अभंग ॥ २ ॥

॥ १५०३ ॥

काय धर्म नीत । तुह्मां[3] शिकवावें हित ॥ १ ॥
॥ धु. ॥ अवघें रचियेलें हेळा । लीळा ब्रह्मांड सकळा ॥ ध्रु ॥
नाम महादेव । येथें निवडला भाव ॥ २ ॥

---

१ पं. पाउलें.–२ पं. प्रेम बाहेरी पाठवा.–३ पं. तुज.

तुका ह्मणे वेळे । माझें तुह्मां कां न कळे ॥ ३ ॥

॥ १५०४ ॥

भांडावें तें[1] गोड । पुरे सकळ ही कोड ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसा घरींचा या मोळा । ठावा निकटां जवळां ॥ ध्रु ॥

हाक देतां दारीं । येती जवळी सामोरीं ॥ २ ॥

तुका ह्मणे शिवें । मागितलें हातीं द्यावें ॥ ३ ॥ ॥ २ ॥

॥ १५०५ ॥

ऐसें[2] कां जालें तें मज ही न कळे । कीर्तनाचे रळेपळे जगीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कैसें तुह्मां देवा वाटतसे बरें । संतांचीं उत्तरें लाजविलीं ॥ ध्रु॥

भाविकां कंटक करिताती पीडा । हा तंव रोकडा अनुभव ॥ २ ॥

तुका ह्मणे नाम निर्वाणीचा बाण । याचा अभिमान नाहीं तुह्मां ॥ ३ ॥

॥१५०६ ॥

तुह्मी बैसलेती निर्गुणाचे खोळे । आह्मां कां हे डोळे कान दिले ॥१॥

॥ ध्रु. ॥ नाइकवे तुझी अपकीर्त्ति देवा । अव्हेरली[3] सेवा न देखवे ॥ ध्रु ॥

आपुले पोटीं तों राखियेला वाव । आह्मांसी कां भाव अल्प दिला ॥ २॥

तुका ह्मणे दुःखी असें[4] हें कळों द्या । पुढिलिया धंद्या मन नेघे[5] ॥ ३ ॥

॥ १५०७ ॥

सोंगें छंदें कांहीं । देव जोडे ऐसें नाहीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सारा अवघें गाबाळ । डोळ्या आडील पडळ ॥ ध्रु ॥

शुद्ध भावाविण । जो जो केला तो तो सीण ॥ २ ॥

---

१ त. तों.–२ पं. ऐसें कां जालें मज तें ही न कळे.–३ पं. अव्हेरिले.–४ पं. ऐसें. त. आंह.–

तुका ह्मणे कळे । परि होताती अंधळे ॥ ३ ॥

॥ १५०८ ॥

अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ विश्वास तो खरा मग । पांडुरंगकृपेचा ॥ ध्रु ॥

माझी कोणी न धरो शंका । हो[1] कां लोकां निर्द्वंद्व[2] ॥ २ ॥

तुका ह्मणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें[3] ॥ ३ ॥

॥ १५०९ ॥

सत्यसंकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ येथें अळंकार शोभती सकळ । भावबळें फळ इच्छेचें तें ॥ ध्रु ॥

अंतरींचें बीज जाणे कळवळा । व्यापक सकळां ब्रह्मांडाचा ॥ २ ॥

तुका ह्मणे नाहीं चालत तांतडी । प्राप्तकाळघडी आल्याविण ॥ ३ ॥

॥ १५१० ॥

काय वाणूं आतां न पुरे हे वाणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ थोरींव सांडिली आपुली परिसें। [4]नेणे सिवों कैसें लोखंडासी॥ध्रु॥

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें[5] ॥ २ ॥

भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ॥ ३ ॥

तुका ह्मणे सुख पराविया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ॥ ४ ॥

॥ १५११ ॥

जन्मा आलों त्याचें । आजि फळ जालें साचें ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तुह्मी सांभाळिलों[6] संतीं । भय निवारलीं[7] खंती ॥ ध्रु ॥

कृतकृत्य[8] जालों । इच्छा केली ते पावलों ॥ २ ॥

---

१ पं.ऐसें हो कां निर्द्वंद.–२ दे. निद्वंद. त. निर्द्वंद.–३ पं. ऐसा.–४ दे. नेणसि वो. पं. नेणो सिवो.–५ पं. पर उपकारें.–६ पं. सांभाळिलें.–७ पं. निरसली.–८ दे. त. कृत्याकृत्य. पं. कृत्यकृत्य.

तुका ह्मणे काळ । आतां करूं न शके बळ ॥ ३ ॥

॥ १५१२ ॥

काय पुण्यराशी । गेल्या भेदूनि आकाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुह्मी जालेति कृपाळ । माझा केला जी सांभाळ ॥ ध्रु ॥
काय बोळलें संचित । ऐसें नेणें अगणित ॥ २ ॥
तुका ह्मणे नेणें । काय केलें नारायणें ॥ ३ ॥

॥ १५१३ ॥

असें येथींचिया दीनें[1] । [2]भाग्यहीन सकळां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भांडवल एवढें गांठी । नाम कंठीं धरियेलें ॥ ध्रु ॥
आणिक तें दुजें कांहीं । मज नाहीं यावरी ॥ २ ॥
तुका ह्मणे केला कोणें । एवढा नेणें लौकिक ॥ ३ ॥

॥ १५१४ ॥

गायें नाचें वायें[3] टाळी । साधन कळीं[4] उत्तम हें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय जाणों तरले किती । नाव ऐती या बैसा ॥ ध्रु ॥
सायासाचें नाहीं काम । घेतां नाम विठोबाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे निर्वाणीचें । शस्त्र साचें हें एक ॥ ३ ॥

॥ १५१५ ॥

सर्वकाळ माझे चित्तीं । हे चि खंती राहिली ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ बैसलें तें रूप डोळां । वेळोवेळां आठवे ॥ ध्रु ॥
वेव्हाराची सरली मात । अखंडित अनुसंधान ॥ २ ॥
तुका ह्मणे वेध जाला । अंगा आला श्रीरंग ॥ ३ ॥

---

१ दे. पं. दिनें.—२ त. भाग्यहीने.—३ त. पं. वाहें.—४ पं. कली.—५ दे. " बैसती या नावेवरी " असें मागून शोध व अंक घालून केलें आहे. प्रथम पं. व त. यांजप्रमाणेंच पाठ होता. त. नाव आइती.

॥ १५१६ ॥

जैसें[1] दावी तैसा राहे । तरि कां देव दुरी आहे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ दुःख पावायाचें मूळ । रेहणी[2] ठाव नाहीं नाळ ॥ ध्रु ॥

माळामुद्रांवरी । कैंचा सोंगें जोडे हरि ॥ २ ॥

तुका ह्मणे देखें । ऐसें[3] परीचीं बहुतेकें ॥ ३ ॥

॥ १५१७ ॥

अवघा तो शकुन । ह्रुदयीं देवाचे चरण[4] ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ येथें नसतां वियोग । लाभा उणें काय मग ॥ ध्रु ॥

संग हरिच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा ॥ २ ॥

तुका ह्मणे हरिच्या दासां । शुभकाळ अवघ्या दिशा ॥ ३ ॥

॥ १५१८ ॥

ब्रह्मरूपाचीं कर्मे ब्रह्मरूप । विरहित संकल्प होती जाती ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ठेविलिया दिसे[5] रंगाऐसी शिळा । उपाधि निराळा स्फटिक मणि ॥ ध्रु ॥

नानाभाषामतें[6] आळविती बाळा । प्रबोध[7] तो मूळा जननीठायीं ॥ २ ॥

तुका ह्मणे माझे नमन जाणतियां । लागतसें पायां वेळोवेळां ॥ ३ ॥

॥ १५१९ ॥

नाहीं सुगंधाची लागत[8] लावणी । लावावी ते मनीं शुद्ध होतां ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ वाऱ्या हातीं माप चाले सज्जनाचें । कीर्ति मुख त्याचें नारायण ॥ ध्रु ॥

---

१ पं. जैसा.–२ दे. रहनी.–३ पं. ऐसीं–४ पं. चिंतन.–५ त. दावी.–६ त नानाभाषा मृत्यें आळवितां बाळा. पं. नानाभाषे माते आळविती बाळें.–७ पं. प्रबोधी तो मूळ जननी०.–८ दे लागती.

प्रभा आणि रवि काय असे आन । उदयीं तंवें जन सकळ साक्षी ॥ २॥
तुका ह्मणे बरा सत्याचा सायास । नवनीता नाश नाहीं पुन्हा ॥ ३ ॥

॥ १५२० ॥

तीर्थाटणें एकें तपें हुंबरती । नाथिले धरिती अभिमान ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसे विष्णुदास नव्हती साबडे । एकाचिया पडे पायां एक ॥ध्रु.॥
अक्षरें आणिती अंगासी जाणीव । इच्छा ते गौरव पूज्य व्हावें ॥ २ ॥
तुका ह्मणे विधिनिषेधाचे डोहीं । पडिले[2] त्यां नाहीं देव कधीं ॥ ३ ॥

॥ १५२१ ॥

पटे ढाळूं आह्मी विष्णुदास जगीं । लागों नेदूं अंगीं पापपुण्य ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ निर्भर अंतरीं सदा सर्वकाळ । घेतला सकळ भार देवें ॥ ध्रु. ॥
बळिवंत जेणें रचिलें सकळ । आह्मां त्याचें बळ अंकितांसी ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी देखत चि नाहीं । देवाविण कांहीं दुसरें तें ॥ ३ ॥

॥ १५२२ ॥

कथेचा उलंघ तो अधमां अधम । नावडे ज्या नाम ओळखा[3] तो ॥१॥
॥ ध्रु. ॥ कासया जीऊन जाला भूमी भार । अनउपकार[4] माते कुंसी ॥ध्रु.॥
निद्रेचा आदर जागरणीं वीट । त्याचे पोटीं कीट कुपथ्याचें ॥ २ ॥
तुका ह्मणे दोन्ही बुडविलीं कुळें । ज्याचें[5] तोंड काळें कथेमाजी ॥ ३ ॥

॥ १५२३ ॥

सांडोनियां[6] दों अक्षरां । काय करूं हा पसारा ।

---

१ पं. ते.— २ पं. बुडाले.—३ पं. ओळखावा तो.—४ दे आन्न. त. आण. ("अनुपकार" याच्याबद्दल "अनउपकार" असा कवीचा अभिप्राय दिसतो.).—५ पं. त्याचें.— ६ दे. त. सांडोनी.

विधिनिषेधाचा भारा । तेणें दातारा नातुडसी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनि बोबड्या[2] उत्तरीं । वाचे जपें निरंतरीं ।
नाम तुझें हरी । भवसागरीं तारूं तें[3] ॥ छ ॥
सर्वमय ऐसें वेदांचें वचन । श्रुति गर्जती[4] पुराणें ।
नाहीं आणीक ध्यान । रे साधन मज चाड ॥ २ ॥
शेवटीं ब्रह्मार्पण । या चि मंत्राचें कारण ।
कामा मात्रा वांयांविण । तुका ह्मणे बिंदुलीं ॥ ३ ॥

॥ १५२४ ॥

हरिनामाचें करूनि तारूं । भवसिंधुपार उतरलों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ फावलें फावलें आतां । पायीं संतां विनटलों ॥ छ ॥
हरिनामाचा शस्त्र घोडा । संसार गाढा छेदिला ॥ २ ॥
हरिनामाचीं धनुष्यकांडें । विन्मुख तोंडें कळिकाळ ॥ ३ ॥
येणें चि बळें सरते आह्मी । हरिचे नामीं [12]लोकीं तिहीं ॥ ४ ॥
तुका ह्मणे जालों साचे । श्रीविठ्ठलाचे डिंगर ॥ ५ ॥

॥ १५२५ ॥

नव्हे[13] हें गुरुत्व मेघवृष्टि वाणी । ऐकावी कानीं संतजनीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आरुष हा शब्द देवाचा प्रसाद । करविला वाद तैसा केला ॥ छ ॥
देहपिंड दान दिला एकसरें । मुळिचें तें खरें टांकसाळ ॥ २ ॥
तुका ह्मणे झरा लागला नवनीत । सेविलिया हित पोट धाय ॥ ३ ॥

---

१ दे. नातुडेसी.–२ दे. त. बोबडा.–३ पं. हें.– पं. बोलती.–५ पं. नाहीं आन ध्यान । साधनें मज चाड ॥.–६ पं. सेवटीं हें ब्रह्मार्पण ।.–७ दे. त. मात्र.–८ पं. बिंदुलें.–९ त. उतरीलों. पं. उतरले.–१० त. पं. हरिनामाचें.–११ दे. नामें –१२ पं. तिहीं लोकीं.–१३ पं. नव्हे गुरुत्व.

॥ १५२६ ॥

घटीं अलिप्त असे रवि । अग्नि काष्ठामाजी जेवीं[1] ।
तैसा नारायण जीवीं । जीवसाक्षीवर्तनें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भोग ज्याचे तया अंगीं । भिन्न प्रारब्ध जगीं ।
विचित्र ये रंगीं । रंगें रंगला गोसावी ॥ ध्रु ॥
देह संकल्पासारिखें[2] । एक एकांसी पारिखें ।
सुख आणि दुःखें । अंगीं कर्मे त्रिविध ॥ २ ॥
तुका ह्मणे कोडें । न कळे तयासी सांकडें ।
त्याचिया निवाडें । उगवे[3] केलें विंदान ॥ ३ ॥

॥ १५२७ ॥

सद्गदित कंठ दांटो[4] । येणें फुटो[5] ऱ्हृदय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ चिंतनाचा एक लाहो । तुमच्या अहो[6] विठ्ठला ॥ ध्रु ॥
नेत्रीं जळ वाहो[7] सदां । आनंदाचे रोमांच ॥ २ ॥
तुका ह्मणे कृपादान । इच्छी मन हे जोडी ॥ ३ ॥

॥ १५२८ ॥

जेथें देखें तेथें उभा । अवघ्या गगनाचा गाभा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ डोळां बैसलें बैसलें । ध्यान राहोनि संचलें ॥ ध्रु ॥
सरसावलें मन । केले सोज्वळ लोचन ॥ २ ॥
तुका ह्मणे सवें । आतां असिजेत[8] देवें ॥ ३ ॥

---

१ त. तेवी.—२ पं. संचल्यासारिखें.—३ पं. उठाव (पण हा लेखकप्रमाद आहे.)—४ त. दाटे.—५ त. फुटे.—६ पं. हो —७ त. वाहे —८ असिजेतें ?

॥ १५२९ ॥

तान्हे तान्ह प्याली । भूक[1] भुकेनें खादली ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ जथें तें च नाहीं जालें । झाडा घेतला विठ्ठलें ॥ ध्रु ॥

वास वासनेसी नाहीं । मन पांगुळलें पायीं ॥ २ ॥

शेष उरला तुका । जीवा[2] जीवीं जाला चुका ॥ ३ ॥

॥ १५३० ॥

पाणिपात्र दिगंबरा[3] । हस्त करा सारिखे ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आवश्यक देव मनीं । चिंतनींच सादर ॥ ध्रु ॥

भिक्षा कामधेनुऐशी । अवकाशीं शयन ॥ २ ॥

पांघरोनि तुका दिशा । केला वास अलक्षीं[4] ॥ ३ ॥

॥ १५३१ ॥

विषयीं विसर पडिला निःशेष । अंगीं ब्रह्मरस ठसावला ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ माझी मज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ॥ ध्रु ॥

लाभाचिया सोसें पुढें चाली मना । धनाचा कृपणा लोभ जैसा ॥ २ ॥

तुका ह्मणे गंगासागरसंगमीं । अवघ्या जाल्या ऊर्मि एकमय ॥ ३ ॥

॥ १५३२ ॥

कृष्णरामनाम[5] मांडीं पांवोळी[6] । तेणें होइल होळी पापा[7] धुनी ॥ १ ॥

॥ध्रु.॥ ऐसा मना छंद लावीं रे अभ्यास । जया नाहीं नास ब्रह्मरसा ॥ध्रु॥

जोडी तरी ऐसी करावी न सरे । पुढें आस नुरे[8] मागुताली ॥ २ ॥

तुका ह्मणे ऐसें धरा कांहीं मनीं । यातायाती खाणीं चुकतील ॥ ३ ॥

---

१ त. भूक भुकेली च ठेली ।.—२ पं. जीव जीवा जाला०.—३ दे. त. दिगांबरा. पं. दिगांबर.—४ पं. त आलक्षीं.—५ पं. रामकृष्णनाम.—६ त. पं. मांडी पारे वोळी. (मांडीं रे पांवोळी असावें.)—७ पं. पापधुनी.—८ पं. उरे.

॥ १५३३ ॥

परमार्थी तो न ह्मणावा आपुला । सलगी धाकुला हेळूं नये ॥ १ ॥
॥ ध्रु.॥ थोडा चि स्फुलिंग बहुत दावाग्नि । वाढतां इंधनीं[1] वाढविला ॥ ध्रु. ॥
पितियानें तैसा वंदावा कुमर । जयाचें अंतर देवें[2] वसे ॥ २ ॥
तुका ह्मणे शिरीं वाहावें खापर । माजी असे सार नवनीत ॥ ३ ॥

॥ १५३४ ॥

ज्याचा ऐसा अनुभव । विश्व देव सत्यत्वें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव तया जवळी असे । पाप नासे दर्शनें[3] ॥ ध्रु. ॥
कामक्रोधा नाहीं चाली । भूतीं जाली समता ॥ २ ॥
तुका ह्मणे भेदाभेद । गेले[4] वाद खंडोनि ॥ ३ ॥

॥ १५३५ ॥

सेवा ते आवडी उच्चारावें नाम । भेदाभेदकाम निवारूनि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न लगे हालावें चालावें बाहेरी । अवघें चि घरीं बैसलिया ॥ ध्रु.॥
देवाचीं च नामें देवाचिये शिरीं । सर्व अळंकारीं समर्पावीं ॥ २ ॥
तुका ह्मणे आहे भावें चि संतोषी । वसे नामापाशीं आपुलिया ॥ ३ ॥

॥ १५३६ ॥

ज्ञानियांचे घरीं चोजवितां देव । तेथें अहंभाव पाठी लागे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनियां ऐसे[6] सांडिले उपाय । धरियेले पाय दृढ तुझे ॥ ध्रु. ॥
वेद[7]परायण पंडित वाचक । न मिळती एक एकांमधीं ॥ २ ॥
पाहों गेलों भाव कैसी आत्मनिष्ठा । तेथें देखें चेष्टा विपरीत ॥ ३ ॥

---

१ त विंधनों.—२ पं. देवकाजीं.—३ दे. त. पं. दरुषणें.—४ पं. गेला—५ पं. होय.—६ पं. ह्मणउनि भावधें सांडीं रे उपाया.—७ दे. वेदपारायण.—पं. एकामधीं.

आपुलिया नाहीं निवाले जे अंगें । योगी करती रागें गुरगुरु ॥ ४ ॥
तुका ह्मणे मज कोणांचा पांगिला । नको बा विठ्ठला करूं आतां ॥ ५ ॥

॥ १५३७ ॥

पंढरीची वाट पाहें निरंतर । निडळावरी कर ठेवूनियां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जातियां निरोप पाठवीं माहेरा । कां मज सासुरा सांडियेलें ॥ ध्रु. ॥
पैलें कोण दिसे गरुडाचे वारिकें । विठ्ठलासारिकें चतुर्भुज ॥ २ ॥
तुका ह्मणे धीर नाहीं माझ्या जीवा । भेटसी केधवां पांडुरंगा ॥ ३ ॥

॥ १५३८ ॥

ऐसी जोडी करा रा[३]म कंठीं धरा । जेणें चुके फेरा गर्भवास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नासिवंत आटी प्रियापुत्रधन । बीज ज्याचा सीण तें चि फळ ॥ ध्रु. ॥
नाव धड करा स[४]हस्रां नामांची । जे भवसिंधूची थडी पावे ॥ २ ॥
तुका ह्मणे काळा हाणा तोंडावरी । भाता भरा ह[५]रिरामबाणीं ॥ ३ ॥

॥ १५३९ ॥

पाहें मजकडे भरोनियां दृष्टी । बहुत हिं[६]पुटी जालों माते ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ करावेंसें वाटे जीवा स्तनपान । नव्हे हें वचन शृंगा[७]रिक ॥ ध्रु. ॥
सत्यासाटीं माझी शब्दविवंचना । जोडिल्या वचनाचें तें नव्हे ॥ २ ॥
तुका ह्मणे माझी कळवळ्याची कींव । भागलासे जीव कर्तव्यानें ॥ ३ ॥

॥ १५४० ॥

तुज ह्मणतील कृपेचा सागर । तरि कां केला धीर पांडुरंगा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आझुनि कां नये तुज माझी दया । काय देवराया पाहातोसि ॥ ध्रु. ॥

---

१ पं. भांग । येकी करती०.–२ पं. हें कडवें नाहीं.–३ पं. नाम.–४ पं. त. सहस्र.–५ पं. हरिराम बाणें.–६ दे. हिंपुटी.–७ दे. त. शृंघारिक. पं. शृंघारिक.

आळवितों जैसें पाडस कुरंगिणी । पीडिलिया वनीं तानेभूक[1] ॥ २ ॥
प्रेमरसपान्हा पाजीं माझे आई । धांवें वो विठाई वोरसोनि[2] ॥ ३ ॥
तुका ह्मणे माझें कोण हेरी दुःख । तुजविण एक पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १५४१ ॥

भक्ति तों[3] कठिण शुळावरील पोळी । निवडे[4] तो बळी विरळा शूर ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जेथें पाहें तेथें देखीचा पर्वत । पायाविण भिंते[5] तांतडीची ॥ ५ ॥
कामावलें[6] तरि पाका ओज घडे । रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे ॥ २ ॥
तुका ह्मणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ॥ ३ ॥

॥ १५४२ ॥

पापी ह्मणों तरि आठवितों पाय । दोष बळी काय तयाहूनि ॥ १ ॥
॥ध्रु.॥ ऐशा विचाराचे[7] घालूनि कोंडणी । काय चक्रपाणी निजलेती[8] ॥ ५ ॥
एकवेळ जेणें पुत्राच्या उद्देशें । घेतल्याचें कैसें नेलें दुःख ॥ २ ॥
तुका ह्मणे अहो वैकुंठनायका । चिंता कां सेवका तुमचिया ॥ ३ ॥

॥ १५४३ ॥

उगविल्या गुंती । ऐशा मार्गें नेणों किती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ख्याती[9] केली अजामेळें । होतें निघालें दिवाळें ॥ ५ ॥
मोकलिला प्रायश्चित्तीं । कोणी न धरिती हातीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मुक्त वाट । वैकुंठींची घडघडाट ॥ ३ ॥

---

१ त. तान भुके.—२ पं. हरिल.—३ पं. ते.—४ पं. "निवडे तो" याबद्दल "निवड-वो".—५ पं. भीत.—६ प. कामाविलें तरी पिका वोज घडे.—७ पं. विचाराची—८ पं. पाहा-वोसी.—९ दे. त. ख्यात.

॥ १५४४ ॥

सरळीं हीं नामें उच्चारावीं सदा । हरि बा गोविंदा रामकृष्णा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ पुण्य पर्वकाळ तीर्थें हीं सकळ । कथा सिंधुजळ न्हाऊं येती ॥ ध्रु ॥

अवघे चि लाभ बैसलिया घरा । येती भाव धरा एके ठायीं ॥२ ॥

सेळ्या मेंढ्या गाई सेवा घेती ऐसी । कामधेनु तैसी नव्हे एकें ॥ ३ ॥

तुका ह्मणे सुखें पाविजे अनंता । हें वर्म जाणतां सुलभ चि ॥ ४ ॥

॥ १५४५ ॥

पवित्र तो देह वाणी पुण्यवंत । जो वदे अच्युत सर्व काळ ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तयाच्या चिंतनें तरतील दोषी । जळतील रासी पातकाच्या ॥ ध्रु ॥

देव इच्छी रज चरणींची माती । धांवत चालती मागें मागें ॥ २ ॥

काय त्यां उरलें वेगळें आणीक । वैकुंठनायक जयां कंठीं ॥ ३ ॥

तुका ह्मणे देवभक्तांचा संगम । तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ॥ ४ ॥

॥ १५४६ ॥

पाप ताप दैन्य जाय उठाउठीं । जालिया भेटी हरिदासांची ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ऐसें बळ नाहीं आणिकांचे अंगीं । तपें तिर्थें जगीं दानें व्रतें ॥ ध्रु ॥

चरणींचें रज वंदी शूळपाणी । नाचती कीर्तनीं त्यांचे माथां ॥ २ ॥

भव तरावया उत्तम हे नाव । भिजों नेदी पाव हात कांहीं ॥ ३ ॥

तुका ह्मणे मन जालें समाधान । देखिले चरण वैष्णवांचे ॥ ४ ॥

---

१ पं. हें.—२ पं. एकी.—३ पं. तप तीर्थ जगीं दान व्रतें ।.—४ पं. हें कडवें लेखकप्रमादानें लिहिण्याचें राहिलें आहे.

॥ १५४७ ॥

येणें बोधें आह्मी असों सर्वकाळ । करूनि निर्मळ हरिकथा ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ आह्मी भूमीवरी एक दैइवांचे[1] । निधान हें वाचे सांपडलें ॥ध्रु॥

तरतील कुळें दोन्ही उभयतां । गातां आइकतां सुखरूप ॥ २ ॥

न चळे हा मंत्र न ह्मणों[2] यातीकुळ । न लगे काळ वेळ विचारावी ॥३॥

तुका ह्मणे माझा विठ्ठल विसांवा । सांटवीन हांवा ऱ्हदयांत ॥ ४ ॥

॥ १५४८ ॥

बहुतां जन्मींचें[3] संचित । सबळ होयें[4] जरि बहुत ।

तरि चि होय हरिभक्त । कृपावंत मानसीं[5] ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ ह्मणवी ह्मणियारा तयांचा । दास आपुल्या दासांचा ।

अनुसरले[6] वाचा । काया मनें विठ्ठलीं ॥ ध्रु ॥

असे भूतदया मानसीं । अवघा देखे ऱ्हषीकेशी ।

जीवें न विसंबे त्यांसी[7] । मागें मागें हिंडतसे ॥ २ ॥

तुका ह्मणे निर्विकार । शरणागतां वज्रपंजर ।

जे जे अनुसरले नर । तयां जन्म[8] चुकलें ॥ ३ ॥

॥ १५४९ ॥

तारूं लागलें बंदरीं । चंद्रभागेचिये तिरीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ लुटा लुटा संतजन । अमुप हें रासी धन ॥ ध्रु ॥

जाला हरिनामाचा तारा । सीड लागलें फरारा ॥ २ ॥

तुका जवळी हमाल । भार चालवी विठ्ठल ॥ ३ ॥

---

१ पं. "दैवांचे" याबद्दल छंदासाठीं "दइवांचे" असें सर्व प्रतींत लिहिलें आहे.—२ पं. न ह्मणे.—३ पं. जन्मांचें.—४ पं. जरि होय.—५ पं. अंतरीं.—६ पं. अनुसरल्या.—७ दे. त. तयासी.—८ पं. जन्मा.

॥ १५५० ॥

आळवीन स्वरें । कैशा [1]मधुरा उत्तरें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ यें वो यें वो पांडुरंगे । प्रेमपान्हा मज दें गे ॥ ध्रु ॥
पसरूनि चोंची । [2]वचनें हीं करुणेचीं ॥ २ ॥
तुका ह्मणे बळी । आह्मी [3]लेंडिवाळें आळीं ॥ ३ ॥

॥ १५५१ ॥

सकळिकांचें समाधान । [4]नव्हे देखिल्यावांचून ॥ १ ॥
॥ ध्रु ॥ [5]रूप दावीं रे आतां । सहस्रभुजांच्या मंडिता ॥ ध्रु ॥
शंखचक्रपद्मगदा । गरुडासहित ये गोविंदा ॥ २ ॥
तुका ह्मणे कान्हा । भूक लागली नयनां ॥ ३ ॥

॥ १५५२ ॥

पतितपावना । दिनानाथा नारायणा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुझें रूप माझे मनीं । राहो नाम जपो वाणी ॥ ध्रु ॥
ब्रह्मांडनायका । भक्तजनाच्या पाळका ॥ २ ॥
[6]जीवांचिया जीवा । तुका ह्मणे देवदेवा ॥ ३ ॥

॥ १५५३ ॥

करीं हें चि काम । मना जपें राम राम ॥ १ ॥
लागो हा चि छंद । मना गोविंद गोविंद ॥ २ ॥
तुका ह्मणे मना । मज भीक द्यावी दीना ॥ ३ ॥

---

१ पं. मधुर.—२ दे. वचन हें करुणेची. पं. वचनें हे करुणेची.—३ त. पै. लडिवाळे आळी —४ पं. नाहीं.—५ त. रूप दावीं रे अनंता ।.—६ पै. जीवींचिया.

॥ १५५४ ॥

आपुलिया लाजा । धांवे भक्तांचिया काजा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाम धरिलें दिनानाथ । सत्य करावया व्रत ॥ ध्रु ॥
ओघात[1] निवारी । छाया पीतांबरें[2] करी ॥ २ ॥
उभा कर कटीं । तुका ह्मणे याजसाटीं ॥ ३ ॥

॥ १५५५ ॥

साधावया भक्तिकाज । नाहीं[3] लाज हा धरीत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ऐसियासी शरण जावें । शक्ती जीवें न वंची ॥ ध्रु ॥
भीष्मपण केला खरा । धनुर्धरा रक्षीलें ॥ २ ॥
तुका ह्मणे साक्ष[4] हातीं । तो म्यां चित्तीं धरियेला ॥ ३ ॥

॥ १५५६ ॥

धेनु चरे वनांतरीं । चित्त बाळकापें घरीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें करीं वो माझे आई । ठाव देउनि राखें पायीं ॥ ध्रु ॥
काढितां तळमळी । जिवनाबाहेर मासोळी ॥ २ ॥
तुका ह्मणे कुडी । जीवाप्राणांची आवडी ॥ ३ ॥

॥ १५५७ ॥

हरिजनाची कोणां न घडावी निंदा । साहात गोविंदा नाहीं त्याचें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ रूपा येऊनियां धरी अवतार । भक्तां अभयंकर खळां कष्ट ॥ ध्रु ॥
दुर्वास हा[5] छळीं आला आंबऋषी । सुदर्शन त्यासी जाळित फिरे ॥ २ ॥

---

१ पं. "आघात" याबद्दल "घात आघात".—२ त. पीतांबर.—३ पं. नाहीं लाज धरी-त.—४ पं. साक्षी.—५ पं. "हा" नाहीं.

द्रौपदीच्या क्षोभें कौरवांची शांति । होऊनि श्रीपाति साह्य केलें ॥ ३ ॥
न साहि[1] चि बभ्रु पांडवां पारिखा । धुडाविला सखा बळिभद्र ॥ ४ ॥
तुका ह्मणे अंगीं राखिली दुर्गंधि । अश्वत्थामा वधी पांडवपुत्रां ॥ ५ ॥

॥ १५५८ ॥

ज्यासी आवडी हरिनामांची । तो चि एक बहु शुचि ॥ १ ॥
जपतो[2] हरिनाम बीज । तो चि वर्णांमाजी द्विज ॥ २ ॥
तुका ह्मणे वर्णा धर्म । अवघें आहे सम ब्रह्म ॥ ३ ॥

॥ १५५९ ॥

विठ्ठल हा चित्तीं । गोड लागे गातां गीतीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आह्मां विठ्ठल जीवन । टाळ चिपळिया धन ॥ ध्रु ॥
विठ्ठल[3] हे वाणी । अमृत हे संजिवनी ॥ २ ॥
रंगला या रंगें । तुका विठ्ठल सर्वांगें[4] ॥ ३ ॥

॥ १५६० ॥

विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा । करी पापा निर्मूळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भाग्यवंता छंद मनीं । कोडें[5] कानीं ऐकती ॥ ध्रु ॥
विठ्ठल हें दैवत भोळें । चाड काळें न धरावी ॥ २ ॥
तुका ह्मणे भलते याती । विठ्ठल चित्तीं ते[6] शुद्ध ॥ ३ ॥

॥ १५६१ ॥

ह्मणे विठ्ठल ब्रह्म नव्हे । त्याचे बोल नाइकावे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मग तो[7] हो का कोणी एक । आदि करोनि ब्रह्मादिक ॥ ध्रु ॥

---

१ दे. त. साहे.–२ पं. जपे हरिनाम बीज. दे. जपतो हरिनामें बीज.–३ पं. विठ्ठल विठ्ठल वाणी ।.–४ पं. सर्व अंगें –५ पं. कोड.–६ पं. शुद्ध ते.–७ पं. " तो " नाहीं.

नोहीं विठ्ठल जया ठावा । तो ही डोळां न पाहावा ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं । त्याची भीड मज कांहीं ॥ ३ ॥

॥ १५६२ ॥

एक पाहातसां एकांचीं दहनें । सावध त्या गुणें कां रे नेव्हा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मारा हाक देवा भय अटाहासें । जंव काळाऐसें जालें नाहीं ॥ ध्रु.
मरणांची तंव गांठोडी पदरीं । जिणें तों चि वरि माप भरी ॥ २ ॥
तुका ह्मणे धिंगें वाहाती मारग । अंगा आलें मग हालों नेदी ॥ ३ ॥

॥ १५६३ ॥

संतांसी तों नाहीं सन्मानाची चाड । परि पडे द्वाड अव्हेरितो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणऊनि तया न वजावें ठाया । होतसे घात या दुर्बळाचा ॥ध्रु.॥
भावहीना आड येतसे आशंका । उचितासी चुका घालावया ॥ २ ॥
तुका ह्मणे जया संकोच दर्शनें । तया ठाया जाणें अनुचित ॥ ३ ॥

॥ १५६४ ॥

संसारसंगें परमार्थ जोडे । ऐसें काय घडे जाणतेनो ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हेंडग्याच्या आळां अवघीं चिपाडें । काय तेथें[9] गोडें निवडावीं ॥ ध्रु. ॥
ढेकणाचे बाजे सुखाची कल्पना । मूर्खत्व वचना येऊं पाहे ॥ २ ॥
तुका ह्मणे मद्य सांडवी लंगोटी । सांगितला सेटीं[10] विचार त्या ॥ ३ ॥

॥ १५६५ ॥

जीतीचें तें चढे प्रेम । पक्षी स्मरे राम राम ॥ १ ॥

---

१ पं. जया विठ्ठल नाहीं ठावा.—२ पं. व्हाना.—३ पं. अटाहास्य.—४ पं. जिणें तो चि माप भरे.।—५ दे.·त. पं. धींग (पण हंसकोशांत " धिंग " असा आहे.)—६ पं. अव्हेरि-ती.—७ पं. दुर्बळासी.—८ पं. हेंडगाच्या.— ९ पं. तेथी.— १० पं. सेवटीं.— ११ पं. जाती-च्याला चढे.०

॥ ध्रु. ॥ ते काय गुण लागती येरां । कागा[1] पिंजरा शोभेना ॥ ध्रु. ॥
शिकविलें तें[2] सुजात सोसी । मग[3] तयासी मोल चढे ॥ २ ॥
तुका ह्मणे वेषधारी । हिजड्या नारी नव्हेति[4] ॥ ३ ॥

॥ १५६६ ॥

बैसोनि[5] थिल्लरीं । बेडुक सागरा धिक्कारी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नाहीं देखिला ना ठावा । तोंड पिटी करी हांवा ॥ ध्रु. ॥
फुंगतें[6] काउळें । ह्मणे मी राजहंसा आगळें ॥ २ ॥
गजाहूनि खर । ह्मणे चांगला मी फार ॥ ३ ॥
मुलाम्याचें नाणें । तुका ह्मणे नव्हे सोनें ॥ ४ ॥

॥ १५६७ ॥

मुक्त होता परी बळें जाला बद्ध । घेउनियां छंद माझें माझें ॥ १ ॥
पाप पुण्य अंगीं घेतलें जडून । वर्म नेणे कोण करिता[7] तो ॥ २ ॥
तुका[8] ह्मणे वांयां गेलें वांयां विण । जैसा मृगशीण मृगजळीं ॥ ३ ॥

॥ १५६८ ॥

पंढरिये माझें माहेर साजणी । ओवियें कांडणीं गाऊं गीतें[9] ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ राही रखुमाई सत्यभामा माता । पांडुरंग पिता माहियेर[10] ॥ ध्रु. ॥
उद्धव अक्रूर व्यास आंबऋषि । भाई नारदासी गौरवीन ॥ २ ॥
गरुड बंधु लडिवाळ पुंडलीक । यांचें कवतुक वाटे मज ॥ ३ ॥
मज बहु गोत संत आणि महंत । नित्य आठवीत ओवियेसी ॥ ४ ॥
निवृत्ति ज्ञान देव सोपान चांगया । जिवलगा माझिया नामदेवा ॥ ५ ॥

---

१ पं. कागा न शोभे पिंजरा.—२ पं. "तें" नाहीं.—३ पं. मग मोल चढे त्यासी. ४ पं. न होती. दे. नव्हती.—५ दे. त. वसनें.—६ दे त. फुगातें.—७ पं धरिता.—८ पं. तुका ह्मणे गेले व्यर्थ वांयां विणें । जैसा मृग शीणें मृगजळें.—९पं. त गीती.—१०पं. माहेर माझें.

नागोजन मित्रा नरहरि सोनारा । रोहिदास कबिरा सोईरिक ॥
परसो भागवता सुरदास सांवता । गाईन नेणतां सकळांसी ॥ ७ ॥
चोखामेळा संत जिवाचे सोइरे । न पडे विसर यांचा घडी ॥ ८ ॥
जीवींच्या जिवना एका जनार्दना । पाठका कान्हया मिराबाई ॥९॥
आणीक ही संत महानुभाव मुनि । सकळां चरणीं जिव माझा ॥१०॥
आनंदें ओविया गाईन मी त्यांसी । जाती पंढरीसी वारेकरी ॥११॥
तुका ह्मणे माझा बळिया बापमाय । हर्षे नांदों सये घराचारी ॥ १२ ॥

॥ १५६९ ॥

पोट लागलें पाठीशीं । हिंडवितें देशोदेशीं ॥ १ ॥
॥ धु. ॥ पोटाभेणें जिकडे जावें । तिकडे पोट येतें सवें ॥ ध्रु ॥
जप तप अनुष्ठान । पोटासाटीं जाले दीन ॥ २ ॥
पोटें सांडियेली चवी । नीचापुढें तें नाचवी ॥ ३ ॥
पोट काशियानें भरे । तुका ह्मणे झुरझुरूं मरे ॥ ४ ॥

आरत्या ॥ १३ ॥

॥ १५७० ॥

जगदीश जगदीश तुज ह्मणती । परि या जनामाजी असशील युक्ति ।
पुण्यपापविरहित सकळां अधिपति । द्रष्टा परि नळणी अलिप्त गति ॥ १ ॥
॥ धु. ॥जय देव जय देव जय पंढरिनाथा । श्रीपंढरिनाथा ।
नुरे पाप विठ्ठल ह्मणतां सर्वथा ॥ ध्रु ॥
आगम निगम तुज नेणती कोणी । परि तूं भाव भक्ति जवळी च दोन्ही ।
नेणतां विधियुक्त राते पूंजेनी । न माये ब्रह्मांडीं संपुष्टशयनीं ॥ २ ॥

---

१ पं. रोहिदासा — २ पं. परसा.— ३ प. पाठक हा कान्हा मिराबाई ।. त. पाठक कान्हया०. दे पाटकां० —४ दे. हे.—५ दे. वारेकरी.—६ दे त. हरुखें. पं. हर्षें नांदे.— ७ दे. त. जगदेश जगदेश —८ पं. पुण्यपापाविराहित.—९ प. नुरे चि पाप.—१० ("पूजनीं? अथवा "पूजेनें" असें असावें.) पं.० पुजूनी । न माय ब्रह्मांडीं वो संतुष्ट०.

असुरां काळ भासे विक्राळ पुढें । पसरी मुख एक चावितो धुडें ।
भक्ता शरणागता चाले तो पुढें । दावी वाट जाऊं नेदी वांकडें ॥ ३ ॥
एकाएकीं बहु विस्तरला सुखें । खेळे त्याची लीळा तो चि कवतुकें ।
तेथें नरनारी कवण बाळकें । काय पापपुण्य कवण सुखदुःखें ॥ ४ ॥
सकळां वर्मां तूं चि जाणशी एक । बद्ध मोक्ष प्राप्त आणि सुखदुःख ।
जाणों ह्मणतां तुज ठकलीं बहुतेकें[1] । तुका ह्मणे शरण आलों मज राखें[2] ॥५॥

॥ १५७१ ॥

दैत्यभारें पीडिली पृथ्वी[3] बाळा । ह्मणोनि तूज येणें जालें गोपाळा ।
भक्तिप्रतिपाळक उत्सव[4] मोहळा । मंगळें तुज गाती ओंवळ[5] बाळा ॥१॥
॥ध्रु.॥ जय देव जय देव जय गरुडध्वजा । श्रीगरुडध्वजा[6] ।
आरती ओवाळूं तुज भक्तीकाजा ॥ ध्रु ॥
गुण रूप नाम नाहीं जयासी । चिंतितां तैसा चि होसी तयांसी[7] ।
मत्स्य कूर्म वराह नरसिंह जालासी । असुरां काळ ह्मण ठाके ध्यानासी ॥ २ ॥
सहस्र रूपें नाम सांवळा ना गोरा । श्रुति नेती ह्मणती तुज विश्वंभरा ।
जीवनां जीवन तूं चि होसी दातारा । न कळे पार ब्रह्मादिकां सुरवरां ॥ ३ ॥
संतां महंतां घरीं[8] ह्मणवी ह्मणियारा ।[9] शंखचक्रगदाआयुधांचा भारा ।
सुदर्शन घरटी फिरे अवश्वरा[10] । सकुमार ना स्थूळ होसी गोजिरा ॥ ४ ॥
भावेंविण तुझें न घडे पूजन । सकळ ही गंगा जाल्या तुजपासून ।

---

१ पं. त. वहुतेक.–२ त. राख.–३ दे. पृथुवी.–४ पं.० उत्साहो सोहळी । मंगळ तुज गाती आवळा वाळा.–५ त. आवळें वाळा.–६ पं. एवढा चरण नाहीं – ७ त. जयांसी.–८ दे. मुणि.–९ पं. ह्मणवी घरीं.–१० पं. आवस्वरा (अवसरा ?).

उत्पत्ति प्रळय तूं[1] चि करिसी पाळण । धरूनि राहिला तुका निश्चयीं चरण ॥ ५ ॥

॥१५७२॥

काय तुझा महिमा वर्णूं मी किती । नामेमात्रें[2] भवपाश तुटती ।
पाहातां पाउलें[3] हे विष्णुमूर्ती । कोटिकुळां सहित जे[4] उद्धरती ॥१॥
॥ ध्रु.॥ जय देव जय देव जय पंढरिराया । श्रीपंढरिराया ।
करूनियां कुरवंडी । सांडीन काया ॥ ध्रु[5] ॥
मंगळआरतीचा थोर महिमा । आणीक द्यावया नाहीं उपमा ।
श्रीमुखासहित देखे जो कर्मा । पासुन सुटे जैसा रवि नासी तम। ॥ २॥
धन्य व्रतकाळ हे एकादशी । जागरण उपवास घडे जयांसी ।
विष्णूचें पूजन एकाभावेंसी । नित्यमुक्त पूज्य तिहीं लोकांसी ॥ ३ ॥
न वजे वांयां काळ जे तुज ध्याती । असे[6] तुझा वास तयांच्या चित्तीं ॥
धाले सुखें सदा प्रेमें डुल्लती । तीर्थें मळिणें[7] वास तयांचा पाहाती ॥४॥
देव भक्त तूं चि जालासी दोन्ही । वाढावया सुख भक्ति हे जनीं ।
जड जीवां उद्धार होय लागोनि । शरण तुका वंदी पाउलें दोन्ही ॥ ५॥

॥ १५७३ ॥

कंसरायें गर्भ वधियेले सात ।
ह्मणोनि गोकुळासी आले अनंत ।
घ्यावया अवतार जालें[8] हें चि निमित्तें[9] ।
असुर संहारूनि तारावे भक्त ॥ १ ॥

---

१ पं. करिसी तूं च्चि पाळण.—२ दे. पं. नामें मात्रें.—३ दे. पं. पाउले.—४ पं. "जे" याबद्दल "जग".—५ पं. "ध्रु" नाहीं.—६ पं. अखंड तुझा वास जयांच्या चित्तीं.—७ त. मळिणें. दे. पं. मळिन—८ पं. "जालें" शब्द नाहीं.—९ दे. त. पं. निमित्य.

॥ ध्रु. ॥ जय देव जय देव जय विश्वरूपा । श्रीविश्वरूपा[1] ।
ओवाळीन तुज देहदीपें बापा ॥ ध्रु ॥
स्थूळरूप होऊनि धरितसे सानें ।
जैसा भाव तैसा तयांकारणें ।
दैत्यांसी भासला सिंहे[2] गजानें ।
काळासी महाकाळ यशोदेसी तान्हें ॥ २ ॥
अनंत वर्णी कोणा न कळे चि पार ।
सगुण कीं निर्गुण हा ही निर्धार ।
पांगलीं सौही[3] अठरा करितां वेव्हार ।
तो वळितसे[4] गौळियांचें खिल्लार ॥ ३ ॥
तेहतिस कोटि तिहीं देवांसी श्रेष्ठ ।
पाउलें[5] पाताळीं नेणती स्वर्ग मुगुट ।
गिळिलीं चौदा भुवनें तरि न भरे चि पोट ।
तो खाउन धाला गोपाळाचें उच्छिष्ट ॥ ४ ॥
महिमा वर्णू तरि पांगलिया श्रुति ।
सिणला शेष चिरल्या जिव्हा करितां स्तुती ।
भावेंविण कांहीं न चले चि युक्ति ।
राखें शरण तुकयाबंधु करी विनंती ॥ ५ ॥

॥ १५७४ ॥

परमानंदा परमपुषोत्तमरामा ।

---

१ पं. "श्रीविश्वरूपा नाहीं.—२ दे. सिहीं गजान. त. सिंही गजाने.—३ दे. साई.—४ पं. तो हा वळितसे.—५ पं पाउलें पाताळीं स्वर्गीं मुगुट.

अच्युता अनंता हरि मेघश्यामा ।
अविनाशा अलक्षा परता परब्रह्मा ।
अकळकळा कमळापती न कळे महिमा ॥ १ ॥
॥ ध्रु ॥ जय देव जय देव जयं[1] जी श्रीपती ।
मंगळशुभदायका करीन आरती ॥ ध्रु ॥
गोविंदा गोपाळा गोकुळरक्षणा ।
गिरिधरकर भवसागरतारक दधिमथना ।
मधुसूदन मुनिजीवन धरणीश्रमहरणा ।
दीनवत्सळ सकळां मूळ जय जयनिधाना ॥ २ ॥
विश्वंभरा[2] सर्वेश्वर जगदाधारा ।
चक्रधर करुणाकर पावन गजेंद्रा ।
सुखसागर गुणआगर मुगुटमणी शूरा ।
कल्याणकैवल्यमूर्ति मनोहरा ॥ ३ ॥
गरुडासना शेषशयना नरहरी ।
नारायणा ध्याना सु[3]रवरहरगौरी ।
नंदा नंदनवंदन त्रिभुवनांभीतरी ।
अनंतनामीं ठसा अवतारांवरी ॥ ४ ॥
सगुणनिर्गुणसाक्ष श्रीमंत संतां ।
भ[4]गवाना भगवंता काल[5]कृतांता ।

---

१ दे. त. जया जी श्रीपती.—२ पं. विश्वंभरा सर्वेश्वरा जगदोद्धारा.—३ दे. त. सु हरहरगौरी.—४ पं. " भगवाना " नाहीं.—५ दे. त. कालकृदांता (कालकृदंता ?).

उत्पत्तिपाळणपासुन संहारणसत्ता ।
शरण तुकयाबंधु तारीं रिति बहुतां ॥ ५ ॥

॥ १५७५ ॥

पंढरि पुण्यभूमी भीमा दक्षिणवाहिनी ।
तीर्थ हें चंद्रभागा महा पातकां धुनी ।
उतरलें वैकुंठमहासुख मेदिनी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जय देवा पांडुरंगा जेय[1] अनाथनाथा ।
आरती ओंवाळीन तुह्मां लक्ष्मीकांता ॥ छ ॥
नित्य नवा सोहळा हो[2] महा[3]वाद्यांचा गजर ।
सन्मुख गरुड पारीं उभा जोडुनि कर ।
मंडितचतुर्भुजा कटीं मिरवती कर ॥ २ ॥
हरिनाम कीर्तनं[4] हो आनंद महाद्वारीं ।
नाचती प्रेमसुखें नर तेथिंच्या नारी ।
जीवन्मुक्त लोक नित्य पाहाती हरी ॥ ३ ॥
आषाढी कार्तिकी हो ग[5]रुडटकयां भार ।
गर्जती नाम[6]घोषें महावैष्णववीर ।
पापासी रीग नाहीं असुर कांपती सुर ॥ ४ ॥
हें सुख पुंडलिकें कसें आणिलें बापें ।
निर्गुण साकारलें आ[7]ह्मांलागिं हें सोपें ।
ह्मणोनि चरण धरोनि तुका राहिला सुखें ॥ ५ ॥

---

१ दे. ब. जया.–२ पं. ही.–३ हे महावाद्यां गजर.– ४ पं. कीर्तनें.— ५ पं. गरुडटकियांचा.–६ दे. नाम घोष.–७ पं. आह्मांलागीं सोपें.

॥ १५७६ ॥

अवतार गोकुळीं हो जन तारावयासी ।
लावण्यरूपडें हें तेजपुंजाळरासी ।
उगवतां कोटि बिंबें रवि लोपले शशी ।
उत्साव सुरवरां मही थोर मानसीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जय देवा कृष्णनाथा जय रखुमाईकांता ।
आरती ओंवाळीन तुह्मां देवकीसुता ।
जय देवा कृष्णनाथा ॥ ध्रु ॥
वसुदेवदेवकीची बंद फोडुनी शाळ ।
होउनि विश्वजनिता तया पोटिंचा बाळ ।
दैत्य हे त्रासियेले समूळ कंसासी काळ ।
राजेया उग्रसेना केला मथुरापाळ ॥ २ ॥
राखतां गोधनें हो इंद्र कोपला भारी ।
मेघ जो कडाडिला शिळा वर्षतां धारीं ।
राखिलें गोकुळ हें नखीं धरिला गिरी ।
निर्भय लोकपाळ अवतरले हरी ॥ ३ ॥
कौतुक पाहावया माव ब्रह्मयानें केली ।
वत्सें ही चोरुनियां सत्यलोकासि नेलीं ।
गोपाळ गाईवत्सें दोहीं ठायीं रांखीलीं ।
सुखाचा प्रेमसिंधु अनाथांची माउली ॥ ४ ॥

---

१ पं. तेजः पुंजाळ रासी.—२ पं. उत्साह.—३ पं. फोडिलो.—४ पं. कंसादि.—५ पं. राज्यपा. ६ दे. वरि —७ त. हो.—८ पं. वत्सें हे चारोनियां. दे. वत्सें चोरोनियां.—९ पं. गाई वत्स.—१० त. पं. रक्षिली.

तारिलें भक्तजना दैत्य निर्दाळूनि ।
पांडवां साहकारी आडल्यां निर्वाणी ।
गुण मी काय वर्णूं[1] मति केवढी वांगी ।
विनवितो दास तुका ठाव देईं[2] चरणीं ॥ ५ ॥

॥ १५७७ ॥

सुंदर अंगकांती मुख[3] भाळ सुरेख ।
बाणली उटी अंगीं टिळा सांजिरी[4] रेख ।
मस्तकीं मुगुट कानीं कुंडलों[5] तेज फांके ।
आरक्त दंत हिरे कैसे शोभले निके ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जय देवा चतुर्भुजा जय[6] लावण्यतेजा ।
आरती ओवाळीन भवतारिया हा वोजा[7] । जय० ॥ ध्रु ॥
उदार जुंझार हा जया वाणिती श्रुति ।
परतल्या नेति ह्मणती तयां न कळे गति ।
भाट हा चतुर्मुखें अनुवाद करिती ।
पांगलीं साही अठरा रूप न गति ॥ २ ॥
ऐकोनि रूप ऐसें तुजलागीं धुंडिती ।
बोडके नग्न एक निराहार यति[8] ।
साधनें योग नाना तपें[9] दारुण किती ।
सांडिलें सुख दिली[10] संसारा शांती ॥ ३ ॥
भरूनि माजी लोकां तिहीं नांदसि एक ।

१ दे. वाणूं.–२ पं. मागे.–३ दे. मुखे. प. मुळ–४ पं. साजिरा.–५ पं. कुंडलें.–६ दे. त. जया.–७ त. भवतारिया वोजा. पं. भवतारी हा वजा.–८ दे. ईति. त. इवि.–९ पं. वपती.–१० पं.० दिले संसाराची त्या शाति ।.

कामिनी मनमोहना रूप नाम अनेक ।
नासति नाममात्रें भवपातकें[1] शोक ।
पाउलें वंदितातीं[2] सिद्ध आणि साधक ॥ ४ ॥
उपमा द्यावयासी दुजें काय हें तुज ।
तत्त्वासि तत्त्वसार मूळ जालासी बीज ।
खेळसि बाळलीळा अवतार सहज ।
विनवितो दास तुका कर जोडोनि तुज ॥ ५ ॥

॥ १५७८ ॥

सकुमार मुखकमळ निजसारनिर्मळ ।
सावळी सुनीळ तनु भ्रमरांग कुरळ ।
झळकति दिव्य तेजें दंत माज पातळें[3] ।
मिरवलिं मयूरपत्रें[4] मुगुट कुंडलें माळ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ जय देवा जगदीश्वरा ।
धन्य रखुमाईवरा । आरती करीन काया ।
ओंवाळिन सुंदरा । जय० ॥ ध्रु ॥
गोजिरें ठाणमान[5] भुजा मंडित चारी ।
शोभति शंखचक्रगदापद्म मोहरी ।
ह्रदयीं ब्रह्मपद बाणलें शृंगारीं ।
गर्जति चरणीं वांकी कंठ कोकिळास्वरीं[6] ॥ २ ॥

---

१ पं. भवपातक.—२ पं. वंदिती.—३ पं. पाताळ.—४ दे. त. पं. मयोरपत्रें.—५ [illegible] ठाणमाण.—६ पं. कोकिळस्वरीं.

धवधवित उटी अंगीं बावन चंदनांची ।
[1]ल्लाटीं कस्तुरिचा कास पितांबराची ।
[2]कटिसूत्र वरि साजिरें प्रभा वर मोतियांची ।
संगीत सकळ मुद्रा पाउलें कुंकुमाचीं ॥ ३ ॥
सौभाग्यसुख सागर गुणलावण्यखाणी ।
लावली दीनवत्सळ विश्व लाविलें ध्यानीं ।
आश्चर्य देव करिती ऋषि राहिले मुनि ।
धन्य ते प्रसवली ऐसिया नंदपत्नी ॥ ४ ॥
वर्णितां ध्यान महिमा श्रुति राहिल्या नेति ।
रविकोटि चंद्र तारा प्रकाशा न तुळती ।
उदार सुर गंभीर[3] पूर्ण आनंदमूर्ति ।
तुकयाबंधु ह्मणे स्तवूं मी काय किती ॥ ५ ॥

॥ १५७९ ॥

महा जी महादेवा महाकाळमर्दना ।
मांडियेलें उग्रतप महादीप्त दारुणा ।
परिधान व्याघ्रांबर चि[4]ताभस्मलेपना ।
स्म[5]शान क्रीडास्थळ तुह्मा जी त्रिनयना ॥ १ ॥
॥ ध्रु. । जय देवा हरेश्वरा जय पार्वतीवरा ।
आरती ओंवाळिन कैवल्यदातारा । जय० ॥ छ ॥
रुद्र हें नाम तुह्मां उग्र सं[6]हारासी ।

१ दे. ल्ल्हाट. पं ल्लाट.—२ पं. ही पंक्ति नाहीं.—३ पं० गंभीर आनंद हे मूर्ति.—४ दे. चिदाभस्मलेपना.—५ पं. स्मशानीं.—६ पं. त. संहाररासी.

शंकर शिव भोळा उदार सर्वस्वीं ।
उदक बेलपत्र टाळी वाहिल्या देसी ।
आपुलें पद दासां ठाव देई[1] कैलासीं ॥ २ ॥
त्रैलोक्यव्यापका हो जन आणि विजन[2] ।
विराटस्वरूप हें तुझें साजिरें ध्यान ।
करितो[3] वेद स्तुती कीर्ती मुखें[4] आपण ।
जाणतां नेणवे हो तुमचें महिमान ॥ ३ ॥
बोलतां नाम महिमा असे आश्चर्य जगीं ।
उपदेश केल्यानंतरें पापें पळती वेगीं ।
हरहर वाणी गर्जे प्रेम संचरे अंगीं ।
राहिलि दृष्टी चरणीं रंग मीनला रंगीं ॥ ४ ॥
पुंजूनि[5] लिंग उभा तुका जोडोनी हात ।
करितो विज्ञापना परिसावी हे मात ।
अखंड राहूं द्यावें माझें चरणीं चित्त ।
घातले साष्टांग मांगे[6] मस्तकीं हात ॥ ५ ॥

॥ १५८० ॥

अवतारनामभेद गणा आदि अगाद[7] ।
जयासि पार नाहीं पुढें खुंटला वाद ।
एक चि दंत शोभे मुख विक्राळ दोंद ।
ब्रह्मांडामाजि दावी अनंत हे छंद ॥ १ ॥

---

१ पं. देसी.–२ पं. वन.–३ पं. कारिती.–४ पं. मुख्य.–५ पं. पूजिलें.–६ पं. माझे.–
७ पं. अगाध.

॥ ध्रु. ॥ जय जया गणपती ओंवाळिन आरती ।
साजिऱ्या सरळ भुजा फरशकमळ शोभती ॥ ध्रु ॥
हे मही ठेंगणी हो तुज नृत्यनायका ।
भोंवरि फेर देतां असुर मर्दिले एकां ।
घातले तोडरीं हो भक्तजनपाळका ।
सहस्र नाम तुज भुक्तिमुक्तिदायका ॥ २ ॥
सुंदर शोभला हो रूपें लोपलीं तेजें ।
उपमा काय देऊं असे आणिक दुजें ।
रविशशितारागणें जयामाजी सहजें ।
उदरीं सामावलीं जया ब्रह्मांडबीजें ॥ ३ ॥
वर्णिता शेष लीळा तया भागलीं मुखें ।
पांगुळले वेद चारी कैसे राहिले सुखें ।
अवतार जन्मला हो लिंगनाभी या मुखें ।
अमूर्त मूर्तिमंत होय भक्तीच्या सुखें ॥ ४ ॥
विश्व हें रूप तुझें हस्त पाद मुखडें ।
ऐसा चि भाव देईं तया नाचतां पुढें ।
धूप दीप पंचारति ओंवाळिन निवाडें ।
राखें या शरणागता तुका खेळतां लाडें ॥ ५ ॥

॥ १५८१ ॥

कनकाच्या परियेळीं उजळूनि आरती ।

---

१ पं. ही पंक्ति नाहीं.—२ त. ०तारांगणें०.—३ त. राख या शरणांगता. पं. राखे शरणांगता.

रत्नदीपशोभा[1] कैशा पाजळल्या ज्योती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ओंवाळूं गे माये सबाह्य साजिरा ।
राहिरखुमाईसत्यभामेच्या वरा ॥ ध्रु ॥
मंडितचतुर्भुज दिव्य कानीं कुंडलें ।
श्रीमुखाची शोभा पाहातां तेज फांकलें ॥ २ ॥
वैजयंती माळे[2] गळां शोभे श्रीमंत ।
शंखचक्रगदापद्म आयुधें शोभत ॥ ३ ॥
सांवळा सकुमार जैसा कर्दळीगाभा ।
चरणींचीं नेपुरें वांकी गर्जती नभा ॥ ४ ॥
ओंवाळितां मन हें[3] उभें ठाकलें ठायीं ।
[4]समदृष्टि समाधि तुकया लागली पायीं ॥ ५ ॥

॥ १५८२ ॥

भक्तीचिया पोटीं बोध कांकडा ज्योती ।
पंचप्राण जीवें भावें ओंवाळूं आरती ॥ १ ॥
ओंवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा ।
दोन्ही कर जोडोनि चरणीं ठेवीन माथा ॥ ध्रु ॥
काय महिमा वर्णूं आतां सांगणें तें किती ।
कोटि ब्रह्महत्या मुख पाहतां जाती ॥ २ ॥
राही रखुमाई दोही दों बाहीं ।
मयूर पिच्छचामरें ढाळिति ठायीं ठायीं ॥ ३ ॥

---

१ पं. रत्नदीपप्रभा.—२ पं. माळा.—३ पं. " हें " नाहीं.—४ पं. समदृष्टि समान तुकया लागला पायीं.

तुका ह्मणे दीप घेऊनि उन्मनति शोभा ।
विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा ॥ ४ ॥*

॥ १५८३ ॥

धन्य दिवस आजि दर्शन[1] संतांचें । नांदे तया घरीं दैवत पंढरीचें ॥ १ ॥
॥ धु. ॥ धन्य पुण्य रूप कैसा जाला संसार ।
देव आणि भक्त दुजा नाहीं विचार ॥ छ ॥
धन्य पूर्व पुण्य वोडवलें निरुतें । संतांचें दर्शन जालें भाग्यें बहुतें ॥ २ ॥
तुका ह्मणे धन्य आह्मां जोडली जोडी । संतांचे चरण [2]आतां जीवें न सोडीं ॥ ३ ॥

॥ १५८४ ॥

[3]गाँऊं वाणूं तुज विठो तुझा करूं अनुवाद ।
जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ॥ १ ॥
॥ धु. ॥ आनंद रे विठोबा जाला माझे मनीं ।

---

१ दे. त. दरुषण.—२ त. आतां न विसंभें घडी ।.—३ पं. गाऊं नाचूं विठु तुझा•.

* या अभंगाच्या पुढें रामेश्वर भटाचा एक अभंग तळेगांवच्या प्रतींत आहे तोः—
तूं चि आत्माराम नव्हेसी देहधारी । स्तुति जरी होय झडो माझी वैखरी ।
पातकीं मूढ जन पडतील अघोरीं । यालागीं अवतार केला महीवरी ॥ १ ॥
॥ धु. ॥ जय जय भक्तराया धर्ममूर्ति तुकया । आरती वोंवाळीं भावें तुझिया पायां ॥ छ ॥
तुझे ठायीं असे श्रम कोणा नकळे नेम । जन हें काय जाणे अनुभवितो राम ।
टाकोनि अभिमान जीवीं धरिलें प्रेम । बोलोनि महिमा तुझा जना दिला विश्राम ॥ २ ॥
अद्भुत महिमा तुझा काय वर्णूं दातारा । उदकांविण अन्न दिवस क्रमिले तेरा ।
आतां हे ऐसी प्राप्ति काय घडेल येरां । उदकीं कागद दिन रक्षिले अठरा ॥ ३ ॥
ऐकतां तुझें वचन मन होय उन्मन । सच्चिदानंद गाभा तुजठायीं पूर्ण ।
नित्य हें असो माझें तुझे पायीं अनुसंधान । करूनि कृपादान देईं इतुकें दान ॥ ४ ॥
शास्त्र आणि वेदांत शिष्टाचार समस्त । आणिला एकवाक्या जनलोक कृतार्थ ।
विशेष रामेश्वरा प्रेम दिलें बहुत । विनवितों तुज आतां ठेवीं मस्तकीं हात ॥ ५ ॥

देखिले[1] लोचनीं विटेसहित पाउले ॥ ध्रु ॥
ने[2] करीं तपसाधनें रे मुक्तीचे सायास ।
हा चि जन्मोजन्मीं गोंड[3] भक्तीचा रस ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां प्रेमा उणें तें काई ।
पंढरीचा राणा सांटविला ह्रदयीं ॥ ३ ॥

॥ १५८५ ॥

मागणें तें एक तुजप्रति आहे । देशी तरि पाहें पांडुरंगा ॥ १ ॥
या संतांसी निरवीं हें मज देईं । आणिक दुजें काहीं न मंगें[4] तुज ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां उदार होईं । मज ठेवीं पायीं संतांचिया ॥ ३ ॥

॥ स्वामींनीं काया ब्रह्म केली ते अभंग ॥ २४ ॥

॥ १५८६ ॥

शोधितां चि नये । ह्मणोनि वोळगतों पाये ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां दिसों नये जना । ऐसें करा नारायणा ॥ ध्रु ॥
परतोनि मन । गेलें ठायीं चि मुरोन ॥ २ ॥
विसरला तुका । बोलों चालों जाला मुका ॥ ३ ॥

॥ १५८७ ॥

रज्जुसर्पाकार । भासयेलें[5] जगडंबर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ह्मणोनि आठवती[6] पाय । घेतों आलाय बलाय ॥ ध्रु ॥
दृश्य[7] द्रुमाकार लाणी । केलों सर्वस्वासी[8] धणी ॥ २ ॥
तुकीं तुकला तुका । विश्वीं भरोनि उरला लोकीं[9] ॥ ३ ॥

---

१ त. देखिलें लोचनीं विटेसहित पाउलें ।. दे. पं. (पाउल शब्द पुल्लिंगी धरिला आहे).— २ त. न करीं तप रे मुक्तीचे०. पं. न करीं तप साधन मुक्तीचे०.—३ त. सेवीं.—४ पं. मागें.— ५ त. भासयेलें.— ६ पं. आठवितों.— ७ दे. दृश द्रुमाकार०. त. पं. दृश्य द्रुमाकार०.— ८ दे. सर्व सासी.— ९ पं. जोकां.

॥ १५८८ ॥

ह्मणवितों दास । परि मी असें उदास ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हा चि निश्चय माझा । परि मी निश्चयाहुनि दुजा ॥ ध्रु. ॥
सरतें कर्तृत्व[1] माझ्यानें । परि मी त्याहीं[2] हून भिन्न ॥ २ ॥
तुका तुकासी तुकला । तुका तुकाहुनि निराळा ॥ ३ ॥

॥ १५८९ ॥

घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मस्थिती सांडवीन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ब्रह्मभूत[3] होते काया च कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥ ध्रु. ॥
तीर्थभ्रमकासी[4] आणीन आळस । कडु स्वर्गवास करिन भोग ॥ २ ॥
सांडवीन तपोनिधा अभिमान । यज्ञ आणि दान लाजवीन ॥ ३ ॥
भक्तिभाग्यप्रेमा[5] साधीन पुरुषार्थ । ब्रह्मींचा जो अर्थ निजठेवा ॥ ४ ॥
धन्य ह्मणवीन येहें[6] लोकीं लोकां । भाग्य आह्मीं तुका देखियेला ॥ ५ ॥

॥ १५९० ॥

संसाराचे अंगीं अवघीं च व्यसनें[7] । आह्मी या कीर्तनें शुद्ध जालों ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां हें सोंवळें जालें त्रिभुवन । विषम धोऊन सांडियेलें ॥ ध्रु. ॥
ब्रह्मपुरीं वास करणें अखंड । न देखिजे तोंड विटाळाचें ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मां एकांताचा वास । ब्रह्मीं ब्रह्मरस सेवूं सदा ॥ ३ ॥

॥ १५९१ ॥

तुह्मी सनकादिक संत । ह्मणवितां कृपावंत ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एवढा करा उपकार । देवां[8] सांगा नमस्कार ॥ ध्रु. ॥

---

१ दे. त. कर्तुत्व.–२ पं.० त्याहूनि असें भिन्न ।–३ पं. ब्रह्मभूत काया हा तसे कीर्तनीं ।.–४ दे. तीर्थ भ्रमकासी.–५ पं. भक्ति भाग्य सीमा०.–६ दे. येहे. पं. येही. "इह" ह्या-बद्दल.–७ दे. त. वेसनें.–८ पं. सांगा देवा.

भाकूनि[1] करुणा । विनवा वैकुंठींचा[2] राणा ॥ २ ॥
तुका ह्मणे मज आठवा । मूळ[3] लवकरी पाठवा ॥ ३ ॥

॥ १५९२ ॥

आपुल्या माहेरा जाईन मी आतां । निरोप या संतां हातीं आला ॥ १ ॥ ध्रु. ॥ सुख दुःख माझें ऐकिलें कानीं । कळवळा मनीं करुणेचा ॥ध्रु.॥
करुनी सिद्ध मूळ साउलें भातुकें । येती दिसें ऐकें[4] न्यावयासी ॥ २ ॥
त्या चि पंथें माझें लागलेंसे चित्त । वाट पाहें नित्य माहेरांची[5] ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबाप ॥ ४ ॥

॥ १५९३ ॥

चिन्हें उमटती[6] अंगीं । शकुना जोगीं उत्तम ॥ १ ॥
॥ ध्रु. आठवला बापमाय । येइल काय मूळ नेणों ॥ ध्रु. ॥
उत्कंठित जालें मन । तें[7] चि खुण तेथींचि ॥ २ ॥
तुका ह्मणे काम[8] वारीं । आळस घरीं करमेना ॥ ३ ॥

॥ १५९४ ॥

आरोनियां पाहे वाट । कटकट सोसेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आलियांस पुसें मात । तेथें चित्त लागलें ॥ ध्रु. ॥
दळीं कांडीं लोकांऐसें । परि मी नसें ते ठायीं ॥ २ ॥
तुका ह्मणे येथें पिसें । तेथें[9] तैसें असेल ॥ ३ ॥

॥ १५९५ ॥

येथीलियां[10] अनुभवें । कळों जीवें[11] हें येतसे ॥ १ ॥

---

१ पं. भाकावी.—२ पं. पंढरीचा.—३ दे. त. पं मुळ.—४ पं. एक.—५ आठवाची.—६ दे उमटताती.—७ पं. ते खुण०.—८ त. पं. कामा.—९ पं. तसें तेथें.—१० पं. येथील या.—११ पं. ०जीवें येतसे.

॥ ध्रु. ॥ दोहीं ठायीं एक जीव । माझी कींव त्या अंगीं ॥ ध्रु ॥
भूक भुके चि खाउनि धाय । नाहीं हाय अन्नाची ॥ २ ॥
तुका ह्मणे सुख जालें । अंतर धालें त्यागुणें ॥ ३ ॥

॥ १५९६ ॥

पैल आले हरि । शंख चक्र शोभे करीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ गरुड येतो फडत्कारें[1] । ना भी ना भी ह्मणे त्वरें[2] ॥ ध्रु ॥
मुगुटकुंडलांच्या दीप्ति । तेजें[3] लोपला गभस्ति ॥ २ ॥
मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥ ३ ॥
चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ॥ ४ ॥
पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥ ५ ॥
तुका जालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ[4] ॥ ६ ॥

॥ १५९७ ॥

शंचक्रगदापद्म । पैल आला पुरुषोत्तम ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ना भी ना भी भक्तराया । वेगीं पावलों सखया ॥ ध्रु ॥
दुरूनि येतां दिसे दृष्टी । धाकें दोष पळती सृष्टी ॥ २ ॥
तुका देखोनि एकला । वैकुंठींहूनि हरि आला ॥ ३ ॥

॥ १५९८ ॥

पैल दिसतील भार । दिंडी पताका अपार ॥ १ ॥
आला पंढरीचा राणा । दिसतील त्याच्या खुणा ।
सुख वाटे मना । डोळे बाह्या स्फुरती ॥ ध्रु ॥

---

१ पं. फडात्कारें.–२ पं. खरें.–३ पं. तेज.–४ पं. " वैकुंठपीठ " याबद्दल " वैकुंठ.

उठिले गजर नामाचे । दळभार वैष्णवांचे ॥ २ ॥
तुका करी रिता ठाव । त्यांसी बैसावया वाव ॥ ३ ॥

॥ १५९९ ॥

चला जाऊं रे सामोरे । पुढें भेटों विठल धुरे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणीं ।
फेडावया धणी प्रेमसुखाची आजि ॥ ध्रु ॥
पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ॥ २ ॥
तुका आळंगिला बाहीं । ठेविला विठोबाचे पायीं ॥ ३ ॥

॥ १६०० ॥

पाहुणे घरासी । आजि आले ऱ्हषीकेशी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय करूं उपचार । कोंप मोडकी जर्जर ।
कण्या दरदर । पाण्यामाजी रांधिल्या ॥ ध्रु ॥
घरीं मोडकिया बाजा । वरि वाकळांच्या शेजा ॥ २ ॥
मुखशुद्धि तुळसी दळ । तुका ह्मणे मी दुर्बळ ॥ ३ ॥

॥ १६०१ ॥

संतीं केला अंगीकार । त्यासी अभिमान थोर ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कांहीं ठेविलें चरणीं । घेती तें चि पुरवूनि ।
तुका पायवणी । घेऊनियां निराळा ॥ ध्रु ॥
नसतां कांहीं संचित । भेटी[3] जाली अवचित ॥ २ ॥
देव मिळोनियां भक्त । तुका केलासे सनाथ ॥ ३ ॥

---

१ पं. " फेडावया० आजि । " इतकें नाहीं.—२ पं. " दरदरीत पाण्या माजी रांधियेल्या कण्या । " एवढेच ध्रुवपद आहे.—३ पं. " भेटी जाली० " आणि " पुढच्या कडव्यांतलें "देव मिळोनियां०" हे दोन चरण एकमेकांशीं बदलले आहेत.

॥ १६०२ ॥

अवघियांच्या आलों मुळें । एका[1] वेळे न्यावया ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ सिद्ध व्हावें सिद्ध व्हावें । आधीं ठावें करितों ॥ ध्रु ॥

जोंवरि ते[2] घटिका दुरी । आहे उरी तो काळ ॥ २ ॥

मंगळाचे वेळे उभे । असों[3] शोभे सावध ॥ ३ ॥

अवघियांचा योग घडे । तरी जोडे श्लाघ्यता ॥ ४ ॥

तुका ह्मणे पाहें वाट । बहु आट करूनि ॥ ५ ॥

॥ १६०३ ॥

सकळ ही माझी बोळवण करा । परतोनि घरा जावें तुह्मीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कर्मधर्में[4] तुह्मां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशीर्वाद ॥ध्रु॥

वाढवूनि दिलों[5] एकाचिये हातीं । सकळ निश्चिती जाली तेथें ॥ २ ॥

आतां मज जाणें प्राणेश्वरासवें । माझिया भावें अनुसरलों ॥ ३ ॥

वाढवितां लोभ होईल उसीर । अवघींच स्थिर करा ठायीं ॥ ४ ॥

धर्म अर्थ काम जाला एके ठायीं । मेळविला जिहीं हाता हात ॥ ५ ॥

तुका ह्मणे आतां[6] जाली हे चि भेटी । उरल्या त्या गोष्टी बोलावया ॥ ६ ॥

॥ १६०४ ॥

बोलिलों तें आतां पाळावें वचन । ऐसें[7] पुण्य कोण माझे गांठी ॥ १ ॥

॥ ध्रु.॥ जातों आतां आज्ञा घेऊनियां स्वामी । काळक्षेप आह्मी करूं कोठें ॥ ध्रु ॥

न घडे यावरि न धरवे धीर । पीडतां राष्ट्र देखोनि जग ॥ २ ॥

---

१ पं. एक.—२ पं. हे.—३ पं. असा.—४ पं. कर्म धर्में.—५ पं. दिले.—६ दे. "आतां जाली" बद्दल "तुह्मां आह्मां" असा पाठ घातला आहे.—७ पं. काय ऐसें पुण्य माझे गांठी ।.

तुका ह्मणे तुह्मी दिसे मोकलिलें । काय आतां आलें जीवित्वाचें ॥ १ ॥

॥ १६०५ ॥

करावें तें काम । उगाच वाढवाया श्रम ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ अवघें एकमय । राज्य बोलों चालों नये ॥ ध्रु ॥

दुजयाची सत्ता । न चलेसी जाली आतां ॥ २ ॥

आतां नाहीं तुका । पुन्हा हारपला लोकां ॥ ३ ॥

॥ १६०६ ॥

आह्मी जातों तुह्मी कृपा असों द्यावी । सकळा सांगावी विनंती माझी ॥ १ ॥

वाढवेळ जाला उभा पांडुरंग । वैकुंठा श्रीरंग बोलावितो ॥ २ ॥

अंतकाळीं विठो आह्मांसी पावला । कुडीसहित जाला गुप्त तुका ॥ ३ ॥

॥ १६०७ ॥

तुका उतरला तुकीं । नवल जालें तिहीं लोकीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ नित्य करितों कीर्तन । हें चि माझें अनुष्ठान ॥ ध्रु ॥

तुका बैसला विमानीं । संत पाहाती लोचनीं[1] ॥ २ ॥

देव भावाचा भुकेला । तुका वैकुंठासी नेला ॥ ३ ॥

॥ १६०८ ॥

न देखिजे ऐसें केलें । या विठ्ठलें दुःखासी ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ कृपेचिये सिंहासनीं[2] । अधिष्ठानीं बैसाविलें ॥ ध्रु ॥

वाजता तो नलगे वारा । क्षीरसागरा शयनीं ॥ २ ॥

तुका ह्मणे अवघे ठायीं । मज पायीं राखिलें ॥ ३ ॥

॥ १६०९ ॥

वाराणसीपर्यंत असों सुखरूप । सांगावा निरोप संतांसी हा ॥ १ ॥

---

१ पं. नयनी.—२ दे. त. पं. सिंव्हासनीं.

येथूनियां आह्मां जाणें निजधामा । सर्वे असे आह्मां गरुड हा ॥ २ ॥
कृपा असों द्यावी मज दीनावरी । जातसों माहेरी तुका ह्मणे ॥ ३ ॥
॥ २४ ॥

शके १५७१ एकोहत्तरीं विरोधनामसंवत्सरीं फाल्गुनवद्य द्विती-
या सोमवासरीं प्रथमप्रहरीं तुकोबा गुप्त जाले ॥ १ ॥

॥ १६१० ॥

जाती पंढरीस । ह्मणे जाईन तयांस ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तया आहे संवसार । ऐसें बोले तो माहार ॥ ध्रु ॥
असो नसो भाव । जो हा देखे पंढरिराव ॥ २ ॥
चंद्रभागे न्हाती । तुका ह्मणे भलते याती ॥ ३ ॥

॥ १६११ ॥

धरियेलीं सोंगें । येणें अवघीं पांडुरंगें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तें हें ब्रह्म विटेवरी । उभें चंद्रभागे तिरीं ॥ ध्रु ॥
अंतर्व्यापी बाहे । धांडोळितां कोठें नोहे ॥ २ ॥
योगयागतपें । ज्याकारणें दानजपें ॥ ३ ॥
दिले नेदी जति । भोग सकळ ज्या होती ॥ ४ ॥
अवघी लीळा पाहे । तुका ह्मणे दासां साहे ॥ ५ ॥

॥ १६१२ ॥

ज्याचे गर्जतां पवाडे । कळिकाळ पायां पडे ॥ १ ॥

---

१ त. जातसें. दे. जातोंसों.—२ पं. "एकाहातरीं" नाहीं.—३ पं. "प्रथम प्रहरीं तुकोबा गुप्त जाले" याबद्दल "प्रात काळीं स्वामी गुप्त जाले असे."—४ त. "तुकोबा गुप्त जाले" याबद्दल "तुकाराम गुप्त."—५ पं त. संसार.—६ दे. त. अंतर व्या०.—७ पं. धुंडाळितां.—८ दे. पं. नाहीं.—९ पं. ज्ञान.

॥ ध्रु. ॥ तो हा पंढरीचा राणा । पुसा साचौं अठरां जणां ॥ ध्रु ॥
चिंतितां जयासी । [1]भुक्तिमुक्ति कामारी दासी ॥ २ ॥
वैकुंठासी जावें । तुका ह्मणे ज्याच्या नांवें ॥ ३ ॥

॥ १६१३ ॥

ज्याचे गर्जतां पवाडे । श्रुतिशास्त्रां मौन्य पडे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तेथें माझी वाचा किती । पुरे करावया स्तुती ॥ ध्रु ॥
[2]सिणलीं सहस्र तोंडें । [3]शेषफणीऐसें धेंडें ॥ २ ॥
तुका ह्मणे मही । पत्र सिंधु न पुरे [4]शांही ॥ ३ ॥

॥ १६१४ ॥

देव राखे तया मारील कोण । न मोडे कांटा हिंडतां वन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ न जळे न बुडे नव्हे कांहीं । विष तें ही अमृत [5]पाहीं ॥ ध्रु ॥
न चुके वाट न पडे फंदीं । नव्हे [6]कधीं यमबाधा ॥ २ ॥
तुका ह्मणे नारायण । [7]येतां गोळ्या वारी बाण ॥ ३ ॥

॥ १६१५ ॥

कोठें गुंतलासी द्वारकेच्या राया । वेळ कां सखया लावियेला ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दिनानाथ ब्रीद सांभाळीं आपुलें। नको पाहों केलें पापपुण्य ॥ ध्रु ॥
पतितपावन [8]ब्रीदें चराचर । पातकी अपार उद्धरिले ॥ २ ॥
तुकयाबंधु ह्मणे द्रौपदीचा धांवा । केला तैसा मला पावें आतां ॥ ३ ॥

॥ १६१६ ॥

कोठें गुतलासी कोणांच्या धांवया । आली देवराया निद्रा तुज ॥ १ ॥

---

१ पं. रिद्धिसिद्धी होती दासी.—२ दे सिणलें.—३ दे. शेषाफणी ऐसें.—४ " शाई " याबद्दल.—५ त. पं. " पाहीं " नाहीं.—६ दे. " कधीं " याबद्दल " कधीं कधीं " आहे.—७ पं. ये ऊन.—८ पं. ब्रीद.

॥ध्रु.॥ कोठें गुंतलासी भक्तिप्रेमसुखें । न सुटती[1] मुखें गोपिकांचीं ॥ ध्रु ॥
काय पडिलें तुज कोणाचें संकट । दुरी पंथ वाट न चालवे[2] ॥ २ ॥
काय माझे तुज गुण दोष दिसती । ह्मणोनि श्रीपती कोपलासी ॥ ३ ॥
काय जालें[3] सांग माझिया कपाळा । उरला जीव डोळां तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ १६१७ ॥

परस्त्रीतें ह्मणतां माता । चित्त लाजवितें चित्ता ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय बोलोनियां तोंडें । मनामाजी कानकोंडें ॥ ध्रु ॥
धर्मधारिष्टगोष्टी सांगे । उष्टया हातें नुडवी[4] काग ॥ २ ॥
जें जें कर्म वसे अंगीं । तें तें आठवे प्रसंगीं ॥ ३ ॥
बोले तैसा चाले । तुका ह्मणे तो अमोल ॥ ४ ॥

॥ १६१८ ॥

असत्य वचन होतां सर्व[5] जोडी । जरी लग्नघडी परउपकार ॥ १ ॥
॥ध्रु.॥ जाईल पतना यासि संदेह नाहीं। साक्ष आहे[6] कांहीं सांगतों ते ॥ध्रु॥
वदविलें मुखें नारायणें धर्मा । अंगुष्ठ त्या कर्मासाटीं गेला ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां सांभाळा रे पुढें । अंतरिंचें कुडें देइल दुःख ॥ ३ ॥

॥ १६१९ ॥

जळो त्यांचें[7] तोंड । ऐसी[8] कां ते व्याली रांड ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सदा भोवयासी गांठी[9] । क्रोध धडधडीत पोटीं ॥ ध्रु ॥
फोडिली गोंवरी । ऐसी दिसे तोंडावरी ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं । चित्ता समाधान कांहीं ॥ ३ ॥

---

१ दे. सुटेती.–२ पं. चलवे.–३ त. जालों.–४ त. न उडवी. पं. नुठवी.–५. पं. कोटि.–६ त. असे.–७ पं. तिचें.–८ पं. ऐसीयातें०–९ पं. आटी.

॥ १६२० ॥

तोंडें खाये फार । पादे बोचा करी मार ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ एक ऐसे ते शाहाणे । आपुले अधीन तें नेणे ॥ ध्रु ॥

कुले घालूनि उघडे । रागें पाहे लोकांकडे ॥ २ ॥

खेळे द्यूतकर्म । मग बोंबली जुलूम ॥ ३ ॥

निजतां आला मोहो । वीतां ह्मणे मेला गोहो ॥ ४ ॥

तुका ह्मणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥ ५ ॥

॥ १६२१ ॥

पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तैसें माझें मन एकविध जालें । नावडे विठ्ठलेंविण दुजें ॥ ध्रु ॥

सूर्यविकासिनी नेघे चंद्रकळा । गाय ते कोकिळा वसंतेंसी ॥ २ ॥

तुका ह्मणे बाळ मातेपुढें नाचे । बोल आणिकांचे नावडती ॥ ३ ॥

॥ १६२२ ॥

पंडित ह्मणतां थोर सुख । परि तो पाहातां अवघा मूर्ख ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ काय करावें घोकिलें । वेदपठण वांयां गेलें ॥ ध्रु ॥

वेदीं[3] सांगितलें तें[4] न करी । सम ब्रह्म नेणे दुराचारी ॥ २ ॥

तुका देखे जीवीं शिव । हा चि तेथींचा अनुभव ॥ ३ ॥

॥ १६२३ ॥

पंडित तो चि एक भला । नित्य भजे जो विठ्ठला ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ अवघें सम ब्रह्म पाहे । सर्वां भूतीं विठ्ठल आहे ॥ ध्रु ॥

---

१ दे. जुत.–२ पं. दुजें कांहीं.–३ पं. वेदें.–४ त. पं. "तें" नाहीं.–५ पं. जीव. शिव–६ दे. हा तेथींचा.–७ पं. पंडित तो भला.

रिता नाहीं कोणी ठाव । सर्वां भूतीं वासुदेव ॥ २ ॥
तुका ह्मणे तो चि दास । त्यां[1] देखिल्या जाती दोष ॥ ३ ॥

॥ १६२४ ॥

ऐका पंडितजन । तुमचे वंदितों चरण ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ नका करूं नरस्तुती । माझी परिसों[2] हे विनंती ॥ ध्रु ॥
अन्न आच्छादन । हें तों प्रारब्धा अधीन ॥ २ ॥
तुका ह्मणे वाणी । सुखें वेचा नारायणीं ॥ ३ ॥

॥ १६२५ ॥

विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी । विठ्ठल तोंडीं उच्चारा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ विठ्ठल अवघ्या भांडवला । विठ्ठल बोला विठ्ठल ॥ ध्रु ॥
विठ्ठल नाद विठ्ठल भेद । विठ्ठल छंद विठ्ठल ॥ २ ॥
विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा । तुकया मुखा विठ्ठल ॥ ३ ॥

॥ १६२६ ॥

काय तुझें वेचे मज भेटी देतां । वचन बोलतां एक दोन ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ काय तुझें रूप घेतों मी चोरोनि । त्या भेणें लपोनि राहिलासी ॥ ध्रु ॥
काय तुझें आह्मां करावें वैकुंठ । भेऊं[3] नको भेट आतां मज ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझी नलगे दसोडी । परि आहे[4] आवडी दर्शनाची ॥ ३ ॥

॥ १६२७ ॥

संतनिंदा ज्याचे घरीं । नव्हे घर ते यमपुरी ॥ १ ॥

---

१ दे. त्यां.—२ पं. ० परिसावी विनंती.—३ दे. पं. भेवों.—४ पं "आहे" याबद्दल "हे."

॥ ध्रु. ॥ त्याच्या पापा नाहीं जोडा । संगें[1] जना होय पीडा ॥ ध्रु ॥
संतनिंदा आवडे ज्यासी । तो जिता चि नर्कवासी ॥ २ ॥
तुका ह्मणे तो[2] नष्ट । जाण गाढव तो स्पष्ट ॥ ३ ॥

॥ १६२८ ॥

आलें देवाचिया मना । तेथें कोणाचें चालेना ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हरिश्चंद्र ताराराणी । वाहे डोंबा घरीं पाणी ॥ ध्रु ॥
पांडवांचा साहाकारी । राज्यावरोनि केले दुरी ॥ २ ॥
तुका ह्मणे उगेचि राहा । होईल तें सहज पाहा ॥ ३ ॥

॥ १६२९ ॥

निजल्यानें गातां उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे[3] नाना छंदें गोविंद हा ॥ ध्रु ॥
मारगीं चालतां मुखीं नाम वाणी । उभा चक्रपाणी मागें पुढें ॥ २ ॥
तुका ह्मणे यासी कीर्तनाची गोडी । प्रेमें घाली उडी नामासाटीं[4] ॥ ३ ॥

॥ १६३० ॥

काम क्रोध आह्मी वाहिले विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां कोण पाहे मागें परतोनि । गेले[5] हारपोनि देहभाव ॥ ध्रु ॥
रिद्धिसिद्धी सुखें हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी विठोबाचे दास । करूनि[6] ठेलों ग्रास ब्रह्मांडाचा ॥ ३ ॥

॥ १६३१ ॥

उठाउठीं अभिमान । जाय ऐसें स्छळ कोण ॥ १ ॥

---

१ पं. "संगे" याच्यावद्दल "ज्याच्या सगें ".–२ पं. "तो" नाहीं.–३ पं. नाचे हा गोविंद नाना छंदें ।. दे. व त यातही प्रथमतः हाच पाठ होता, परंतु मागून आंकडे घालून वर छापल्याप्रमाणें फिरविल आहे.–४ त. नामासाठीं.–५ पं. गेला.–६ त. गिळूनि. दे. मुळीं हाच पाठ होता.

॥ ध्रु. ॥ तें यां पंढरीस घडे । खळां पाझर रोकडे ॥ ध्रु॥
अश्रूचिया धारा । कोठें रोमांच शरीरा ॥ २ ॥
तुका ह्मणे काला । कोठें अभेद देखिला ॥ ३ ॥

॥ १६३२ ॥

पंढरी पंढरी । ह्मणतां पापाची बोहरी ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ धन्य धन्य जगीं ठाव । होतो नामाचा उत्साव ॥ ध्रु ॥
रिद्धिसिद्धी लोटांगणीं । प्रेमसुखाचिया खाणी ॥ २ ॥
अधिक अक्षरानें एका । भूवैकुंठ ह्मणे तुका ॥ ३ ॥

॥ १६३३ ॥

अल्प माझी मति । ह्मणोनि येतों काकुलती ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आतां दाखवा दाखवा । मज पाउलें केशवा ॥ ध्रु ॥
धीर माझ्या मना । नाहीं नाहीं नारायणा ॥ २ ॥
तुका ह्मणे दया । मज करा अभागिया ॥ ३ ॥

॥ १६३४ ॥

भार घालीं देवा । न लगे देश डोई घ्यावा ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देह प्रारब्धा अधीन । सोसें अधिक वाढे सीण ॥ ध्रु ॥
व्यवसाय निमित्त । फळ देतसे संचित ॥ २ ॥
तुका ह्मणे फिरे । भोंवडीनें दम जिरे ॥ ३ ॥

॥ १६३५ ॥

भोग भोगावरी द्यावा । संचिताचा करुनी ठेवा ॥ १ ॥

१ पं. हे.–२ पं. राहिला.–३ दे. बोहोरी.–४ पं तुमचीं.

॥ ध्रु. ॥ शांती धरणें जिवासाटीं । दशा उत्तम गोमटी ॥ ध्रु ॥
देह लेखावें असार । सत्य परउपकार ॥ २ ॥
तुका ह्मणे हे मिरासी । बुडी द्यावी ब्रह्मरसीं ॥ ३ ॥

॥ १६३६ ॥

येथें बोलोनियां काय । व्हावा गुरु तरि जाय ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मज न साहे वांकडें । ये विठ्ठलकथेपुढें ॥ ध्रु ॥
ऐकोनी मरसी कथा । जंव आहेसि तुं जीता ॥ २ ॥
हुरमतीची चाड । तेणें न करावी बडबड ॥ ३ ॥
पुसेल कोणी त्यास । जा रे करीं उपदेश ॥ ४ ॥
आह्मी विठ्ठलाचे वीर । फोडूं कळिकाळाचें शीर ॥ ५ ॥
घेऊं पुढती जन्म । वाणूं कीर्ति[1] मुखें नाम ॥ ६ ॥
तुका ह्मणे मुक्ती । नाहीं आस चि ये चित्तीं ॥ ७ ॥

॥ १६३७ ॥

अनुहातीं[2] गुंतला नेणे बाह्य रंग । वृत्ति येतां मग बळ लागे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मदें मातें[3] तया नाहीं देहभाव । आपुले अवयव[4] आवरितां ॥ ध्रु[5] ॥
आणिकांची वाणी वेद तेणें मुखें । उपचारदुःखें नाठवती ॥ २ ॥
तें सुख बोलतां आश्चर्य या जना । विपरीत मना भासतसे ॥ ३ ॥
तुका ह्मणे बाह्य रंग तो विठ्ठल । अंतर[5] निवालें ब्रह्मरसें ॥ ४ ॥

॥ १६३८ ॥

ब्रह्मरसगोडी तयांसी फावली । वासना निमाली सकळ ज्यांची ॥ १ ॥

---

१ पं. कीर्ती.—२ दे. त. आनुहातीं.—३ त. मातलें. पं. माजे.—४ दे. त. पं. आवेव.—५ पं अंतरीं.

॥ ध्रु. ॥ नाहीं त्यां विटाळ अखंड सोंवळीं । उपाधीवेगळीं जाणिवेच्या ॥ ध्रु. ॥
मन हें निश्चळ जालें एके ठायीं । तयां उणें काई निजसुखा ॥ २ ॥
तीं[2] चि पुण्यवंतें परउपकारी । प्रबोधी त्या नारीनरलोकां ॥ ३ ॥
तुका ह्मणे त्यांचे पायीं पायपोस । होऊनियां वास करिन तेथें ॥ ४ ॥

॥ १६३९ ॥

जैसें तैसें राहे देवांचें[3] हें देणें । यत्न करितां तेणें काय नव्हे ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ दासां कृपासिंधु नुपेक्षी सर्वथा । अंतरींची व्यथा कळे त्यासी ॥ ध्रु. ॥
मार्गों नेणे परी माय जाणे वर्म । बाळा नेदी श्रम पावों कांहीं ॥ २ ॥
तुका ह्मणे मज अनुभव अंगें । वचन वाउगें मानेना हें ॥ ३ ॥

॥ १६४० ॥

आह्मां हरिच्या दासां कांहीं । भय नाहीं त्रैलोकीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ देव उभा मागें पुढें । उगवी कोडें संकट ॥ ध्रु. ॥
जैसा केला तैसा होय । धांवे सोय धरोनि ॥ २ ॥
तुका ह्मणे असों सुखें । गाऊं मुखें विठोबा ॥ ३ ॥

॥ १६४१ ॥

परद्रव्यपरनारीचा अभिळास । तेथूनि हारास सर्वभाग्या ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ घटिका दिवस मास वर्षें[4] लागती तीन । बांधलें पतन गांठोडीस ॥ ध्रु. ॥
पुढें घात त्याचा रोकडा शकुन । पुढें करी गुण निश्चयेंसी ॥ २ ॥

---

१ पं. ०सोवळा । उपाधीवेगळा जाणिवेसी ॥ मन हे संचलें जालें०. त.०सोवळें । उपाधी वेगळें वासनेसी ॥–२ पं. तेचि पुण्यवंत पर० –३ त. पं. देवाचें देणें.– ४ दे. बरुषें लागेतीन.

तुका ह्मणे एकां तडताथवड । काळ लोंगे नाड परी खरा ॥ ३ ॥

॥ १६४२ ॥

समर्थाचें केलें । कोणां जाईल मोडिलें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ वांयां करावी ते उरे । खट[२]पट सोस पुरे ॥ ध्रु ॥
ठेविला जो ठेवा । आपुलाला तैसा खावा ॥ २ ॥
ज्यां[३]चें त्याचे हातीं । भुंके[४] तयाची फजिती ॥ ३ ॥
तु[५]का ह्मणे कोटी । बाळे जाले शूळ पोटीं ॥ ४ ॥

॥ १६४३ ॥

हे मां[६]झी मिराशी । ठाव तुझ्या पायांपाशीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ याचा धरीन अभिमान । करीन आपुलें जतन ॥ ध्रु ॥
देऊनियां जीव । बं[७]ळी साधिला हा ठाव ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । जुन्हाट हे माझी सेवा ॥ ३ ॥

॥ १६४४ ॥

नेणे गति काय कवण अधोगति । मानिली निश्चिती तुझ्या पायीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कर्म धर्म कोण नेणें हा उपाव । तुझ्या पायीं भाव ठेवियेला ॥ध्रु॥
नेणें निरसूं पाप पु[८]ण्य नेणें काय । ह्मणऊनि पाय धरिले तुझे ॥ २ ॥

---

१ पं. गेला.—२ दे. खटपटें—३ त. तुका ह्मणे ज्याचे०. पं. प्रतींतून येथें छापलेलें "तुका ह्मणे कोटी" हें कडवें तळेगांवची प्रत लिहिणारास लब्ध न झाल्यामुळें याच कडव्यांत "तुका ह्मणे" हें घातलें असावें असें वाटतें.—४ दे. भुके.—५ पं. प्रतींत मात्र हें कडवें आहे. दे. प्रतींत नाहीं; परंतु तींत शेवटच्या कडव्यांत "तुका" हा शब्द नाहीं यावरून "तुका ह्मणे कोटी" हें कडवें लिहिणें राहिलें असावें.—६ दे. "देवा हे माझी०." येथें "देवा" हें मागूनच घातलें आहे —७ दे. "वडिलीं." असें "बळी याच्या ठिकाणीं मागून केलें आहे.—८ पं. पुण्य काय.

वेडा मी अविचार न कळे विचार । तुज माझा भार पांडुरंगा ॥ ३ ॥
तुका ह्मणे तुज करितां नव्हे काय । माझा तो उपाय कवण तेथें ॥ ४ ॥

॥ १६४५ ॥

तुझा ह्मणऊनि जालों उतराई । त्याचें वर्म काई तें मी नेणें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ हातीं धरोनियां दावीं मज वाट । पुढें कोण नीट तें चि देवा ॥ध्रु॥
देवभक्तपण करावें जतन । दोहीं पक्षीं जाण तूं चि बळी ॥ २ ॥
अभिमानें तुज लागली हे लाज । शरणागतां काज करावया ॥ ३ ॥
तुका ह्मणे बहु नेणता मी फार । ह्मणऊनि विचार जाणविला ॥ ४ ॥

॥ १६४६ ॥

मारगीं चालतां पाउलापाउलीं । चिंतावी माउली पांडुरंग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ सर्व सुख लागे घेऊनियां पाठी । आवडीचा कंठीं रस ओती ॥ ध्रु ॥
पीतांबरें छाया करी लोभापर । पाहे तें उत्तर आवडीचें ॥ २ ॥
तुका ह्मणे हें चि करावें जीवन । वाचे नारायण तान भूक ॥ ३ ॥

॥ १६४७ ॥

जालों आतां दास । माझे तोडोनियां पाश ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ ठाव द्यावा पायांपाशीं । मी तों पातकांची राशी ॥ ध्रु ॥
सकळ ही गोवा । माझा उगवूनि देवा ॥ २ ॥
तुका ह्मणे भय । करों जवळी तें नये ॥ ३ ॥

॥ १६४८ ॥

अंतरींचें जाणां । तरि कां येऊं दिलें मना ॥ १ ॥

---

१ पं. कर्म.—२ पं. ह्मणोनि.—३ पं. पीतांबर छाया.—४ पं. ताहान भूक. त. तानभुके.—५ त. कदा.

॥ ध्रु. ॥ तुमची करावी म्यां सेवा । आतां अव्हेरितां देवा ॥ ध्रु ॥
नव्हती मोडामोडी । केली मागें ते चि घडी ॥ २ ॥
तुका ह्मणे दिला वाव । पायीं लागों दिला भाव ॥ ३ ॥

॥ १६४९ ॥

पवित्र होईन चरित्रउच्चारें । रूपाच्या आधारें गोजिरिया ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपुरती बुद्धि पुण्य नाहीं गांठी । पायीं घालीं मिठी पाहें डोळां ॥ ध्रु ॥
गाईन ओविया शिष्टांच्या आधारें । सारनि विचारें आयुष्या या ॥ २ ॥
तुका ह्मणे तुझें नाम नारायणा । ठेवीन मी मना आपुलिया ॥ ३ ॥

॥ १६५० ॥

काय ऐसा जन्म जावा वांयांविण । कांहीं तरी ऋण असो माथां ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कोणे तरी काळें होईल आठव । नाहीं जरी भाव भार खरा ॥ ध्रु ॥
शता एका तरी जन्माच्या शेवटीं । कृपाळुवा पोटीं होईल दया ॥ २ ॥
तुका ह्मणे नाहीं फांकों तरी देत । सर्वांचें उचित सांपडलें ॥ ३ ॥

॥ १६५१ ॥

नाहीं कोणी दिस जात वांयांविण । साध्य नाहीं सीण लटिका चि ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ एकाचिये माथां असावें निमित्त । नसो नाहीं हितें कपाळीं तें ॥ ध्रु ॥
कांहीं एक तरी बोलायाचा जागा । नेदिती वाउगा उभा ठाकों ॥ २ ॥
तुका ह्मणे वर्मे कळों येती कांहीं । ओळखी जे नाहीं होईल ते ॥ ४ ॥

---

१ पं. पेईल.–२ पं. "हित" नाहीं.

॥ १६५२ ॥

काय करील तें नव्हे विश्वंभर । सेवकां दारिद्र[1] लाज नाहीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ मजपासूनि हें पडिलें अंतर । काय तो अव्हेर करूं जाणे ॥छ॥
नामाच्या चिंतनें नासी गर्भवास । नेदी करूं आस आणिकांची[2] ॥ २॥
तुका ह्मणे नेणों किती वांयां गेले । तयां उद्धरिलें पांडुरंगें ॥ ३ ॥

॥ १६५३ ॥

संध्या करितोसी केशवाच्या नांवें । आरंभीं तें ठावें नाहीं कैसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ किती या सांगावें करूनि फजित । खळ नेणे हित जवळी तें ॥ छ ॥
माजल्या न कळे उचित तें काय । नें[3] घ्यावें तें खाय घ्यावें सांडी ॥ २ ॥
तुका ह्मणे घेती भिंती सवें डोकें । वावसी तीं[4] एकें अंधारलीं ॥ ३ ॥

॥ १६५४ ॥

दुधाचे घागरी मद्याचा हा बुंद[5] । पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ तैसें खळां मुखें न करावें श्रवण । अहंकारें मन विटाळलें ॥ छ ॥
काय करावीं तीं[6] बत्तीस लक्षणें । नाक नाहीं तेणें वांयां गेलीं[7] ॥ २ ॥
तुका ह्मणे अन्न जिरों नेदी माशी । आपुलिया जैशी सर्वसर्गें[8] ॥ ३ ॥

॥ १६५५ ॥

सांगावें तें बरें असतें[9] हें पोटीं । दुःख देते खोटी बुद्धि मग ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ आपला आपण करावा वेव्हार[10] । जिंकोनि अंतर मन ग्वाहीं ॥ छ ॥

---

१ पं. दारिद्र.–२ पं. "ऐसें हें कळों आलें माझ्या मना । हरिचिया जना नाश नाहीं ॥" हें कडवें येथें जास्त आहे.–३ दे. नेघावें०.–४ दे. तें. पं. तें एक अंधा०.–५ पं. बिंद–६ दे. पं. तें.–७ त. पं. गेले.–८ दे. सर्वे श्वगें. त. संवश्वर्गें. पं. संवसंगें.–९ पं. असावें.–१० पं. विचार.

नाहीं मार्गे येत बोलिलें वचन । पावावा तो सीग बरा मग ॥ २ ॥
तुका ह्मणे बहु भ्यालों खटपटे । आतां देवा खोटे शब्द पुरे ॥ ३ ॥

॥ वाराणसीस यात्रा चालली तेव्हां स्वामींनीं भागीरथीस पत्र धाडिलें-ते अभंग ॥ ३ ॥

॥ १६५६ ॥

परिसें वो माते माझी विनवणी । म[1]स्तक चरणीं ठेवीतसें ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ भागीरथी महादोष निवारणी । सकळां स्वामिणी तीर्थांचिये ॥ ध्रु. ॥
जी[2]तां भुक्ति मोक्ष मरणें तुझ्या तिरीं । [3]अहिक्यपरत्रीं सुखरूप ॥ २ ॥
तुका विष्णुदास संतांचें पो[4]सणें । [5]वाक्पुष्प तेणें पाठविलें ॥ ३ ॥

॥ १६५७ ॥

तुह्मी विश्वनाथ । दीनरंक मी अनाथ ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ कृपा कराल ते थोडी । पायां [6]पडिलों बराडी ॥ ध्रु. ॥
काय उणें तुह्मांपाशीं । मी तों [7]अल्पें चि संतोषी ॥ २ ॥
तुका ह्मणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ॥ ३ ॥

॥ १६५८ ॥

पिंड पदावरी । दिला आपुलिये करीं ॥ १ ॥
॥ ध्रु. ॥ माझें जालें गयावर्जन । फिटलें पितरांचें ऋण ॥ ध्रु. ॥
केलें कर्मांतर । बोंब मारिली हरिहर ॥ २ ॥
तुका ह्मणे माझें । भार उतरलें ओझें ॥ ३ ॥

॥ ३ ॥

---

१. त. "मस्तक०" व दुसऱ्या चरणांतील "सकळां०" या दोन चरणांच्या जागा परस्परांशीं बदलल्या आहेत.–२ पं. जितां.–३ त. आहिक्य.– ४ दे. पोसनें.– ५ दे. त. वागपुष्प.–६ पं. पडतों.–७ पं. अल्प.

॥ १६५९ ॥

मथुरेच्या राया । माझें दंडवत पायां ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ तुमचे कृपेचें पोषणें । माझा समाचार घेणें ॥ ध्रु ॥

नाम धरिलें कंठीं । असें आर्तभूत पोटीं ॥ २ ॥

जीवींचें ते जाणा । तुका ह्मणे नारायणा ॥ ३ ॥

॥ १६६० ॥

जाय तिकडे लागे पाठीं । नाहीं तुटी आठवाची ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ हरूनियां नेलें चित्त । माझें थीत भांडवल ॥ ध्रु ॥

दावूनियां रूप डोळां । मन चाळा लावियेलें ॥ २ ॥

आणीक तोंडा पाडिली मिठी । कान गोठी नाइकती ॥ ३ ॥

बोलिल्याचा आठव न घडे । वाणी ओढे ते सोई ॥ ४ ॥

तुका ह्मणे प्रेमधर्गी । भरली अंगीं अखंड ॥ ५ ॥

॥ १६६१ ॥

नको ऐसें जालें अन्न । भूक तान ते गेली ॥ १ ॥

॥ ध्रु. ॥ गोविंदाची आवडी जीवा । करीन सेवा धणीवरी ॥ ध्रु ॥

राहिलें तें राहो काम । सकळ धर्म देहीचे ॥ २ ॥

देह धरिला त्याचें फळ । आणीक काळ धन्य हा ॥ ३ ॥

जाऊं नेदीं करितां सोस । क्षेमा दोष करवीन ॥ ४ ॥

तुका ह्मणे या च पाठीं । आतां साटी जीवाची ॥ ५ ॥

---

१ दे. त. पोसनें.—२ पं. लावूनियां.—३ पं. कानगोटी.—४ त. धरिलें. पं. “ धरिला त्याचें ” याबद्दल “ धरिल्याचें ”.—५ दे. पं. क्षेमा.—६ पं. पाटी.